
# माणूस

शनिवार । १८ सप्टेंबर १९७६ । साठ पैसे



**NOTHING IS HARD IN THIS WORLD
IF YOU DARE TO SCALE THE HEIGHTS**

**--MAO**

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक सोळावा

१८ सप्टेंबर १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


## मध्यबिंदू

माओने मार्क्सवादाचे चिनीकरण केले असे म्हटले जाते. परंतु जनसमुदायांच्या सामर्थ्यावरील अनन्यनिष्ठा वगळता अव्वल मार्क्सवादाचा कुठलाच अंश माओच्या आचारविचारात शिल्लक उरलेला दिसत नाही. माओक्रांतीत मार्क्सचा कामगारवर्ग अभावानेच तळपला. त्याची जागा शेतकरी समूहांनी घेतली. सांस्कृतिक क्रांतीत तर हे शेतकरी समूहही मागे पडले. नवा विद्यार्थिवर्ग पुढे आला. मध्यम–भांडवलदारवर्ग, कारखानदार–व्यापारी यांचे शत्रुत्व माओने फारसे ओढवून घेतलेले दिसत नाही. उलट त्यांना क्रांतीत सामीलच करून घेतले. वर्गविग्रहाऐवजी एकूण भिन्नभिन्न वर्गांच्या एकजुटीवर माओने भर दिलेला दिसतो व संपूर्ण चीन विरुद्ध प्रगत भांडवलशाही देश अशी विग्रहाची व्याप्ती वाढवून त्याने मार्क्सच्या आंतरराष्ट्रीयत्वाला वेगळीच राष्ट्रवादी कलाटणी दिली. नंतर नंतर प्रगत भांडवलशाही देशांची जागा रशियाने घेतली आणि आता तर रशियाविरोधही कमी होऊ लागलेला आहे. शांततापूर्ण सहअस्तित्वापर्यंत गाडी यायला आता फारसा वेळ राहिलेला आहे, असे इतर देशांच्या अनुभवावरून वाटत नाही. 'जगातील कामगारांनो, एक व्हा' ही घोषणा यापुढे निदान चीनमध्ये निश्चितच ऐकू येणार नाही. आणि ही घोषणा नाही म्हणजे मार्क्सवादही नाही, हे उघड आहे. लेनिन होता तेव्हा क्रांतीनंतरही रशियात ही घोषणा ऐकू येत होती. थर्ड इंटरनॅशनल अस्तित्वात होती. माओने आपल्या हयातीतच या घोषणेला मूठमाती देऊन टाकली होती. त्यामुळे पुढचा विचारच करायचे खरे म्हणजे कारण नाही. जागतिक क्रांतीऐवजी माओने चिनी क्रांती प्रथम महत्त्वाची मानली व नंतर आंतरराष्ट्रीय क्रांतीऐवजी एकदम सांस्कृतिक क्रांतीची खास पौर्वात्य झेप घेतली. मार्क्सवादाला ही झेप संपूर्णतया अपरिचित होती. खाजगी मालकी संपुष्टात आली– समाजवाद अस्तित्वात आला तरी माणसाचा स्वार्थ संपत नाही, तो पुनःपुन्हा भ्रष्ट होतो, हा मार्क्सवादी श्रद्धेला तडा देणारा अनुभव होता. यातून माओची सांस्कृतिक क्रांतीची कल्पना निघाली. ती काही मार्क्सवादात माओने टाकलेली नवी भर नव्हे. मार्क्सवाद निखळ भौतिकतेवर उभा आहे. नैतिकता हा भौतिकतेचा परिणाम आहे असे मार्क्सवाद मानतो. याउलट सांस्कृतिक क्रांतीची प्रक्रिया आहे. ती प्रथम माणसातील नैतिकतेला-क्रांतिकारकत्वाला आवाहन करते. जनसमूहाच्या आत्मशक्तीवर, तिच्या स्वतंत्र चलनवलनावर व नैतिक स्फुरणावर माओची श्रद्धा होती. अगदी प्रथमपासून. हीच मूलश्रद्धा पुढे सांस्कृतिक क्रांतीत परिणत झाली. मार्क्सवादाचे ते अपत्य नाही. निदान औरस तरी नाही. हे अगदी खास माओचे दर्शन आहे. चार दशकांच्या जनलढ्यातून उत्क्रांत झालेले; आशियाई व विशेषतः चिनी परंपरेचा आधार असलेले. म्हणूनच तर ते रशियनांना कळत नाही व पाश्चात्यांना गौडबंगाली वाटते. भारतात गांधीजींमुळे ते इतके परके व अपरिचित वाटत नाही. ह्या दृष्टीने असेही म्हणता येईल, की माओ हा गांधी आणि मार्क्स यामधील मध्यबिंदू होता. गांधीजींचे हृदयपरिवर्तन आणि मार्क्सचे परिस्थितिपरिवर्तन ही दोन्ही टोके माओने वर्ज्य मानली आणि नवाच एक सुवर्णमध्य आपल्या प्रतिभाबळाने सिद्ध केला. कदाचित हेच त्याच्या प्रचंड यशाचे रहस्यही असावे.

–श्री. ग. मा.

# मा ओ त्से तुंग

## उत्तुंग कर्तृत्वाचा नेता

वा. दा. रानडे

कम्युनिस्ट चीनचे नेते माओ त्से तुंग याच्या निधनाने विसाव्या शतकातील जगाच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे एक थोर व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. राष्ट्रीय नेता, कम्युनिस्ट नेता आणि जागतिक नेता अशा तीन दृष्टिकोनांतून त्यांच्या कार्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन व्हावयास हवे. या छोट्या लेखनात ते शक्य नाही पण काही विचार केवळ सूत्ररूपाने मांडीत आहे.

चीनसारखे जगातील सर्वांत जास्त लोकसंख्येचे, अनेक शतके मागासलेले, झोपी गेलेले राष्ट्र जागे करणे, त्याला संघटित करणे, आणि सर्व प्रकारच्या परकीय साम्राज्यशाहीच्या पकडीतून त्याला पूर्ण मुक्त करून जगात एका समर्थ राष्ट्राचे स्थान त्याला प्राप्त करून देणे हे कार्य केवढे प्रचंड. पण माओंनी ठाम निर्धार, खंबीर, जिद्दीचे नेतृत्व आणि कुशल संघटनेच्या बळावर ते पार पाडले. त्यांच्या हातून काही चुका घडल्या असतील, पण त्यामुळे त्यांच्या कार्याची महती कोणत्याही प्रकारे कमी होत नाही. ऐंशी कोटीच्या या प्रबळ राष्ट्राला डावलून कोणताही महत्त्वाचा निर्णय जग घेऊ शकत नाही.

कम्युनिस्ट विचारप्रणाली, धोरण, कार्यक्रम, कार्यपद्धती यात माओ यांनी कोणती भर घातली ? लेनिनच्या तोडीचा हा थोर नेता. लेनिन व माओ दोघांनीही आपापल्या देशात क्रांती केली. चिनी क्रांतीला रशियन क्रांतीची प्रेरणा जरूर होती पण रशियन क्रांतीचे ते केवळ अनुकरण नव्हते. चीनमधील विशिष्ट परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून तेथील परिस्थितीला योग्य अशी विचारप्रणाली, धोरण, कार्यक्रम व कार्यपद्धती यांची आखणी म्हणजे माओवाद. मार्क्सवादाची मूलभूत वैचारिक बैठक माओंनी बदललेली नाही, पण चीनच्या विशिष्ट परिस्थितीनुसार कार्यपद्धती, कार्यक्रम यांत बदल केले. शहरी कामगारवर्गाला संघटित करून क्रांती करण्यावर रशियन कम्युनिस्टांचा भर होता, तर माओंनी ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांना संघटित करून तेथे सत्ताकेंद्रे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले. संघटित शेतकरीवर्गाचे प्रचंड सामर्थ्य त्यांनी ओळखले. चँग कै शेकचे मध्यवर्ती सरकार आधीच कमकुवत. डोंगराळ ग्रामीण भागात या सरकारची परिणामकारक सत्ता नाही हे त्यांना दिसून आले. या भागात कम्युनिस्ट सत्ता केंद्रे स्थापून त्यांच्या ताब्यातील प्रदेश हळूहळू वाढवायचा आणि ग्रामीण प्रदेश जिंकल्यानंतर मग शहरे घ्यावयाची अशी योजना आखून माओंनी ती यशस्वी करून दाखविली. माओंनी १९२७ साली चिंगकान शान पर्वतात पहिले सत्ता केंद्र स्थापले, पण स्टॅलिन, कोमिंटर्न (आंतराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटना), आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचे त्यावेळचे नेतृत्व यांना माओंची ही भूमिका मान्य नव्हती. त्यांनी या सरकारला मान्यता दिली नाही. उलट माओंची पॉलिटब्यूरोतून हकालपट्टी केली. पण अखेर माओंचाच मार्ग बरोबर ठरला याचे कारण तो पुस्तकी सिद्धान्तावर नव्हे तर परिस्थितीच्या अचूक विश्लेषणावर आधारलेला होता. यशस्वी क्रांतीसाठी केवळ कामगार-शेतकऱ्यांचाच नव्हे, तर जनतेच्या सर्व थरांचा पाठिंबा मिळविला पाहिजे हे ओळखून सर्व थरांना सामावून घेईल असा व्यापक कार्यक्रम त्यांनी आखला. कामगार व शेतकऱ्यांशिवाय कनिष्ट मध्यमवर्ग, छोटे उद्योगधंदेवाले यांचाही पाठिंबा त्यांनी मिळविला. साम्राज्यशाहीची साथ करणारे बडे भांडवलदार आणि बडे जमीनदार हेच आपले मुख्य शत्रू मानून त्यांच्याविरुद्ध बाकी सर्व थरांचे सामर्थ्य त्यांनी एकवटले. राष्ट्रीय चळवळ आणि कम्युनिस्ट चळवळ यांची योग्य सांगड घातली. राष्ट्रीय चळवळीला नेहमी विरोध करून कम्युनिस्ट चळवळ त्यापासून दूर ठेवण्याची हिंदी कम्युनिस्टांची चूक त्यांनी केली नाही. कम्युनिस्ट विचारप्रणाली ही आपल्या परंपरेशी न जुळणारी व कोणी बाहेरून आपल्यावर लादलेली विचारप्रणाली आहे असे चिनी जनतेला कधी वाटलेच नाही इतके हे दोन प्रवाह एकमेकांत मिसळून गेले व एकजीव झाले.

मार्क्सवादात काही प्रश्नांच्या बाबतीत माओंनी महत्त्वाची भर घातली. एका व्यक्तीच्या हाती सर्व सत्ता केंद्रित होऊन तिचे व्यक्तिमहात्म्य वाढते. तिच्या मताविरुद्ध बोलण्याचे धैर्य होत नाही. त्यामुळे परिस्थितीचे योग्य विश्लेषण न होता, चुकीचे निर्णय घेतले जातात. स्टॅलिनच्या शेवटच्या काळात मार्क्सवादाची अशी विकृती झाली होती. त्याची रशियन नेत्यापेक्षाही अधिक सखोल मीमांसा माओंनी केली. सामुदायिक नेतृत्व हाच या विकृतीवर उपाय. व्यक्तिमहात्म्याचे वलय माओभोवतीही निर्माण करण्यात आले होते, पण ते त्यांनी स्वतःच पद्धतशीरपणे कमी केले. दुसरा प्रश्न अंतर्विरोधाचा. समाजवादी पद्धतीत अंतर्विरोध असतात, हे मान्य करायची रशिअन नेत्यांची तयारी नव्हती, पण समाजवादी पद्धतीतही अंतर्विरोध निर्माण होतात हे माओंनी मान्य केले. धोरण, कार्यक्रम, कार्यपद्धतींवरून हे विरोध निर्माण होऊ शकतात. पक्षांतर्गत खुला विचारविनिमय होऊन लोकशाही पद्धतीनेच त्याबाबतीत निर्णय घेतले पाहिजेत. पण या विरोधकांची योग्य सोडवणूक करणे माओंनाही जमले नाही. नेमस्त व जहाल गटांत तात्पुरता समझोता त्यांनी घडवून आणला, पण त्यांच्या मृत्यूनंतर या गटांमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

क्रांतीनंतर समाजवादी समाजाची उभारणी कशी करावयाची हे सर्वांत मोठे आव्हान माओंपुढे होते. क्रांतीची धार बोथट होत जाते, भांडवलदारी प्रवृत्ती डोके वर काढतात. त्यातून कम्युनिस्ट चळवळ सुधारणावादाकडे झुकते. रशियात हेच घडत आहे असे माओंना वाटत होते व ते कसे टाळावयाचे हा त्यांच्यापुढे मुख्य प्रश्न होता. मोठ्या कम्यूनची स्थापना आणि सांस्कृतिक क्रांतीची मोहीम या कार्यक्रमांमागे क्रांतिवादावर मधून मधून साचत जाणारी सुधारणावादाची काजळी झटकून टाकण्याचाच उद्देश होता. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत त्यांना पूर्ण यश आले नसेल, पण या आव्हानांना यशस्वी उत्तर दुसरा कोणीही कम्युनिस्ट नेता देऊ शकलेला नाही. हे प्रश्न यशस्वीपणे सोडविले जाण्यावरच कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य अवलंबून आहे.

माओंचे त्यागी, झुंजार जीवन जगातील पददलितांना आपले लढे लढविताना नेहमीच स्फूर्ती देत राहतील, यादृष्टीने ते केवळ चीनचे नव्हेत, कम्युनिस्टांचे नव्हेत, तर जगातील दलितांचे नेते आहेत. आफ्रिकेतील गोऱ्यांच्या वर्णश्रेष्ठतेविरुद्ध काळ्यांनी चालविलेल्या लढ्यालाही माओंच्या नेतृत्वाखाली चिनी जनतेने केलेल्या लढ्याने स्फूर्ती मिळेल. □

# माओच्या नवचीनमध्ये ( १९७३ )

## वॅसिली लिओन्टिफ

लिओन्टिफ हे अमेरिकेतील एक अग्रगण्य अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांना नोबेल पारितोषिकही मिळाले आहे. समाजवादाविषयी किंवा चीनविषयी खास आपुलकी असल्याबद्दल त्यांचा लौकिक नाही. तरी त्यांनी चीनला भेट देऊन आल्यावर चीनच्या प्रगतीचे-नियोजनपद्धतीचे भरघोस कौतुक करणारा हा लेख लिहिला. ('अटलांटिक मंथली'–मार्च १९७३) सुभाष भेंडे यांनी केलेला या लेखाचा मराठी अनुवाद 'समाज प्रबोधन पत्रिका' या त्रैमासिकाच्या मे-जून १९७४ अंकात प्रसिद्ध झाला होता. हा अनुवाद येथे साभार पुनर्मुद्रित केलेला आहे. मूळ लेखाला On the theory and practice of promising no more than you deliver असे अर्थपूर्ण उपशीर्षकही आहे. मुख्य शीर्षक 'चीनमधील समाजवाद'.

चीनला मी नुकतीच भेट दिली. चीनमधील पाच मोठ्या शहरांतील प्रचंड गर्दी मी पाहिली; सामुदायिक शेती, कारखाने, शाळा जवळून न्याहाळल्या; पूर्वेकडील भागात रेल्वेने प्रवास करताना चीनमधील असंख्य छोट्या छोट्या खेड्यांतले दर्शन घेतले. माझी खात्री झाली की चीनमधील समाजवाद यशस्वी झाला आहे. जेवढे देता येईल तेवढेच देण्याचे आश्वासन देण्याचे पथ्य तेथील राज्यकर्त्यांनी पाळले. या सावधगिरीच्या धोरणास आता अपेक्षित फळे येऊ लागली आहेत. चीनमधील ऐंशी कोटी जनता (हा आकडा कमीसुद्धा असेल कदाचित) आज सुस्थिर, सुखाचे आणि सुसंघटित जीवन जगत आहे. चीनच्या भूमीला सामाजिक सहयोगाचे आणि शांततेचे वरदान लाभले आहे. जगातील अन्य अनेक अविकसित देशांत एका बाजूला प्रचंड दारिद्र्य आहे आणि दुसऱ्या बाजूला मूठभर लोक विलासात, ख्यालीखुशालीत लोळत आहेत असे चित्र दिसते. या पार्श्वभूमीवर तर चीनमधील संपत्तीचे समान वाटप अधिक प्रकर्षाने डोळ्यांत भरते.

हाँगकाँग ते कँटन आगगाडीने मी प्रवास करीत होतो. हाँगकाँग ते सरहद्द आणि तेथून कँटन असे हे दोन वेगवेगळ्या प्रकारचे विभाग आहेत. मात्र एवढे अंतर कापताना भू-भागाचे मला झालेले दर्शन एकसारखे होते : छोट्यामोठ्या टेकड्या, वाहत्या पाण्याचे झरे, तलाव, कालवे आणि डबकी. पठारावर हिरवीगार वनश्री आणि परिश्रमाने कसण्यात येणारी शेती. हाँगकाँग ते सरहद्द या भागातून आमची गाडी चालली होती तेव्हा ग्रामीण भागातील झोपड्या, भोवतीची उघडी गटारे, उकिरडे आणि घाण पाहून मला प्युएर्टो रिको वा आमच्याकडील दक्षिण भागातील खेड्यांची आठवण झाली. मात्र सरहद्दीकडून जसजसा मी कँटनच्या निकट जाऊ लागलो तेव्हा नितळ पाण्याने भरलेले तलाव, त्यात स्वच्छंदपणे पोहणारे राजहंस व बदके हे मनोहारी दृश्य पाहून माझे डोळे खरोखरी निवले. त्यानंतर मी पेकिंग ते नानकिंग, तेथून हँगचाऊ आणि अखेरीस शांघायपर्यंत हजाराहून अधिक मैल प्रवास केला. या लांबलचक प्रवासात चीनचे मला घडलेले दर्शन वेगळे होते. छोटी गावे, भाताची व मक्याची शेते, शेतांना पाणीपुरवठा करणारे कालवे आणि तलाव–अशी दृश्ये एकापाठोपाठ एक माझ्या दृष्टीसमोर उलगडत होती. सर्वत्र लोक आपापल्या कामात अगदी व्यग्र दिसले. नांगरणी, कापणी, खुरपणी ही शेताची कामे जोरात चालली होती. म्हशी धुणारी आणि बदके व डुकरे राखणारी लहान मुले; जाळी टाकणारे कोळी; लोहमार्गांवर रूळ टाकणारे कामगारांचे समुदाय; दगडविटा, सातू, ऊस आणि अन्य शेतमाल गाड्यांत भरून त्या शहराकडे ओढून नेणारे शेतकरी–विविध कामात गुंतलेले असंख्य लोक. गवंडी भिंतीवर विटा चढवीत होते, कालव्यांवर पूल बांधीत होते, पाणी वाहून जाण्यासाठी चर खोदीत होते; बायका कपडे धूत होत्या किंवा मागील दारी घरकाम उरकीत होत्या. जांभया देत बसलेला एकही आळशी माणूस मी पाहिला नाही !

चीनमधील शेती अजून पारंपरिक पद्धतीने पिकवली जाते. मध्ययुगीन तांत्रिक प्रगतीचासुद्धा तेथील शेतीला स्पर्श झालेला नाही. शेतीची बहुतेक कामे हाताने बनवलेल्या लाकडी अवजारांच्या साहाय्याने पार पाडली जातात. पाणी काढण्याचा स्वयंचलित पंप क्वचितच. सामुदायिक शेतीवर ट्रॅक्टर, कापणी करणारी यंत्रे, रासायनिक खते आढळून येतात परंतु अजून तेथील शेती प्रामुख्याने पुरातन तंत्राचा अवलंब करीत असल्याचे दिसते. खेडोपाडी अजून वीज गेलेली नाही.

पेकिंग, शांघाय, नानकिंग आणि कँटन या मोठ्या शहरांतील जीवन गजबजलेले, गर्दीचे वाटले. आमच्याकडे शहरांत मोटारींची रीघ लागते. या शहरांतून मात्र सायकलींची रीघ लागली होती. छोटीमोठी दुकाने, उपाहारगृहे यांना गिऱ्हाइकांची वाण नव्हती. नीटस पोषाख केलेल्या, खिदळणाऱ्या शाळकरू मुली विटा रचून भिंती उभ्या करीत असलेल्या दिसून येतात. (आपल्याकडे हे दृश्य दिसणे कठीण !) कुणी विटा धूत होत्या, कुणी त्या रचीत होत्या, कुणी ओली माती लिंपीत होत्या–आणि ही कामे अशा शिस्तीत चालली होती की जणू ह्या मुली एखाद्या कसबी गवंड्याच्या हाता-

खाली तयार झाल्या आहेत असे वाटावे! रस्त्यावरून अनेक मुले खांद्यावर प्लॅस्टिकच्या बॅगा अडकवून, एकमेकांच्या हातात हात गुंतवून मोठ्या उत्साहाने क्रांतिगीते गात जाताना दिसली. नव्या चीनमध्ये प्रकर्षाने आढळून येणाऱ्या सामाजिक समतेचे प्रतीक म्हणजे स्त्रीपुरुषांचे, लहानथोरांचे पोषाख. निळ्या, पांढऱ्या अगर करड्या रंगाचे सैलदार सदरे आणि तुमानी. कचेऱ्या, कारखाने आणि शेते यांत कामे करणाऱ्यांचा पोषाख जवळजवळ एकसारखा. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या भागांना भेट देणाऱ्याला लक्तरे पेहरणारे स्त्रीपुरुष व उघडीनागडी, भुकेली पोरे या दृश्याची सवय होऊ लागते. असे एकही दृश्य मला चीनमध्ये दिसले नाही, ही खरोखरी आश्चर्याची गोष्ट होय.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार चीनमधील सरासरी दरडोई उत्पन्न १५० ते १७० डॉलर आहे. हा आकडा अमेरिकेच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या १/२० पेक्षा कमी आहे. (१९७१ मध्ये अमेरिकेतील दरडोई उत्पन्न ३६०० डॉलर होते.) अन्य अनेक अविकसित देशांतील दरडोई उत्पन्नाच्या तुलनेने चीनमधील दरडोई उत्पन्न कितीतरी कमी आहे. परंतु येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, अमेरिकेत हलाखीचे जीवन जगणाऱ्या लोकांच्या मानाने सर्वसाधारण चिनी माणसाची राहणीमानाची पातळी निश्चितच चांगली आहे. 'सरासरी' या शब्दाचा अर्थ चीनच्या दृष्टीने निराळा आहे. जवळजवळ सर्व लोक 'सरासरी' च्या जवळपास असतात.

अमेरिकेत खाजगी गाड्यांना जे महत्त्व तेवढेच महत्त्व चीनमध्ये सायकलीस. कारखान्यातील मजूर काय, शाळामास्तर काय, वा शेतकरी काय—कामावर जाण्यायेण्यासाठी सायकलीचा उपयोग करतातच; परंतु रविवारी गावाबाहेर सुट्टी मजेत घालविण्यासाठीही तीच उपयोगात आणली जाते. चीनमध्ये कामगाराचे सरासरी मासिक वेतन ७० युआन असते. (१ युआन = ४७ सेंट म्हणजे जवळजवळ अर्धा डॉलर. केवळ क्रयशक्ती हिशेबात घेतली तर १ युआनचे मूल्य ४७ सेंटहून अधिक म्हणता येईल.) नव्या सायकलीसाठी दोन महिन्यांचा पगार खर्च करावा लागतो. अमेरिकेत कामगाराला दरमहा ४०० डॉलर मिळतात. पण नव्या गाडीसाठी त्याला अंदाजे सात महिन्यांचा पगार खर्ची टाकावा लागतो. मि. वँगकडे कार असते तर, मि. वँगला आपल्या सायकलीची लाज वाटली असती. पण चीनमध्ये कमाल व किमान उत्पन्नात फारसा फरक नाही. वाँग आणि वँग या दोघांचे राहणीमान सारखेच. साहजिकच असूया, स्वतःच्या परिस्थितीविषयी न्यूनगंड ह्यास तेथे वावच नाही!

कम्युनमध्ये, कापडगिरणीत, यांत्रिक अवजारे तयार करणाऱ्या कारखान्यांत, विविध वस्तु भांडारामध्ये किंवा विद्यापीठात-कोठेही पाहिल्यास एक गोष्ट सहज ध्यानात येते. सर्वोच्च वेतनाची पातळी कमीत कमी वेतन-पातळीच्या तिप्पट, फारफार तर चौपट असते. त्याहून अधिक फरक नाही. कोणीही फार श्रीमंत नाही आणि मुख्य म्हणजे कोणीही फार गरीब नाही. तांदळासारखी धान्ये, खाद्यतेल आणि सुती कापड यांचे वाटप नियंत्रित भावात केले जाते. प्रत्येकाला प्रतिदिनी एक ते दीड पौंड तांदूळ वा दुसऱ्या प्रकारचे अन्नधान्य मिळते. कापड मोजकेच मिळते. दरवर्षी दोन सदरे वा पोलकी आणि दोन तुमानी शिवता येतील इतकेच. रेयॉन, रेशमी आणि अन्य प्रकारचे उंची कापड उघड्या बाजारात भरपूर प्रमाणात खरेदी करता येते. ज्याला परवडेल त्याने ते घ्यावे! कामावर असताना वापरावयाचे कपडे कारखान्याकडून मिळतात.

पेकिंगमध्ये आम्ही एका प्रचंड भांडाराला भेट दिली. दूधदुभत्याचे पदार्थ, किराणा माल, मांस, मासे, फळफळावळ, भाज्या यासाठी तेथे वेगवेगळे विभाग होते. भाज्यांचे सतरा प्रकार होते. कोंबडीच्या व बदकांच्या अंड्यांचे तीनचार प्रकार होते. कोणताही पक्षी निवडावा आणि खरेदी करावा. दहा मिनिटांत तो स्वच्छ करून, त्याचे मांस गिऱ्हाइकांना नीट बांधून दिले जाते. दुकानापुढे मोठ्या रांगा दिसल्या नाहीत. विक्रेते नम्र, मदत करण्यास उत्सुक दिसले.

चीनमध्ये शेतीची प्रचंड कम्यून आहेत आणि चीनची ऐंशी टक्के लोकसंख्या कम्युनवर राहून उदरनिर्वाह करते. एकेका कम्युनमध्ये साठ साठ हजारापर्यंत लोक असतात. शंभर ते दोनशेच्या गटाने लोक शेतीवर काम करीत असतात. ही कम्यूने शेती व शेतीशी संबंधित औद्योगिक उत्पादन करण्यात मग्न असतात. मुख्य व्यवसाय शेती. मी शांघायजवळील एका कम्युनला भेट दिली. कम्युनमध्ये कामाला असणाऱ्या मजुरांपैकी ११५ मजूर औद्योगिक उत्पादनात गुंतले होते. पण कम्युनच्या एकूण उत्पन्नात त्यांचा निम्मा वाटा होता. वास्तविक पाहता करंड्या विणणे, खतांचे उत्पादन करणे, शेतीसाठी उपयुक्त अवजारांची निर्मिती करणे, धातूंचे पाइप तयार करणे हे व्यवसाय शेतीशी संलग्न असे एकवेळ आपण म्हणू; परंतु दररोज वीसहजार विजेचे दिवे निर्माण करणाऱ्या कारखान्याची कृषिसंलग्न व्यवसायांत गणना करणे कठीण!

एखाद्या उत्पादनात रस घेऊन जास्तीत जास्त नफा मिळविणे हे कम्युनचे उद्दिष्ट नसते. विशिष्ट प्रदेशातील हजारो कुटुंबांना सुखासमाधानाने राहता यावे, उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून स्थापन केलेली ती एक सामाजिक संघटना आहे. अर्थातच त्या दृष्टीने विविध तऱ्हेचे व्यवसाय सुरू करणे सोयीचे ठरते.

पेकिंगमधील आर्थिक नियोजनकार विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करीत असलेले दिसतात. दूर अंतरावर वाहतूक चालू ठेवण्याच्या निकडीमुळे तेथील लोहमार्गावर खूप ताण पडतो. किनारी आणि अंतर्गत जलवाहतुकीच्या साहाय्याने रेल्वेवरील ताण कमी करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जात आहे. चीनमध्ये मोटारी तयार करण्याचा उद्योगधंदा अजून छोट्या प्रमाणावर आहे. तरीपण प्रत्येक प्रांतात मालवाहतुकीसाठी ट्रक तयार करण्याचे अनेक कारखाने आहेत. स्वयंपूर्णतेवर भर देण्याचे हे सर्व प्रयत्न स्तुत्य असले तरी, सुपीक जमीन आणि अनुकूल हवामान असलेल्या प्रदेशात व अन्य प्रदेशांत विकासाच्या दृष्टीने फरक पडणार नाही काय असा प्रश्न माझ्या मनात आला. परंतु स्थानिक प्रयत्न व पुढाकार यांस उत्तेजन मिळण्यासाठी हेच धोरण उपयुक्त आहे असे मला सांगण्यात आले.

उद्योगधंद्यांचा प्रसार शहराभोवती आणि खेड्यापाड्यांतूनही होत असल्याने नागरी व ग्रामीण भागांतील जीवनमानात आढळून येणारा फरक हळूहळू कमी होत आहे. ही प्रक्रिया अधिक सुलभतेने व वेगाने व्हावी यासाठी सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असल्याचे आढ-

पृष्ठ २८ वर

पॅरिस, आय् लव्ह यू

लेखांक पाचवा

शांताराम पारपिल्लेवार

# इथं प्रेरणा एकच भयंकर एकाकीपणाची

' पॅरिस...

'एका बाईनं हॉटेलवरच्या गच्चीतून स्वतःला झोकून दिलं. आत्महत्या केली. तिचं वय एकतीस होतं. ती त्या बिल्डिंगमध्ये किरायेदार होती. तिच्या शोकनाटयाची भीषणता हॉटेलमध्ये जाणवते आहे. ती कधी कधी खाली यायची.घरमालकाच्या बायकोला दुपारच्या जेवणाला थांबता येईल का विचारायची. जाताना घरमालकाच्या बायकोचं दीर्घ चुंबन घ्यायची–एका निकडीपोटी. तिला कुणीतरी आजूबाजूला हवं होतं. कुणाच्या शरीराच्या उबेची निकड होती. पण शेवटी काय? कपाळावर तीन इंचांची रक्ताळलेली भेग. शेवटचे शब्द– एकदाचं शेवटी! (At last, फेब्रुवारी १९४०.)

आल्बेगर कामूच्या डायरीत एक क्षण त्यानं टिपलाय्. एक घटना बांधून ठेवलीय्. एक दुःख गोठवून ठेवलंय्. दुःख इथल्या माणसांचंच नाही, तर शहरांचंही आहे. 'इथं प्रेरणा एकच: भयंकर एकाकीपणाची. भोवतालच्या सामाजिक जीवनातून मुक्त व्हायचा एकच मार्ग. स्वतःला मोठ्या शहरात झोकून द्यायचं. एवढयात आमच्या आवाक्यात तेवढंच एक वाळवंट आहे...' (कामू)

माणूस गर्दीतही एकटा आहे. लोनली इन् दी क्राऊड. आणि गर्दी असली तरी, शहर वाळवंटच आहे. तर ह्या वाळवंटात प्रत्येकजण एकाकी वाटचाल करतो. आताशी कुणी स्वतःला वरच्या माळयाहून झोकून आत्महत्या करीत नाही. सरावानं इथली बाई एकटं राहायला शिकली आहे.

मारी थेरेस एकटीच राहते. किती वर्षांपासून ती तशी राहते मी विचारलं नाही. तिला तिचं काम तिचे एकाकी आयुष्याचे क्षण डुबवायला पुरत असावं. ती शिक्षिका आहे. तिची बोलायची ढब मोठी गोड. इतर चारचौघींसारखं तिनं स्वतःला कुरूप करून घेतलेलं नाही.

इथल्या मुलींचं, इथल्या बायांचं एक वैशिष्टय आहे. चांगल्या निसर्गदत्त केसांना कुणी सोनेरी, कुणी रूपेरी, तर कुणी करडया रंगात डाय करून घेतात. मूळच्याच सुंदर त्वचेला फाऊंडेशन अन् रंगांचं लेपन लावतात.

मारीचं तसं नाही. ती अगदी सिम्पल आहे. लिपस्टिक, तीही हलक्या रंगाची, एवढाच तिचा शृंगार.

'काय, टॉवर पाहिलास की नाही?'

'कुठे? आय लॉस्ट टॉवर बिट्विन ए बर्ड अँन्ड ए बिअर्ड.'

मी तिला माझी आजची सगळी धडपड सांगतो. ती खूप उन्मळून हसते. कार पार्क करायला तिला जागा मिळाली नाही. तीन फर्लांग अंतर आम्ही चालत जातो.

पुढच्या सीटवर तिच्या बाजूला बसतो. ती आवर्जून सांगते, 'तो बेल्ट तेवढा अंगाभोवती बांध, हं!' बोटानं स्वतःच्या कपाळाकडे खुणावते. जुन्या जखमेचं चंद्राकार चिन्ह अजून कायम आहे. 'एकदा मला एकदमचं ब्रेक लावावा लागला अन् माझं कपाळ थेट पुढच्या काचेवर आदळलं. एक महिना दवाखान्यात राहाव लागलं.'

जाताना तिनं कार वेगळ्या मार्गानं घेतलेली असते.

'तू आर्क डि ट्रायम्फ पाहिलंस का?'

'नाही.'

काही कार्स तिला ओव्हरटेक करतात. ती चिडते. 'सी दॅट स्टुपिड मॅन–' म्हणते.

'माणसांविषयी तुझे ग्रह खूपच अतिरेकी दिसतात.'

'तुझ्याविषयी तसे होणार नाहीत.' तिचा हात स्टिअरिंगवर असतो.

'मीही तशी काळजी घेईन.'

'आज रात्री तू काय करतो आहेस?'

'मोकळाच आहे.'

'माझ्याकडे डीनरला ये मग. मी रमेश कोठारीला पण बोलावलं आहे.'

'कोठारी भेटणार कुठे?'

'त्याचा होस्ट कारनं त्याला माझ्याकडे पोचवणार आहे.' रमेश कोठारी पुण्याचा. इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर आहे. आमच्या ग्रूपमध्ये तो बोलतो कमी: पण बोलतो ते फारच खोचक. आल्यापासून साऱ्यांची मापं काढतो आहे. मला तर त्यानं केव्हाच शास्त्री क्लबात टाकून दिलंय्. मग मीही त्याला खवचटपणे म्हणालो होतो, नेपोलियनचं वाक्य आठवतं का? इट इज नॉट दि साईझ ऑफ दि बुलेट, बट दि फोर्स ऑफ दि बुलेट, दॅट काऊंटस्. त्याला विश्वास वाटत नाही नेपोलियन असं काही बोलला असेल म्हणून. म्हणतो, नेपोलियनच्या नावावर खपवतो आहेस. नेपोलियनच्या नावावर फ्रान्समध्ये काहीही खपवता येतं.

फ्रेंच मित्र त्याच्याकडे वेगळ्या नजरेनं पाहतात. तो त्याचा जैनधर्म रिलिजसली पाळतो आहे. वाईनच्या देशात दुधावर दिवस काढतो आहे. पोर्क आणि बीफ खाणारांत बसून तो बटाटयाची अन् कोबीची उकडलेली भाजी खातो आहे.

तो इलेक्ट्रॉनिक्सच्या इंडस्ट्रिज बघायला उत्सुक आहे मी त्याला म्हणतो, 'अरे रमेश, पॅरिस वेडयांचं शहर आहे. इथं तुला कलावंत भेटतील. आर्ट गॅलरीज दिसतील. तू खरं तर जर्मनीला जायला हवं.'

तो राहतोही अगदी सिम्पल. त्यानं पॅरिसच्या थंडीतही कधी कोट घातला नाही. बूट घातले नाहीत. पायात नुसत्या सपाता. मारी थेरेस अन् त्याच्यात बॉन्ड निर्माण व्हायला त्याचा साधेपणाच कारणीभूत असावा.

कार एका विशाल कमानीपाशी येते. सर्क्युलर रोड. मध्ये कमानीच दार. आपल्या गेटवे ऑफ इंडियासारखं. ती सर्क्युलर रोड-

वरून एक सर्कल पूर्ण करते. विवंचनेत आहे— कार पार्किंगला जागा नाही अन् इथं थांबणं जरूर आहे ती मला उतरायला सांगते. म्हणते, 'मी कार पार्क करून येते.'

पॅरिसच्या प्रत्येक सडकेला, वास्तूला, चौकाला इतिहास आहे. तुम्ही गेलात की त्या वास्तू बोलक्या होतात. गेली कितीतरी वर्षं पॅरिस आपलं हृद्गत प्रत्येकाजवळ मोकळं करीत आहे. माणसं बदलतात. त्यांची भाषा बदलते. वास्तूंना एकच भाषा अवगत आहे. काळाची भाषा. ह्या वास्तू, वास्तू राहात नाहीत. ती व्यक्तित्वाची रूपं होतात. 'Every line of these stones, and everyone of these scourged or crucified bodies is quivering with the same wanton and defiled emotion as the town itself, and is pouring it into men's hearts (Camus).'

'आर्क डि ट्रायम्फ' महत्त्वाकांक्षी नेपोलियनच्या कल्पनेचे वास्तव रूप. त्याला त्याच्या युरोपातील युद्धांच्या विजयाचे स्मारक बांधून हवे होते, की जे स्मारक त्याचे नाव आणि शहराची कीर्ती दिगंत नेईल. हे शहर नेपोलियनला एखाद्या संपन्न अन् सौंदर्यानं नटलेल्या रोमन शहरासारखं करायचं होतं.

त्यानं शिल्पकार आणि कलावंत बोलावलेत. आर्क डि ट्रायम्फवर त्याला त्याच्या विजयाची शिल्प कोरून हवी होती. काळाच्या हृदयावर त्याला त्याचा ठसा कोरून ठेवायचा होता. त्याचं नाव त्याला नुसती व्यक्ती म्हणून नको होतं. नेपोलियन ही एक इन्स्टिट्यूशन व्हायला हवी होती. त्यानं फ्रान्सला विजय दिला. शहराला सौंदर्य दिलं, समाजाला न्याय दिला, रयतेला हक्क दिले, येणाऱ्या पीढ्यांसाठी शिक्षणपद्धती दिली. मानवी समाजाच्या इतिहासात पहिल्यांदा गरीब आणि अशिक्षितांसाठी कायद्यात संरक्षणाची तरतूद करणारा नेपोलियन नुसताच योद्धा नव्हता; तो विचारवंत, कायदेपंडित, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी, धुरंधर तत्त्वज्ञही होता. पॅरिस शहर त्याला अख्ख्या जगातील एकमेव आणि अद्वितीय असं करायचं होतं. 'The states of Europe must be melted into one nation and PARIS must be its capital,' तो म्हणायचा. रोमन सम्राटांनी जे वैभव फक्त रोमला प्रदान केलं ते त्याला पॅरिसला द्यायचं होतं. मानवजातीच्या इतिहासात नेपोलियन हे एकच नाव सर्वांच्या आधी घेतलं जावं अशी त्याची मनोकामना होती. त्याच्या महत्त्वाकांक्षेला मर्यादा नव्हती. आपल्या महत्त्वाकांक्षेला त्यानं गरुडपक्षाच्या पखात शिल्पातून व्यक्त करायला लावलं ती शिल्प त्यानं सीन नदीवर बांधलेल्या पुलावर उभी केली. पंख विस्तारलेला गरुडपक्षी अन् अख्ख आकाश त्याच्या दोन पंखात. अख्ख्या मानवजातीची नियती त्याला त्याच्या पोलादी हातात हवी होती. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा तो जिथे जाईल तिथे हवा होता. पण नियतीला ते मंजूर नसावं.

आपल्या युद्धांचा विजय शिल्पात बद्ध करायला सांगणारा नेपोलियन परत मात्र ह्याच विजय कमानीखालून विजयी होवून आला नाही. सहा वर्षे सेंट हेलेनात घालवणारा बंदिस्त गरुड एक दिवस त्याचे पंख मागे टाकून गेला. ते पंख अजूनही उडायला आतुर आहेत. आता ते सीन नदीच्या पुलावर दिसतील. दगडात कोरलेले.

ज्या पॅरिससाठी नेपोलियननं स्वप्नांची आरास उभी केली होती, त्याच्या स्वप्नातलं एक वेगळं पॅरिस उभं केलं होतं, त्यालाच अखेरचा श्वास पॅरिसपासून शेकडो मैल लांब सोडावा लागला. त्याच्या मृत्युच्या १९ वर्षांनंतर त्याच्या मृत देहाचे अवशेष पॅरिसला परत आणले जात होते. १५ डिसेंबर १९४० अख्खं पॅरिस शहर वादळात सापडलेलं. हाडांनाही ठणका पोचवणारी थंडी, भुरभुर बर्फ पडतंय. झाडांच्या शेंड्यावर बर्फ जमलंय. माना खाली घालून पॅरिसचे नागरिक मूक उभे आहेत. एक रथ आर्क डि ट्रायम्फ खालून जात आहे. सगळं वातावरण कसं गंभीर आहे. वातावरणालाच प्रेताची अवकळा आलीय. इतिहास माझ्या डोळ्यापुढे कालचक्र उघडे करीत आहे. मी मागे जातो. मला वाटतं मी त्यावेळी तिथे हजर आहे. बर्फ भुरभुर पडत आहे. नेपोलियनच्या मृत देहाचे अवशेष पॅरिसला आणले जात आहेत, अश्रूंनी नेपोलियनचं स्वागत होत आहे. मी मूक थिजल्यासारखा सारं बघतो आहे.

मारी माझ्या खांद्यावर थाप मारीत म्हणते, 'काय हरवलास की काय?'

'ह्या वास्तूनं मला थेट भूतकाळात नेलं होतं.' मी सांगतो.

'ही वास्तूच तशी आहे. कितीतरी घटनांना ही साक्षी आहे.'

'मी नेपोलियनचा मृतदेह रथावर आणला जातानाचा भावपूर्ण सोहळा अनुभवत होतो.'

'तुला पॅरिसबद्दल बरीच माहिती दिसते?'

'वाटतं, कधी मी इथं होतो. ह्या आधीही.'

'ही वॉज वॉरिअर, ही वॉज ॲम्बिशस्, ही वॉज जिनिअस... पण...' बोलता बोलताच ती थांबते.

'पण?' ती काय सांगणार. ऐकायला उत्सुक आहे.

'वुमेन इन फ्रान्स डोन्ट लाईक हिम एनी मोअर!'

'का?'

'त्यानं सगळं केलं. सगळ्यासाठी केलं. फॉर वुमेन ही डझ नथिंग. ही वॉज इगोईस्ट.'

ती मला बोटांनी आर्कवरची दहा शिल्पं दाखवते. रूड, कार्टो आणि इटेक्स ह्या कृती आहेत. रूडची शिल्पा तेवढी अन्-ओरिजिनल आहेत. ती माहिती पुरवते, 'ह्या वास्तूचा आर्किटेक्ट चॅलग्रिन होता. १८०६ साली नेपोलियननं आर्कचं काम सुरू करायला लावलं. व्हिक्टर ह्यूगोचा मृत देह एका रात्रीसाठी ह्या कमानीखाली ठेवला गेला होता. १९१९ मध्ये पहिल्या महायुद्धात अलाईड आर्मी ह्या खालूनच गेली. इथं बघ...' ती मला बोटानंच खुणावते, 'अनामिक सैनिकाचं थडगं आहे. त्याच्या स्मृतीत रोज एक ज्योत लावली जाते.'

तिथून सरळ खाली उतरणाऱ्या रुंद सडकेकडे बोट दाखवीत म्हणते, 'ह्या शांझे लिझे (Champs– Elysees). मोठी हॉटेलं, टूरिस्ट एजन्सीज, एअर फ्रान्सचं ऑफिस, टूरिस्ट ब्युरो इथं आहेत. आणि आर्कपासून कुठंही जाता येतं. इथून वाटा सगळीकडे फुटतात. सूर्यकिरणासारख्या.' ती हाताची दिशा बदलत असते... 'इकडे प्लेस डिला कंकार्ड; इकडे ग्रॅंड पॅलाईस आणि इनवॉलिडस्' ती सांगत असतानाच

अशी गोलाकार फिरते. मी तिच्याकडे पाहा-तच राहतो. ते तिच्या लक्षात येतं. 'असा रोखून पाहतोस तरी काय ?'

'मारी थेरेस, खरं सांगू– अख्खं पॅरिस तुझ्या डोळ्यात दिसतंय्.'

'डोन्ट बी स्टुपिड !' ती हसते. ओठांना सिगरेट लावते.

माणसासाठी वापरायचा हा तिचा प्रिय शब्द. कोणत्या महाभागानं हिच्याशी कोणती स्टपिडिटी केली की, प्रत्येक पुरुषाला ही स्टुपिड म्हणत चालली आहे !

'शॅल वुई मूव्ह नाऊ ?'

मी हात उंचावून होकार दर्शवतो.

मारी थेरेसच्या छोटयाशा ड्रॉईंग हॉल-मध्ये भिंतीवर सीतादेवीचं एक चित्र आहे. मधुबानी शैलीत काढलेलं. कृष्ण बासरी वाजवतो आहे. गोपिका नाचत आहेत. मी चित्राकडे पाहतो आहे हे तिच्या लक्षात येतं. ती म्हणते, 'तुला हे चित्र पाहून आश्चर्य वाटलं का ?'

'हे काय, तू इथंच घेतलंस ?'

'नाही. मागच्या वर्षी मी भारतात गेले होते. तिथून आणलं.'

'इम्प्रेशनिस्ट अन् सिम्बॉलिस्ट चित्र-कारांच्या देशात तुला हे चित्र कसं काय आवडलं ? चित्रं तर तुमच्याकडे हवी तितकी मिळतील ?'

'खरं सांगू तुला ? ह्या सगळ्या गोष्टींचा कंटाळा आलाय्. हे कसं साधं, सिम्पल.' चित्राकडे बोट दाखवीत ती म्हणते,

'मधुबानी कला तर अजून आमच्या-कडेही इतकी लोकप्रिय नाही. आताआताशी लोकांना अशी एक कलाशैली भारतात होती हे कळायला लागलं आहे.'

'ह्या कलेसंबंधी मला माहिती असायचं एक कारण आहे. १९७४ साली इथं एक फिल्म महोत्सव झाला होता. त्यात सथ्यूचं गर्म हवा, संस्कार... कुणाचं होतं ते ?' बोलताबोलताच ती मला प्रश्न विचारते. तिच्याइतकी माहिती तर मलाही नसते. त्यात गिरीष कर्नाड ह्यानी ज्ञानेशाचार्यांचं काम केलं होतं एवढंच आठवतं. मला संस्कार पहायला मिळाला नसतो.

'आठवलं बघ. हं ! ते पट्टाभीरामा रेड्डीचं होतं. आणखी काही चित्रपट दाखवले गेले होते. एक भुवनशोमपण होता. ओह् ! दे रिअली रिप्रेझेंटेड ट्र्यू इंडिया. त्या फिल्मशो-मध्ये एक डॉक्युमेंटरी मधुबानी आर्टची होती. थांब मी बघते...' म्हणून ती पुस्तकांच्या कपाटात शोधायला लागते. मिनिटाभरात एक पुस्तिका आणून माझ्यापुढे करते. देवव्रत रॉयची 'पेंटर्स मधुबानी' नावाची डॉक्यु-मेंटरी दाखविली गेलेली असते. शाम बेनेगलची 'ताल आणि र्‍हिदम्', सत्याजित 'रॉयची अंतर्दृष्टी', सुखदेवच्या 'इंडिअन ऑर्डिनरी लाईफ' चाही उल्लेख त्या पुस्तिकेत असतो.

'How was the response to the Indian film festival ?'

'फँटॅस्टिक ! पॅरिसिअन्स् लाइक्ड देम व्हेरी मच.'

एकंदरीत ह्या मंडळींना भारताविषयी आपल्यापेक्षा जास्त माहिती आहे. ती म्हणले 'तू आता कपाटावरची पुस्तकं चाळ. मी जरा किचनमध्ये बघते.' कपाटं पुस्तकांनी गच्च भरलेली असतात.

भिंतीवर जपानी स्टाईलची दोन चित्रं फ्रेम करून ठेवली आहेत. मधे सनमायका टॉपचे टेबल आहे. त्यावर वेगवेगळ्या रंगांचे दगड आहेत. छोट्या छोट्या गारेसारखा एक; तर दुसरा जेडसारखा एक लंबोडा गोल काळा शिवलिंगासारखा. इकडे नर्मदेकाठी सापडतो तसा.

पुस्तकावरून तिच्या प्रवृत्तीचा अभ्यास करता यावा. फ्रॉइडचं सायको अॅनॅलिसीस आहे. चित्रकलेवर तर कितीतरी पुस्तकं आहेत. पिकॅसोवर व्हॉल्युम. मॅडिओग्लिनी, वॅनगोवरपण. नेपाळ अन् भूतानसंबंधी पुस्तकं आहेत. नेपाल व्हेअर गॉडस् आर यंग नावाचं एक पुस्तक मी चाळतो. भारतासंबंधी येथील कला, जीवन, धर्म ह्यासंबंधीचीही खूप पुस्तकं आहेत.

तिचं अपार्टमेंट इतर फ्रेंच कुटुंबियांच्या मानाने छोटंच आहे. एक बेडरूम, एक ड्रॉइंग रुम, किचन आणि बाथरूम. एकटीला पुरेल एवढंच. खिडकीतून खालची रू रॅम्बरविली दिसते. सडकेच्या काठानं उभ्या मोटारी. वाटतं, प्रदर्शनासाठीच ठेवल्यात की काय ? त्यांच्या चित्रविचित्र रंगांचं मनोहारी कोलॅज तयार झालं असतं. साडीला किनार असल्या-गत. तेवढ्यात दारावरची बेल वाजते. मी दार उघडतो. दारात कोठारी असतो. सोबत त्याचा होस्ट, त्याची बायको आणि वर्षाचा मुलगा. बेलचा आवाज ऐकून किचनमधून मारीथेरेसही बाहेर येते. तिनं अंगापुढं अॅप्रन चढवला असतो. फ्रेंच बाया स्वयंपाकघरात सहसा अॅप्रनशिवाय काम करीत नाहीत. हसत खांदे उडवीत ती प्रत्येकाचं स्वागत करते. मला म्हणते, कोठारीकडे लक्ष ठेव अन् परत आत जाते.

छोटा मुलगा मोठा गोड आहे. हात पुढं करताच माझ्या खांद्यावर आला. माझ्या खिशातील पेनशी खेळायला लागला.

'बघ काय लोक आहेत हे ? पोरगं वर्षाचं होत नाही; तर आतापासून त्याच्यासाठी वेगळ्या बेडरूमचा विचार करीत आहेत.'– कोठारी मराठीत बोलतो.

मी कोठारीला म्हणतो, 'रमेश, इथल्या बायांना पोरं नऊ महिने पोटात वागवायलाही कंटाळाच येत असेल, नाही ? बाहेर जाताना बेबी सिटींगचा इकडच्या देशात प्रचार आहे. बेबी बेअरिंगची सोय असती तर चक्क पोटा-तलं मूल ह्यांनी काम्प्यूटरच्या हवाली केलं असतं. ह्यांच्या वेणाही मशीनला दिल्या असत्या.'

'कुणी सांगावं, उद्या तसं होईलही.'

आमचं मराठी संभाषण आम्ही थांबवतो. चारमाणसांत ते बरं दिसत नाही.

'दुपारी कुठे गेला होतास ?' मी त्याला इंग्रजीत विचारतो.

'मला जर्मनीला जायचा व्हिसा मिळवा-यचा होता. काम कसं झटपट झालं हं. ह्याच गोष्टीसाठी आपल्याकडे अख्खा दिवस मोडला असता.'

'इतकी एफिशिएन्सी आपल्याकडे यायला मला वाटतं, आणखी दहा वर्षतरी लागतील!'

'दहा वर्षं ? फार कमी काळ सांगितलास. आज सकाळी मी बँकेत गेलो होतो. डॉलर फ्रँकमध्ये एक्सचेंज करायचे होते. किती वेळ लागला असणार सांग ?'

मला आठवतं सांताक्रुझ विमानतळावर रुपये देऊन डॉलर घ्यायचे होते. अर्धा तासाचा क्यू अन् प्रत्येकाला पाचतरी मिनिटं लागली होती. मी म्हणतो,

'पाच मिनिटं'

'अर्ध्या मिनिटात एक्सचेंज मिळाला.'

त्याचा होस्ट मला खूप प्रश्न विचारतो, माझ्या हॉबीज, माझे इंटरेस्ट विचारतो. मी

सांगतो 'लाईफ अँन्ड लिटरेचर'

तो हसतो 'ओह् ! लव्हली. वन इज दी इमेज ऑफ दि अदर'

'तुमचा लिटरेचर विषय आवडीचा आहे का ?'

'आय लाईक टू रीड. डू यू राईट ऑल्सो ?'

'येऽस. बट नॉट व्हेरी ऑफन.'

तेवढ्यात मारी थेरेस आतून येते. तिच्या हातात ट्रे असतो. ट्रेमध्ये कॉनॅक असते. मद्याचे बारीक गळ्याचे अर्धगोलाकार पेले असतात. मी ट्रे तिच्या हातातून घेतो. ती आईसक्यूब्सचं भांडं आणते.

ती टेबलावरचं सामान काढते. छोट्या कपाटावर ठेवते. मोठ्या टेबलाचं छोटं टेबल तयार केलं जाते. टेबलाचे पाय स्टील रॉडचे असतात. उभ्या फ्रेमला ती आडवी ठेवते. त्यावर टॉप ठेवते. टेबलाची उंची निम्मी झाली असते. आम्ही सारे टेबलाभोवती खालच्या गालीच्यावर बसतो. चक्क भारतीय बैठक.

'यू लाईक टू सीट ऑन दी ग्राऊंड ?'

'वुई सीट ऑन दी ग्राऊंड ओन्ली. ए फ्यू प्रिव्हिलेजड् हॅव ए डायनिंग टेबल इन इंडिया'

'एक्स्क्यूज मी, आय हॅव्ह नॉट मेनी चेअर्स टू सीट.'

ती पेल्यात कॉनॅक टाकते. बर्फाचे क्यूब्स. आमचे पेले आसमंतात उंचावले जातात. कोठारीचा होस्ट, अॅलन 'चिन्‌चिन्' म्हणतो,

'वुई से चीअर्स इन अवर कन्ट्री.'—मी.

"दॅट इज लाईक इंग्लिशमन" मारी म्हणते.

मला वरमल्यासारखं होतं. आम्ही सगळं दुसऱ्याचं स्वीकारीत आलो. त्यांची भाषा, त्यांचा वेष, त्यांचं कल्चर. फ्रान्स अन् इंग्लंड मध्ये अंतर फक्त काही मैल लांब खाडीचं आहे. पण भाषा, संस्कृती यांच्यात तफावत किती ? फ्रान्समध्ये इंग्रजी बोलणारा माणूस हातात दिवा घेऊन शोधावा लागतो. आता एक सोडा. आमच्या असोशिएशनशी निगडित व्यक्तींना थोडंबहुत इंग्रजी येतं. पण त्यांच्या शिवाय कुठं जायचं म्हणजे चक्क करमणूक असते. आपण काय बोलतो हे फ्रेंच माणसाला समजत नाही. तो काय म्हणतो ते आपल्याला समजत् नाही. मेझमधला एक प्रसंग तर मी विसरणार नाही माझा होस्ट अन् मित्र क्लॉद लेफकविच मला त्यांच्या ऑफिसमध्ये घेऊन गेला. त्याच्या एकेका सहकाऱ्याशी त्यानं ओळख करून दिली. त्यातल्या एकाला मी इग्रजीत विचारलं. "डू यू नो अँग्लाईस"

त्यानं इंग्रजीत उत्तर दिलं — आय डोन्ट नो.

कारण त्याला इंग्रजीतले तेवढेच तीन शब्द यायचे.

मी खूप हसलो तोही हसायला लागला. पॅरिसमधली आणखी एक घटना. फादर डिलाहूथ लेक्चर टूरवर लील गावी गेले. मी चहा केला. प्यालो. अन् दुधाची बॉटल फ्रीजमध्ये ठेवायला विसरलो. सायंकाळी परतलो तेव्हा चहाची तलफ आली. चहा केला. चहात दूध टाकताच ते फाटलं. चहा वॉश बेसीनमध्ये फेकावा लागला. पण चहा प्यायची इच्छा अनावर. खालच्या सडकेवर एक जनरल स्टोअर होतं. तिथं जाऊन दूध मागितलं—'आय् वॉंट मिल्क.' तिथं बावीसेक वर्षाचा तरणाबांड फ्रेंच मुलगा काऊंटरवर होता. मी काय बोलतो. त्याच्या लक्षात येईना. दोनदा त्यानं बोटं डमरूसारखी फिरवली. आली ना पंचाईत ? मग एक कल्पना सुचली. त्याच्या काऊंटरवर पॅड होतं, पेन्सिल होती. मी ते घेतलं. गाईचं चित्र काढलं. (इकडे दूध गाईचंच असतं) तिची थानं दाखवलीत. त्यातून दुधाची धार पडताना दाखवली. बोट त्या धारेकडे दाखवीत म्हटलं...मिल्क.. मिल्क

मिल्क हा शब्द त्याच्या समजवण्याच्या आवाक्याबाहेर असला तरी चित्रावरून मला काय हवंय त्याच्या लक्षात आलं. त्याची कळी खुलली. तो झपाट्यासारखा आत गेला. त्यानं फ्रीजमध्ये ठेवलेली दुधाची प्लॅस्टिकची शिशि माझ्या हातात दिली. "किंमत काय ?" ह्या अर्थी एक शब्द आम्ही सरावानं शिकलो होतो. मी विचारलं, "प्रिक्स ?"

"वन फ्रॅंक सिक्स्टी सेंटिमा".

इथं पाणी दूध आणि बियर ह्यांचे भाव साधारण सारखेच आहेत. एका फ्रॅंकला छोटी बीयरची शिशि मिळते. दुधाच्या भावात पाण्याची शिशी मिळते. इथली माणसं पाणी मुळातच पितात कमी, जेवतानाही वाईन घेतील. ज्यांना वाईन चालत नाही ते ऑरेंजिना, कोक किंवा अॅपल ज्यूस घेतात.

मारी थेरेसनं टेबलवर प्लेटस् ठेवायला सुरवात केलेली असते. दीड फूट लांबीचे टणक ब्रेडस मध्ये आणून ठेवते. चाकूनं कोठारीचा होस्ट (मांस्य अॅलन ऑसे) त्याचे दोनतीन इंचाचे तुकडे पाडीत असतो. मधल्या वेताच्या टोपलीत ब्रेडच्या तुकड्यांचा ढीग जमतो.

रमेशला मारीथेरेस विचारते—'तुला काय चालेल ?'

'ओन्ली व्हेजिटेरिअन हं !'

'मुष्रुम्स् चालतील ?'

'कधी खाल्ले नाहीत मी.'

मी सांगतो, 'अरे, वंडरफुल डिश आहे ती. आवडावी तुला.'

'नको रे, माहीत नाही काय असेल त्यात ?'

'आय हॅव्ह फ्रेंचबीन्स ऑल्सो'—मारीथेरेस.

ती आत जाऊन दोन पॅक्ड छोटे डबे आणते. शिजवलेल्या भाज्यांचे. 'यू ट्राय एनी' म्हणत डबे फोडून प्लेटमध्ये उपडे करते, एकात शेंगा असतात; तर दुसऱ्यात कोबी अन् मटर.

मरोक् रेड वाईनची शिशी आणून ती मध्ये ठेवते. एका प्लेटमध्ये साधा भात असतो. दुसरीत खोबऱ्याचा असावा तसा कीस.

मी विचारतो,—'मारी, हे काय आहे ?'

'ते चीझ आहे. भातावर भुरकावून खा.'

कोठारी चीझही खायचा नाही. आमच्याच ग्रुपमधल्या एकानं ह्याची फिरकी घेतली होती. चुकून एकदा त्यानं ते खाल्लं. म्हणाला, दुधाचा एक चांगला प्रकार आहे. पण त्याच्या ह्या कॉमेंटवर शेट्टेनं पुस्ती जोडली होती,—'डुकराच्या चरबीचंही चीझ असतं बरं का ? तेव्हापासून त्यानं चीझला रामराम ठोकला.

'शांताराम, तुझी मजा आहे इथं'—कोठारी.

'मी पुढं येईल ते अन्न पूर्णब्रह्म म्हणून स्वाहा करतोय्. अरे ले मान्सला एका फ्रेंच मित्राकडे पार्टी होती. एक प्लेट पुढं केली गेली. मटनाची असावी वाटलं. सहज चौकशी म्हणून निघताना त्या मित्राला विचारलं तर तो काय म्हणाला माहीताय् ? तो चक्क घोडा होता.'

'घोडा ? माय गॉड ! आता अख्ख्या पॅरिसमध्ये तू खिंकाळत राहणार आहेस.'

मारी थेरेस सालाडची प्लेट पुढं करते. त्यात गाजराचा कीस अन् हिरवी पानं असतात. ती पेल्यात वाईन ओतते.

तेवढ्यात फोन खणखणतो. ती फोनवर बोलतच राहते. मी घड्याळ लावून बघतो. तिनं तब्बल दहा मिनिटं फोनवर घेतली असतात. माणसं तशी. इथली फार बोलघेवडी. बोलायला बसली की, अवतीभवतीच्या साऱ्यांना विसरतात.

'एक्स्युज मी...माझा भाऊ होता. त्यालाही बोलावलं होतं आज जेवायला. म्हणाला आता लेट झालाय्. येणार नाही. त्याला सांगितलं आलंच पाहिजे.'

'किती वेळ घेईल तो '? ॲलन विचारतो.

'ओह् मॅटर ऑफ टेन मिनिटस्. बट वुई नीड नॉट वेट फॉर हीम' म्हणत ती सुरवात करायला सांगते.

कुठंतरी मी वाचलं होतं. 'फ्रेंचमन लिव्हज टू इट' ह्यांचे जेवण म्हणजे एक सोहळा असतो. वाईन आणि गप्पा सतत चालूच असतात. आधी ॲपरेटिफ घेतील, जेवताना वाईन, जेवणानंतर सारं झाल्यावर पुन: विचारतील चहा घेणार की कॉफी? काहीजण छोटया मिनिग्लासमधून लीकर्स घेतात.

आमचं अन्नसत्र सुरू असतं. मी पोर्कच्या चकट्या दातांनी तोडत असतो. मारीनं त्या एका प्लेटमध्ये सजवून ठेवल्या असतात. आधी वाटतं बीटरूट आहे की काय? रंग तसाच असतो. लालसर, जांभळका

दाराची बेल वाजते. मारी दार उघडते. एक तिशीचा तरुण आत येतो. त्याचे केस मानेपर्यंत पोचलेले. कल्ले मोठे. दिसायला लुकडासा. गालाची हाडं वर आलेली. डोळे छोटे अन् खोल. ती परिचय देते, 'हा बर्नार्ड'

तो विचारतो, 'आय होप् यू आर एन्जॉयिंग युवरं स्टे इन् फ्रान्स?'

'ओह! शुअर...,' म्हणत मी पेल्यातली उरली सुरली वाईन घशाखाली उतरवतो. मारी त्याच्यासाठी पेला देते. त्याच्या पेल्यात वाईन देते. तो 'मेर्सी' म्हणतो.

मारी सांगते 'हा माझा रिअल ब्रदर नाही हं!'

'म्हणजे?'–मी

तिचा भाऊ पुढची माहिती देतो–'हर मदर मॅरीड माय फादर आफ्टर हर डायव्होर्स'.

'म्हणजे तुझ्या आईनं डायव्होर्स घेतला होता?' मी विचारतो.

'आय डोन्ट रिमेंबर टू हॅव्ह सीन माय फादर. मी वर्षाची असतानाच ते सेपरेट झालेत.' मारी.

'कारण?'

मारीथेरेस इथं गंभीर होते. 'मला तरी कुठं माहीत आहे? मी कधी विचारलंही नाही. माझ्या आईनंही कधी सांगितलं नाही.'

'आई कुठाय?'–मी

'बर्नार्डच्या वडिलांशी लग्न केल्यानंतर ती त्यांच्यासोबत तीनेक वर्ष राहिली...आता कुठाय् ते एक देवालाच ठाऊक.'

'जिवंत आहे ना?'

'तेही माहीत नाही. ऐकलंय् ती अमेरिकेत आहे म्हणून.'

'तुला मोठं कुणी केलं?'

बर्नार्डकडे बोट दाखवीत ती म्हणते, ह्याच्या वडिलानं. त्यांनी खरंच माझ्यासाठी खूप केलं. आई तर अगदी निर्दयी निघाली. ती स्वत:साठीच जगली.'

'तुझ्या वडिलांचं काय झालं?'

'तू मार्क केलं नसावंस. आर्क ऑफ ट्रायम्फखाली एका अनामिक सैनिकाचं थडगं आहे. कधी वाटतं तो अनामिक माझा बाप तर नव्हता... ते थडगं माझ्या भावजीवनातलं एक पवित्र श्रद्धास्थान आहे. माय फादर वॉज ए सोल्जर. ही वॉज किल्ड इन् सेकंड वर्ल्ड वॉर. नोबडी नोज् व्हेअर?' ती पेल्यातली वाईन गपकन् पिऊन संपवते. खूपच हळवी आहे ती. मी शीशीतील वाईन तिच्या पेल्यात टाकतो. तिला एक सिगरेट देतो. लायटरनं पेटवून देतो. ती दीर्घ कश घेते. सिगरेटच्या धुरात तिचा चेहरा विरल्यागत होतो. तिच्या डोळ्यातल्या बाहुल्यातून दिव्याचं रिफलेक्शन स्पष्ट दिसतं. डोळे बल्बसारखे चमकतात.

ती कोठारीकडे पाहत म्हणते, 'तू स्वत:ची काळजी घे हं! इथं सारे आपापली सोय पाहणारे आहेत.'

'थँक यू. मी काळजी घेतोय. तू तुझी काळजी घे मात्र.' मोठं विकल स्मित तिच्या ओठावर आहे.

'बर्नार्डचं लग्न झालंय्?' मी विचारतो.

बर्नार्डला इंग्रजी फारसं येत नाही. मारीथेरेस मी काय विचारतो त्याला सांगते. नंतर तो काय म्हणतो ते सांगते... 'तो म्हणतोय मी लग्नाचा विचार करू शकत नाही. कारण लग्न केलं तर बायको बापाला घेऊन राहू देणार नाही आणि बापाला ह्या वयात विलग ठेवायचा तो विचारही करू शकत नाही. ही इज व्हेरी मच इमोशनली अटॅच्ड टू पापा.'

'तुमच्याकडे कुटुंबातून आईवडील असतात का?'– बर्नार्ड-

'हो. आईवडील असले तर त्यांचं कृपाछत्र आहे असं समजतो आम्ही.' मी सांगतो.

'इकडे कुटुंबाची व्याख्याच मोठी मर्यादित आहे. मी इथल्या फॅमिली कन्सेप्शनच्या विरुद्ध आहे. पण मी ह्या सगळ्या वातावरणात वेगळा आणि एकटा पडतो. काही मित्र–मैत्रिणी माझ्या विचारांना रूढीवादी म्हणतात. पुरातन म्हणतात. माझा उपमर्दही करतात. मी इथं आपल्याच लोकांत परका आहे. आऊटसायडर.'

'तुझा ॲप्रोच ओरिएंटल आहे. तू कधी भारतात आलास का?'

'नाही. मारी दोनदा जाऊन आलीय्. माझ्या मागे लागली होती. पण पपा... ह्या वयात त्यांना मला एकटं सोडता येत नाही. फक्त मारी तेवढी मला समजते आहे. तिच्याशिवाय बाकी सारे सुसंगत असा विचारच करू शकत नाहीत. इथं आलो की वाटतं मी सावलीत येऊन बसलोय्. खूप बरं वाटतं. मारी दयाळूही खूप आहे.'

'ओह! नो...' त्याची तारीफ ऐकून ती हात झटकते. हसते.

जेवण संपलं. शांतल तिला टेबल आवरायला मदत करते. छोटा मीचेल झोपी गेला असतो. बर्नार्ड जायला उठतो. मी बघतो. घड्याळात एक वाजला असतो. कोर्नेक अन् वाईन मला तरंगत ठेवीत असतात. ॲलन अन् शांतल जाऊ लागतात.

मला अन् कोठारीला मारी म्हणते, 'इफ यू आर नॉट टायर्ड, वुई वुईल गो टू माँटमार!'

बर्नार्ड, ॲलन, मीचेल अन् शांतल निघतात. त्यांना गुडबाय करायला मारी खिडकीच्या चौकटीत एकटी. मला कामूचं वाक्य आठवतं. 'इथं प्रेरणा एकच, भयंकर एकाकीपणाची.'

[ क्रमश: [

# सोलकढी

## □ मशाल नव्हे, बॅटरी

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या उभ्या; आणि अशाच कशापासून कशापर्यंतच्या आडव्या, भारतात, आज अमोल पालेकर हे नाव गाऱ्या–गाऱ्या–भिंगोऱ्या गाजते आहे. अलिकडच्या काळात, कदाचित एक XXX XX सोडता, थोडक्या अवधीत इतकी थोराड प्रसिद्धी मिळाल्याचे आणखी एखादे उदाहरण सापडणार नाही. (खरे म्हणजे मला एकही उदाहरण आठवत नव्हते. पण तसे खुल्लमखुल्ला सांगायचे म्हणजे बहुश्रुततेला बट्टा लागतो. शिवाय, वर मी लिहिले आहे तशा सगळ्या वाक्यांत 'एक अमुक कोणी सोडता' अशी पाचर नेहमी मारलेली असते, असे मी पाहून ठेवले आहे. तेवढ्यासाठी त्या फुल्या.) अमोल पालेकरांच्या भूमिका असलेले हिंदी चित्रपट धमाध्धम चालू लागले–चालत राहिले. मग अमोल पालेकरांना चौफेर मागण्या येऊ लागल्या; ते मागतील तो हुंडा मिळू लागला; मग बँकेतली नोकरी, राखीपौर्णिमेनतर हातातली राखी सहजनकळत गळून पडावी तशी, सुटली; एक गाडी आली, दुसरी आली; 'बाजीरावाचा बेटा' कोठल्याकोठे पसार झाला; चित्रीकरणाच्या निमित्ताने देशभर सुखी संचार सुरू झाला; 'विल्स'च्या ठिकाणी 'डनहिल'चा धूर निघू लागला.

त्या धुराआड नाटकवाल्या अमोल पालेकरांचा चेहरा दिसेनासा झाला. म्हणजे काही घायकुत्या घुमटरावांच्या नजरेला. त्यामुळे अमोलने नाटके सोडली–सोडणार, असे ते पुटपुटू चुटपुटू लागले. मला मात्र नाटकवाला अमोल स्वच्छ दिसत होता. तो नाटकाला आणि नाटक त्याला कध्धीकध्धी सोडणार नाही हे मला मनोमन ठाऊक होते. त्यामुळे चित्रीकरणाची नवी फसफस निवळली की, अमोल नव्या नाटकाच्या हंकलिखित प्रती गोळा करायला लागेल असा मला विश्वास होता. आणि अगदी तसेच झाले. दिवाकरांच्या नाट्यछटांचे निर्मितिसंकल्पन धुरकट झाले तोच बादल सरकारांचे अमोलसंकल्पित 'जुलूस' प्रायोगिक रंगभूमीवर आले; आणि गेल्या वर्षभरात 'जुलूस'चे पन्नास ढामढुम प्रयोग पुरे होताहेत तोच अमोलने महेश एलकुंचवारांचे 'पार्टी' हे नाटक रसिकांसमोर मांडले आहे.

हे *अगदी जसे व्हायला* हवे होते तसे म्हणजे योग्य, उचित आणि स्वाभाविकच झाले. कारण अमोल पालेकर म्हणजे काही कोणी चिल्लर खचाण्यापुचाण्या नाटकवाला नव्हे; तो आहे खंदाखास नवनाटकराव. केवळ काही नवी, प्रायोगिक नाटके बसवणे एवढ्यापुरतीच त्याची नाट्यदृष्टी चिंचिचोळी नाही; तर प्रायोगिक रंगभूमी ही एक सर्वंकष कलात्मक – सामाजिक – सांस्कृतिक सुधारणेची चळवळ (चुळबुळ नव्हे) आहे, अशी त्याची श्रद्धा आहे. गेल्या आठ–दहा वर्षांत त्याने जे केले आणि आत्ता तो जे करतो आहे व पुढे करतच राहील तो या व्यापक श्रद्धेचा प्रत्यक्ष कृतिरूप पुरावा होय. अनेक मराठी–हिंदी नाटकांतून त्याने जबाबदारीच्या भूमिका केल्या. ईर्षेनेसुद्धा कोणी हाती घेतली नसती अशा नाटकांचे यशस्वी निर्मितिसंकल्पन केले. 'थिएटर युनिट'शी संबंध कायम ठेवून स्वतःची 'अनिकेत' ही वेगळी संस्था उभारली. 'अवध्य' आणि 'राव जगदेव मार्तंड' या व्यावसायिक नाटकांचे दिग्दर्शन केले. संधी सापडेल तेथे या विषयावर कळवळून भाषणे केली. कॉफीहाऊसमधल्या नाट्यविषयक चर्चेची गरमागरमउकळती कॉफी कधी थंड होऊ दिली नाही. महाराष्ट्रात जिकडेतिकडेचोहीकडे नाट्यशिबिरे घेतली. अनेक मित्र जोडले; आणि त्यापेक्षा कितीतरी पट अधिक शत्रू जोडले. 'कोणीही यावे टपली मारून जावे' असे लेख वेळोवेळी लिहून नकाघाटि (नटीच्या काखेतला घाम टिपणारे) समीक्षकांना समज दिली. पुष्कळ पैशांचा कढीपत्ता केला. हे सोडा. तत्त्व तत्त्व माझे तत्त्व, असा ध्यास घेऊन महाराष्ट्रराज्याच्या प्रयोगपरिनिरीक्षणमंडळाशी न्यायालयात लढाईसुद्धा खेळली.

आपल्या तत्त्वासाठी अशी लालभडक लढाई करणारा अमोल पालेकर एकमेव एकटा, शिखरावरचा बावटा होता. त्याच्या अवतीभवतीच्या रंगभूमीच्या ज्येष्ठ–कनिष्ठ हौशी–धंदेवाईक, नव्या–जुन्या, फुटकळ–फर्जंद पाईकनाईकांनी खासगी वा अखासगी सेन्सॉर्सशी गुलाबी–गुलबक्षी तडजोडी करून आली वेळ निभावून नेली होती. 'सखाराम बाईंडर' सादर करणाऱ्या कमलाकर सारंगांनी, चंपाच्या लुगडे बदलायच्या *लांब(व)लेल्या दृश्याला* संक्षेप दिला; 'गिधाडे' करणाऱ्या डॉ. श्रीराम लागूंनी, माणकूच्या पातळावरच्या रक्ताचा डाग हिरवा अथवा निळा दाखवून तो तांबडा समजावा अशी सूचना रसिकांना जाहिरातीतून केली; विजय तेंडुलकर आणि जब्बार पटेल यांनी, 'घाशीराम कोतवाल'मधील मराठा सरदार आणि ब्राह्मणी हा प्रवेश गाळून टाकला; उद्धव देसाईलिखित आणि विजय बोंद्रेदिग्दर्शित 'पिन टु पियानो' हे नाटक गेल्या वर्षी राज्य नाट्यस्पर्धेत न करायचा निर्णय 'गॉसिप ग्रूप' या संस्थेने घेतला; 'सोफा कम बेड' लिहिणारे आणि त्याचे सत्यदेव दुबेच्या 'धाडसी धोंडूच्या धांदली'च्या बरोबरीने समांतर प्रयोग करणारे अच्युत वझे यांनी सेन्सॉरच्या सूचनांना संमती दिली, तर 'काळ काम वेग' ही नाटिका लिहिणाऱ्या नाशिकच्या श्रीकांत इलदुल्यांनी त्या सूचना शिरसावंद्य मानल्या; (अगदी अलीकडे, वसंत कानेटकरांनी, शिक्षिकांची तथाकथित बदनामी करणारे 'कस्तुरीमृग' नाटकातील एक वाक्य, त्यांची इतराजी नको म्हणून, अनावश्यक मानले.) फक्त अमोल पालेकरांनी 'वासनाकांड' हे नाटक आपल्याला हवे होते तसेच सादर केले. आपण करतो तसे 'वासनाकांड' नाटक करण्यात एक कलात्मक अपरिहार्यता आहे आणि सेन्सॉरने आदेशिलेल्या शिफारशी स्वीकारल्यास त्या कलात्मक अपरिहार्यतेला हायहाय बाध येईल, असा कडकडीत पवित्रा घेऊन त्या नाटकाचे खासगी प्रयोग त्याने केले.

या लढाईत नाटककार महेश एलकुंचवार यांची सर्वसाथ अमोलला लाभली. त्यामुळे तो सच्चा मराठी नाटककार नव्हेच, अशी टीका कित्येकांनी केली. अमोल पालेकर आणि महेश एलकुंचवार यांच्या मित्रांनी,

चाहत्यांनी, हितचिंतकांनी टमटम टाळया वाजविल्या, मसंतीचे पटके उडवले, कौतुकाचा गुलाल उधळला, आनंदहास्याच्या फटाके-माळा लावल्या.

मी हे सगळे अगदी जवळून पाहत होतो. क्वचित त्यात ओढलाही जात होतो. पण मनातून मी अस्वस्थ होतो. अमोल आणि महेश यांचा कलावंताड ताठपणा मला मानवण्यासारखा नव्हता. त्यांची भूमिका गलत नसेल कदाचित; नव्हे ती अगदी निखालस बरोबर असेल; पण सेन्सॉरवाले आपले वैरीच आहेत, अशी जी भावना तिच्यातून फणफणायची तिने मी व्यथित व्हायचो. सेन्सॉरवाले कोणी परके थोडेच होते? आपल्यातले होते ते; आपलेच होते. खरे तर सेन्सॉरवाले म्हणजे आपणच होतो. फक्त समोर, टेबलाच्या त्या बाजूला बसलो होतो म्हणून वेगळे वाटत होतो. एरवी आपण सगळी या एकाच रंगभूमाऊलीची धडपडणारी लेकरे, होय ना? त्यामुळे अमोल-महेश यांनी तडजोड करावी, अशी प्रार्थना मी वेळोवेळी करायचो. 'अहिंसा परमो धर्मः' असे म्हणणारे गौतम बुद्ध, 'लव्ह दाय नेबर' असे सांगणारा येशू ख्रिस्त, 'कुठलीही तात्त्विक भूमिका ही कुठल्याही जडजोडीशिवाय तुम्हाला पुढे नेता येत नाही,' (ललित: 'मे, १९७६) असा संदेश देणारे भगवान विजय तेंडुलकर आणि 'आपण एकमेकांना संपूर्ण करण्यासाठी असतो, संपवण्यासाठी नाही,' ('लोकसत्ता': २२ ऑगस्ट १९७६) असा मंत्र उच्चारणारे आचार्य प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी यांच्यासारख्यांच्या बहुजनहिताय शिकवणुकीवर माझा परचुटण पिंड पोसलेला असल्यामुळे असेल, पण तडजोड ही एकुणच मला फार्फार मोलाची गोष्ट वाटते. आपल्यासारख्या सुसंस्कृत लोकशाहीमध्ये तर विशेषच मोलाची. किंबहुना, तडजोड म्हणजेच लोकशाही; तडजोड म्हणजेच सुसंस्कृतपणा लढाई आणि विजयामध्ये नशा आणि उन्माद असेल, पण तह आणि तडजोडीमध्ये असणारी शांती आणि समाधान त्यात नाही. तत्त्वनिष्ठेने तुम्ही स्वत:चे मोठे होत असाल; पण तडजोडीने तुम्ही दुसऱ्याला मोठे करता स्वत:चे मोठेपण न गमावता!

पण अमोल आणि महेश यांना तत्त्वनिष्ठेची झिगझॅग झींग चढली होती.

त्यामुळे अमोल पालेकरांनी दीडदोन महिन्यापूर्वी महेश एलकुंचवारांचे 'पार्टी' हे नाटक तालमीत घेतले तेव्हा मला दीडदोन वर्षांपूर्वीची 'वासनाकांड' नाटकाची भव्योदात्त कहाणी आठवून मी अगदी घाबराघुबरा होऊन गेलो होतो. वाटले, इतिहासाची पुनरावृत्ती होणार, कारण ऐतिहासिक वीरपुरुष तेच आहेत, त्यांच्यापुढचा गनिम (?) तोच आहे. आणि शाहिरांचा आवाज जरा बसलेला असलेला तरी मर्दुमकीचा पोवाडा ऐकायला मर्दमराठी नाटचरसिक हाऊसफुल्ल हाजिर आहेत. मराठी रंगभूमाऊलीच्या सौभाग्याने तसे काही झाले नाही. म्हणजे सेन्सॉरना 'पार्टी' नाटकाची शंभर सुवर्ण मोहरांची थैली जशीच्या तशी शिक्कामोर्तब करून दिग्दर्शक-निर्मितीसंकल्पक अमोल पालेकर आणि लेखक महेश एलकुंचवार यांच्या हातात ठेवली असे नव्हे. तिच्यातल्या पाचसात सुवर्णमोहोरा त्यांना चलनयोग्य वाटल्या नाहीत. त्या तेवढया बदलून घ्याव्या, अशी विनवणी सेन्सॉरनी केली. अमोल पालेकर आणि महेश एलकुंचवार–दोघांनाही मोहोरा, सेन्सॉरला हव्या होत्या तशा, बदलून नाटकाची शंभर मोहरांची थैली जमवली आणि चलनयोग्य केली. मोहोरा अशा बदलणे, ही एक कलात्मक अपरिहार्यता आहे असे त्यांनी मानले.

हे कळल्यावर कलहप्रिय टोकांडी मंडळी कदाचित अमोलची निर्भर्त्सना (हा झकास शब्द महाभारतात आणि पौराणिक नाटकाकादंबऱ्यातच फक्त वाचायला-ऐकायला मिळतो. त्याची दुर्मिळता ध्यानी घेऊन इथे तो मुद्दाम योजला आहे.) करतील. अमोलने ती एका कानाने ऐकावी आणि दोन्ही कानांनी सोडून द्यावी. माझी अवस्था मात्र आनंदाच्या उकडीत आनंदाचे पुरण भरलेल्या मंगलमोदकासारखी झाली आहे! अमोल पालेकर आणि महेश एलकुंचवार यांचे 'वासनाकांड' हे नाटक वयात आलेले मराठी नाटक असेल. नसेल; पण 'पार्टी' नाटकाचे अमोल पालेकर आणि महेश एलकुंचवार हे वयात आलेले मराठी नाट्यसेवक आहेत हे निश्चित. *गेल्या* दोन वर्षात त्यांच्या खरखरमुंड्या स्वभावात हे जे स्निग्ध परिवर्तन झाले ते मराठी रंगभूमीवरील एक प्रसादचिन्ह ठरेल, अशी माझी धारणा आहे. आता हे कलावंत कलेच्या आणि सामाजिक-सांस्कृतिक बांधिलकीच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने पोक्त आणि जबाबदार, प्रौढ आणि समजूतदार, विवेकी आणि अब्रूदार झाले आहेत.

आणखी असे की अमोलसारखी तत्त्वतुंग माणसे, कलात्मक अपरिहार्यतेसाठी, तडजोडीसारखे जे काही करतात ती आपल्या सारख्यांना तडजोड वाटली तरी तो असतो समन्वय. समन्वयाचा अधिकार केवळ अशा तत्त्वतुंग माणसांनाच आहे, असे जंबुकोपनिषदात सांगितले आहे. समन्वय हा तत्त्वपालनाचाच एक प्रकार मानला आहे. समन्वयाला तडजोड समजणे म्हणजे श्रीखंडाला दहीसाखर समजण्यासारखे आहे! छे छे, अशी चूक आपण करता कामा नये. समन्वयसाधक अमोल पालेकरांनी 'वासनाकांड' मधील मशाल बाजूला सारून आता बॅटरी हाती धरली आहे. मशालीपेक्षा ती जास्त उपयुक्तच नव्हे तर कलात्मकसुद्धा आहे. तिच्या आल्हाददायक प्रकाशात प्रायोगिक रंगभूमी आता कोठल्या कोठे जाऊ शकेल. शिवाय, 'डनहिल'च्या धुराचाही त्रास या बॅटरीला होणार नाही. (हाहाहा हाहाहाहा)' ◻

## ◻ सायरा बानूचा नवरा

भारतीय राजकारणात एके काळी ज्याप्रमाणे लाल–बाल–पाल अशी त्रिमूर्ती गाजून राहिली होती त्याप्रमाणे अगदी परवापर्यंत हिंदी चित्रपटात राजकपूर–देवआनंद–दिलिपकुमार हे त्रितारे तेजाळून राहिले होते. *यांतील लाल कोण, बाल कोण, पाल* कोण हे ठरविण्याचे कोडेकाम मी वाचकांवर विश्वासाने सोपवतो आहे. त्रिताऱ्यातील राजकपूर आणि देवआनंद अजून भगभगताहेत. आकाशातील आपल्या वतनवाडया ते अजून सांभाळून आहेत. दिलिपकुमारचे तसे नाही: म्हणजे तो अगदी निखळून पडला आहे असे नव्हे; पण आहे तो डकवल्यासारख्या राहिला आहे. कधी कधी तर 'सायरा बानूचा नवरा' असे त्याचे वर्णन केले जाते, यात सगळे आले.

हा सायरा बानूचा नवरा दिलीपकुमार एके काळी फार मोठा अभिनेता होता याचा इतर साऱ्यांना विसर पडला तरी सहृदय

मराठी नाटकवाल्यांना तो कधीही पडला नाही. मराठीतील बहुतेक नट–नटुरडे दिलिपकुमारांकडे बघत बघत अभिनय करत गेले, असे आमचे मित्र म्हणतात, ते खरे असावे. त्यामुळे बहुतेक मराठी नाटकांच्या महोत्सवी प्रयोगांना दिलिपकुमार प्रमुख पाहुणे म्हणून लाभत असतात. दिलिपकुमारना वेळ असतो म्हणून त्यांना मराठी नाटकवाले बोलावतात या कुत्सित अफवेवर अनंतराव तरी विश्वास ठेऊ शकत नाही : कारण अनंतराव नाटकवाल्यांनाही ओळखतात; दिलिपकुमारलाही ओळखतात; अफराबाजांनाही ओळखतात.

'घाशीराम कोतवाल'च्या शंभराव्या प्रयोगाला दिलिपकुमार प्रमुख पाहुणे होते; 'जंगली कबूतर'च्या पावणेदोनशेव्या, म्हणजे शतकोत्तर रौप्याधिकसुवर्णमहोत्सवी प्रयोगाला, दिलिपकुमारच होते; 'कस्तुरी मृग'च्या हीरकमहोत्सवालाही हेच. हे सोडा. परवा, परवा 'रूपवेध'च्या 'उद्ध्वस्त धर्मशाळे'च्या छबिलदासमधील प्रयोगाला ते येणार होते; पण काही अपरिहार्य कारणामुळे येऊ शकले नाहीत. (पण अपरिहार्य कारणामुळे पुन्हा येणार आहेत.) दिलिपकुमार येणार म्हणून 'रूपवेध'च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य 'ठेवणीतल्या पोशाखात महोत्सवी वदनाने छबिलदासभर वागडत होते.

दिलिपकुमारना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात एक ठळक फायदा हा असतो की प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे काहीतरी सांगायची चर्पट–चलाखी ते करत नाहीत. (पुणे–मुंबई–कोल्हापूर–नागपूर–वणी–नांदेडच्या विद्वान प्राध्यापकांनी हा गुण घेण्यासारखा आहे). नाटक तेंडुलकरांचे असो, कानिटकरांचे असो, वसु भगतांचे असो; संस्था धंदेवाईक असो, प्रायोगिक असो; पुण्याची असो, मुंबईची असो; दिलिपकुमार दोनतीन गोष्टी अगदी आवर्जुन सांगतात : एक म्हणजे मराठी नटांकडून त्यांना खूपखूपखूपखूप शिकायला मिळते; दुसरे असे की मराठी नट–नाटककारांची नावे त्यांनी आधीच इंग्लंड–कॅनडात ऐकलेली असतात. (मराठी नटांकडून दिलिपकुमारना खरोखरच खूपखूपखूपखूप शिकता येईल; पण शिकलेले उपयोगात आणण्याची संधी त्यांना केव्हा मिळणार आहे कुणास ठाऊक. अर्थात कितीतरी गोष्टी आपण उपयोगात न आणण्यासाठीच शिकून ठेवतो, नाही का ? मराठी माणूस ज्याला इंग्लड–अमेरिका म्हणतो त्याला हा सायरा बानूचा नवरा इंग्लंड–कॅनडा म्हणतो, ही एक गंमतच आहे, नाही ?)

दिलिपकुमारांच्या भोवतालच्या पैसे–प्रसिद्धीच्या झगमगाटाला भुलून मराठी नाटकवाले त्यांना बोलावतात, हे आमच्या आणखी एका मित्राचे म्हणणे मला निखालस अमान्य आहे : अहो, मराठी रंगभूमी स्वयंभू–श्रीमंत आहे. तिची कलानिष्ठा नेहमीच बावनकशी राहिली आहे. तिची तपःपूत सेवा करणाऱ्या नट–नटी याच तिच्या हिरे–हिरकण्या. लोकांच्या फायद्यासाठी नाटके चालवताना स्वतः तोट्यात चालणाऱ्या नाट्यसंस्था हेच तिचे अलंकार. आजवर शेसव्वाशे वर्षे बजावलेली सेवा हेच तिचे फिक्स्ड डिपॉझिट. आणि लाखो मराठी माणसांची कृतज्ञ अंतःकरणे हेच तिचे बँक–लॉकर्स ! (व्वा. व्वा. व्वा.)

—अनंतराव


# युनिट ट्रस्टमध्ये गुंतवा

युनिटस् म्हणजे


- गुंतवणुकीची सुरक्षितता
- वाढता लाभांश. युनिटस्नी ३० जून १९७६ अखेर ८.७५ टक्के लाभांश देण्याची घोषणा केली आहे.
- रु. २०००/– पर्यंत प्राप्तीकरात व रु. २५०००/– पर्यंत संपत्तीकरात सूट.
- त्वरित रक्कम मिळू शकते. आपण आपली युनिटस् युनिट ट्रस्टला जुलै महिन्याखेरीज केव्हाही परत विकू शकता.

UNIT TRUST OF INDIA
उन्नतियोगात् समृद्धिः

विशेष माहितीसाठी लिहा :

**युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया**

४५, वीर नरीमन रोड,
मुंबई ४०० ०२३.


दबक्या पावलानी चढायचा रात्रीचा जिना
समोरच्या नवविवाहितांची सदैव बंद खिडकी
आजीबाईच्या सोप्याचं सताड उघडं दार
बागेतल्या वळचणीतलं 'रंग ओला आहे' वालं
एकुलतं एक बाकडं
क्लबच्या हिरवळीवर सुस्तावलेल्या खुर्च्या
गुळगुळीत पुस्तकांचं प्रदर्शन करण्यात
धन्यता मानणारं शेल्फ
अडगळीत न टाकता येणारं दुभत्याचं कपाट
जड, हलकं
आतुन बाहेरून
फिरवून बदलून
वैयक्तिक चोचले बिनबोभाट पुरवणारी
उबदार जवळीक देणारी
लाकडाची अशी,
एक खाशी दुनिया
NEROLAC
ACRYLIC EMULSION
NEW SOLDIER
NEROLAC
आणि तिच्यासाठी फक्त नेरोलॅक
U-GNM-21

तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( भाग १० )

# वात्स्यायन

दि. बा. मोकाशी

## पुन्हा पाटलिपुत्र

अंगरिक्ष वासंतिकेला मार्गी ठेवून त्यांनी पहाटेच ययातिनगर सोडले.

ताम्रलिप्ती नगरीच्या वाटेवर वात्स्यायन म्हणाला,

'कथ्थक ! मला एकच हुरहुर लागली आहे. माझ्याजवळची सुवर्ण नाणी आणि अलंकार मी त्या दोघांसाठी ठेवून जाणार होतो. अपरात्री ते तुला त्यांच्या दाराशी ठेवून यायला सांगणार होतो. पण मग वाटलं, त्यांनी आपला स्वतंत्र मार्ग काढला आहे, तर त्यांना अवंतीची नि आमची कटु स्मृती तरी कशाला ठेवायची ! ही माझी भेट त्यांना दु:खाचीच झाली असती. तुला काय वाटतं ?'

कथ्थक म्हणाला, 'तू योग्य तेच केलंस. त्या दोघांना पाहून माझे डोळे पाणावले. अरे ! दहा कथ्थक आले किंवा प्रत्यक्ष गुणाढ्य अवतरला तरी, या कथेचा शेवट त्याला असा करता आला नसता. निश्चितच तुझी भेट त्यांच्या आनंदात विरजण घालून गेली असती. राज्य मिळूनच नायक सुखी होतो असे नाही. नवीन जग उभं करण्याचा आनंद राज्याहूनही मोठा आहे. आता सारी ताम्रलिप्ती मी या कथेनं गदगदून टाकतो बघ.'

वात्स्यायन म्हणाला,

'मला ती ऐकायला मिळणार नाही. पण ती लोकप्रिय होवो. मी ताम्रलिप्तीत थांबणार नाही. मी एकटा पुढे पाटलिपुत्रास जाऊन तेथून एखाद्या व्यापारी संघाबरोबर अवंतीस आणि घरी जाईन.'

ताम्रलिप्तीत विसाव्याची रात्र काढून वात्स्यायन भल्या पहाटे निघाला. अतिशय कष्टी अंत:करणाने त्याने कथ्थकाचा निरोप घेतला. परस्परांना त्यांनी प्रेमाने मिठ्या मारल्या आणि साश्रु-नयनांनी ते दूर झाले. प्रवासातील किंचित सहवास तीव्र असतातच पण निरोप तीव्रतर असतात. कथ्थक म्हणाला होता ते खरेच.

ताम्रलिप्तीपासून पाटलिपुत्रापर्यंतचा वात्स्यायनाचा प्रवास, अवंतीला गेल्यावर अंगरिक्षाच्या घरी काय सांगायचे हे मनात निश्चित झाल्यावर, कंटाळवाणा झाला. तोपर्यंत अंगरिक्ष भेटल्याचे अवंतीत बोलावे की न बोलावे हे अनेक तऱ्हेनं मनाशी तोलून पाहिलं होतं. भावनेच्या भरात आपण अंगरिक्ष वासंतिकेला सोडून आलो का, हे प्रथम ठरवायला हवं. विचारांतीच आपण ते केलं. निदान त्यांना भेटून यायला हवं होतं का? तेही चुकलं नाही. दोघं आलीच नसती. 'मामा ! इथं किती छान आहे !' वासंतिक म्हणाली असती. मात्र आपण इथून गेल्यावर, अवंतीला जाऊन त्यांचा ठिकाणा आपण घरी सांगू या भीतीनं त्यांनी ययातिनगर सोडले असते. पुन्हा नवी गावं, पुन्हा पाठलागाची भीती यात दोघांची अवस्था करुण झाली असती.

दोघे भेटलेच नाहीत–प्रवास निष्फल झाला, असं सांगायचं. त्यानं निश्चित केलं.

पाटलिपुत्रात आल्यावर वात्स्यायनाने प्रथम गाडीतळावर जाऊन अवंतीला जाणाऱ्या व्यापारी संघाची चौकशी केली. दुसऱ्या दिवशी दिवशी पहाटेच एक जथा निघणार होता. सार्थवाहाला भेटून त्याने आपले नाव दिले. मग तो पाटलिपुत्रात आला.

त्याला सोमलाला भेटायचं होतं. कर्णीपुत्राला भेटायचं होतं. त्याला वेशाधिकाऱ्याला भेटायचं होतं. त्याला गरम आणि थंड आंबे फेकणारी तरुणी पाहायची होती. आणि पुन्हा एकदा गोष्ठीसमवायात बसायचं होतं. शोध संपला. आता मन मोकळं होतं. गुरुगृहाहून सणानिमित्त दोन दिवस घरी यावं तसं. ब्रह्मदत्ताचं–'न कामांश्चरेत' पुन्हा ऐकायचं होतं.

प्रथम सोमलाकडे जाण्याचं ठरवून तो तिकडे वळला. सोमलाच्या दाराशी येताच त्याला विचित्र भावना आली. सोमलाचे उद्यान सुकून गेले होते. आणि घर शांत होतं. त्यानं पुढे होऊन हाक मारली.

दासी पुढे आली. आणि त्याला पाहताच तशीच उभी राहिली. मग तिची मान खाली झाली आणि डोळ्याकडे हात नेऊन ती हुंदके देत म्हणाली,

'महाराज ! सोमल आपल्या जगातले राहिले नाहीत.'

सोमल परलोकी ! वात्स्यायन क्षणभर गडबडून गेला. इतक्या आनंदी, खेळकर मानवास मृत्यूने स्पर्श करण्यास धजावे ! केवळ वर्षापूर्वीच इथं आपण अतिथी म्हणून आलो होतो. त्याला वाटले, आत जाऊन गोष्ठीसमवाय ज्या खोलीत झाला तिथल्या, सोमलाच्या प्रशस्त चौरंगाचे दर्शन घ्यावे. पण ही बाग गेली तसे ते चौरंगही उरले नसतील. बाभ्रव्याचा पाटलिपुत्रातला एकमेव शिष्य गेला. आता ब्रह्मदत्ताला आवेश चढेल. आता तो 'न कामांश्चरेत' म्हणत बाभ्रव्याची कामसूत्रे फेकून देईल. त्याच्यासारखे शेकडो सनातनी त्याला मिळतील. पाटलिपुत्रातील कामशास्त्राचा अभ्यास लयास जाईल.

खाली मान घालून तो वळू लागला. तोच दासी म्हणाली;

'थांबावे महाराज!'

ती धावतच आत गेली. काही क्षणातच धावत बाहेर आली. रेशमी वस्त्रात गुंडाळलेला ग्रंथ तिच्या हातात होता, वर एक लेखणी होती. वात्स्यायनाच्या दोन्ही हाती देत म्हणाली,

'महाराज! सोमलांनी या दोन वस्तू आपण कधी इकडे आलात तर आपणास देण्यास सांगितल्या होत्या. त्या घ्याव्यात.'

तो बाभ्रव्याचा ग्रंथ होता याविषयी संशय नव्हता. आणि लेखणी! ती कशासाठी? वात्स्यायनाचे ऊर भरून आले. जो तो आपली पात्रता नसता आपल्याला ग्रंथ लिहिण्याचा आग्रह करितो आहे. त्याने दोन्ही हात पुढे करून आदराने ग्रंथ स्वीकारला. आणि सोमलाच्या गोष्टीसमवायच्या खोलीकडे पाहून ग्रंथ कपाळाशी नेऊन नमस्कार केला.

ग्रंथ उराशी धरून तो बाहेर आला. मार्गाने जात असता, अजूनही तो भारलेला होता. त्याला पाटलीपुत्राच्या नागरिकांना ओरडून सांगावेसे वाटत होते– नागरिक हो! हा बाभ्रव्याचा ग्रंथ तुमच्या नगरीतून बाहेर चालला आहे. कुणीतरी येऊन ग्रंथ माझ्या हातून काढून घेऊन म्हणा– 'वात्स्यायन! हा ग्रंथ आमच्या नगरीचे भूषण आहे. हा तुला नेता येणार नाही. हा ग्रंथ इथून नेलात तर आमच्या जीवनात अंधेर पसरेल.'

'या कुणीतरी या' तो मनात ओरडला. 'तुमचा अमूल्य ग्रंथ नगरी सोडून जातो आहे. सावध व्हा! आता कामशास्त्र शिकू नका म्हणणारांचे फावेल. तुम्हाला कळत कसे नाही?'

पण वात्स्यायनाच्या मनाचा आकांत व्यर्थ गेला. गाडीतळाशी तो पोहोचला तरीही त्याच्या हातांतील ग्रंथाबद्दल कुणी कुतूहल दाखविले नाही.

दुसरे दिवशी व्यापारी संघाबरोबर अवंतीच्या दिशेने वात्स्यायनाच्या प्रवासास आरंभ झाला. ¤

## पुन्हा स्वप्न

सप्ताह गेला.

आणि प्रवासाच्या आठव्या दिवशी, रात्री वात्स्यायनाला पुन्हा एकदा पूर्वी पडणारे भयंकर स्वप्न पडले.

स्वप्नाला आरंभ झाला तो घोड्याच्या टापांनी. 'स्वार आला– स्वार आला' कापरे सुटून तो एका कोपऱ्यात लपला. स्वाराचा काळा घोडा फुरफुरत, थयथयत घरासमोरच काही अंतरावर उभा राहिला, धूळ उसळली, पक्षी उडाले. त्या प्रचंड देहाच्या स्वाराने घोड्यावरून जमिनीवर उडी घेतली आणि एक हात घोड्याच्या पाठीवर ठेऊन दुसऱ्या हाताने मिशांना पीळ देत, काळेभोर डोळे घराच्या दारावर रोखून तो उभा राहिला. दुसऱ्याच क्षणी आतील खोलीतून त्याची पत्नी धावत बाहेर आली. धाडकन दार उघडून ती स्वाराकडे उन्मत्त धावली. थरथर कापत, घाम निथळत असता तो गवाक्षाशी जाऊन पाहू लागला. स्वाराशी जाऊन तिने त्याच्या गळ्यांत हात टाकले. मग एका हाताने तिला कवटाळून दृढ आलिंगन देत स्वाराने तिचे दीर्घ चुंबन घेतले. चुंबनानं त्याची पत्नी विकलांग होऊन स्वाराला आणखी बिलगली. मग एका हाताने घोड्याची आयाळ धरून दुसऱ्या हाताने त्याच्या पत्नीचा विकलांग देह उचलून स्वाराने घोड्यावर उडी घेतली व क्षणात टाच मारून तो वळणावर अदृश्य झाला.

निथळत्या घामात वात्स्यायन या स्वप्नातून जागा झाला. त्याची गात्रे गळाली होती. सुन्न होऊन तो तसाच बसून राहिला. का हे स्वप्न पुन्हा पडावं? मना! अजून तुझं काय राहिलंय? का छळतो आहेस? इतका काळ पत्नीपासून स्वेच्छेने आणि संयमानं दूर राहिलो नाही का? शोध अर्धा टाकून मला परतता आलं असतं. पण तो शेवटाला जाईपर्यंत असा दूरदेशी भटकत राहिलो. मोहांना दूर लोटले. आठव ती दासी! मांडीवर येऊन बसली होती. महेश्वरदत्ताला अपघात झाला तरी शोध सोडला नाही. महेश्वरदत्त आता नगरीत माझ्या घरी असेल.

महेश्वरदत्त! दचकून वात्स्यायन ताठ झाला. तोच तो स्वार! अरे मूढा! तुला स्वप्नांतली सूचकतासुद्धा कळू नये! तो स्वार महेश्वरदत्तच. कसे ते बघ! त्याचा पाय सुश्रुताच्या शिष्याने बरा केला असेल. मग तू शपथ घातल्याप्रमाणे तो नगरीस तुझ्या घरी येऊन राहिला असेल. तुझ्या घरी, तुझ्या मुलांना भोवताली घेऊन तो वाटिकेत बसला असेल. तुझी पत्नी त्याला भोजनासाठी हाक मारील. मुलांना तो लाडावून ठेवतो आहे म्हणून खोटे रागावेल. मग भोजनास बसल्यावर ती त्याला, 'एवढं कमी खाऊन कसं चालेल, हा मुरंबा चांगला मुरला आहे थोडा तरी घ्या' असे, तुला म्हणते तसे त्याला म्हणत आग्रहाने वाढील. मग वामकुक्षी करायला तो खोलीत गेल्यावर मुलांना गडबड करू नका म्हणून दटावील. दुपारच्या झोपेनंतर सायंकाळपर्यंत तो घराच्या आवारात काम करील. तुझ्या पत्नीने रात्री मुलांना झोपवल्यावर दोघे भोजन घेतील. भोजनानंतर दोघे सुखदुःखाच्या वार्ता करीत बसतील. वार्तालापांत बरीच रात्र सरेल. येत असलेल्या निद्रेमुळे तुझ्या पत्नीने आळस दिला असेल. तेव्हा तिचे स्तन वरखाली झाले असतील. त्यांच्याकडे महेश्वरदत्त पाहत असता, ती दाराकडे जात, महेश्वरदत्ताकडे एक कृतककोपाचा कटाक्ष टाकील. ती दाराकडे गेल्यावर महेश्वरदत्ताने तिच्या नितंबाकडे पाहत दीर्घ निश्वास टाकला असेल. तुझी पत्नी दाराशी थबकली असेल. महेश्वरदत्ताने एक हात पुढे केला असेल. तेव्हा कामेच्छा न आवरून, मागे परतून तुझ्या पत्नीने धावत जाऊन त्याला आलिंगन–

नाही नाही! तडपून उठत वात्स्यायन स्वतःवर ओरडला, तू विपरित कल्पना करतो आहेस. स्वप्नातील घोडेस्वाराचा आणि महेश्वरदत्ताचा काय संबंध? महेश्वरदत्त तुझा बालमित्र आहे. मूढा! कल्पना करणं पुरे कर. आठव! गेल्यावेळी तू पाटलीपुत्राहून आलास तेव्हा तुझी पत्नी व्रताने राहून तुझी वाट पाहत होती. त्यावेळचे तिचे तुझ्या वक्षस्थळावर डोके टेकून सुखाचे रडणे, आणि नंतरचा तिचा तुझ्याइतकाच कामावेग. तो विरहानंतरचा नव्हता काय?

तेव्हा असेल. खुळ्या! तुला महेश्वरदत्ताचे लाघवी बोलणे ठाऊक

नाही काय ? मोठ्यामोठ्या चतुर गणिका त्याने बोटावर खेळवल्या आहेत. त्याने अनेक पुरुषांना कामलीला शिकविल्या आहेत. विरहाने कामतप्त असलेल्या स्त्रीला तर तो क्षणात आपली करील. गोड गोड बोलेल, कळवळ्याने बोलेल. म्हणेल ' तुझी प्राप्ती न झाल्यास माझा प्राण जाईल. माझा प्राण वाचवणं तुझ्या हाती आहे, '

एखादा स्पर्श—एखादा निश्वास आणि क्षणार्धात आपला हेतु तो साध्य करून घेईल. तू भलत्या माणसावर विश्वास टाकलास. महेश्वरदत्ता-बद्दल संशय मनात शिरला त्या क्षणापासून वात्स्यायनाच्या यातना प्रवासास आरंभ झाला. जे मन त्याला विचार कर सांगत होते त्याला त्याने केव्हाच गप्प केले. अंवती सहा दिवसांवर राहिली, पाच दिवसांवर राहिली, चार दिवसांवर आली असे जथ्यांतले लोक म्हणत असता त्याला ती तितकीच वर्षे दूर रहावीशी वाटू लागली. एकदाच आरंभी त्याच्या मनात आले की मागचा सार्थवाह असता तर त्याने योग्य विचार सुचविला असता. पण दुसऱ्या मनाने तो निरुपयोगी ठरवला. ज्या सार्थवाहाने स्वतःच पत्नीचा वध केला. तो काय सांगणार ? महेश्वरदत्ताला आपण संगतीला बोलावलं हेच चुकलं आपल्या पित्याशी तुलना करूने आपण त्याला उच्च करीत गेलो. काही कारण नसता सहानुभूतीने आपण भारलो. अंती सर्व विट सारखेच हे आपल्या ध्यानात आले नाही. त्यांचे स्वतःच्या पत्नीशी सख्य नाही हे विसरलो. आयुष्यभर तिला यातना दिल्या, त्याबद्दल आपण बोललो नाही. आणि सर्वांत चुकले ते आपण त्याला आपल्या घरी रहायला जायला सांगितले. ती आपली फार मोठी चूक. पुढे काय होणार हे तेव्हाच ध्यानात यायला हवे होते. आपल्याला यावेळी पडलेले स्वप्न त्याचेच आणि मागे अशी स्वप्ने पडत ती याचीच सूचक. स्वप्नातला घोड्यावरून आलेला स्वार महेश्वरदत्तच. आपली पत्नी धावत जाऊन त्याच्या बाहु पाशांत—

मग महेश्वरदत्ताने आपल्या पत्नीला कसा मोह घातला असेल हे तो वारंवार मनाशी उगाळू लागला. गेल्या विरहाच्या नंतरच्या पहिल्या रात्रीत ज्या ज्या कामक्रीडा पत्नीने आपल्याशी केल्या त्या त्या तिने महेश्वदत्ताशी केल्याचे बघू लागला. आणि त्या रात्रीत ज्या ज्या क्रीडा आपण पत्नीशी केल्या त्या त्या महेश्वरदत्ताने केल्याचे पाहू लागला.

त्या असह्य झाल्या तेव्हा डोके दोन्ही हातात गच्च दाबून तो ओरडला,

" आवर, आवर ! कल्पना आवर—मूर्खा ! '

कल्पना आवरल्या नाहीत आणि तापलेल्या डोक्यानेच तो अवंतीत शिरला. कदाचित या मनःस्थितीत तो सासुरवाडीस गेला नसता. पण अंगरिक्षाबद्दल त्याच्या आईस जाऊन सांगण्याचे अवघड काम मनःसंतापात, त्याला स्वतःच्या घरी जाण्यापेक्षा सोपे वाटले. अंगरिक्षाच्या आईस—' अगरिक्ष सापडला नाही. ' असे त्याने सांगताच ती आक्रोश करू लागली,—' अंगा ! तू असा कसा गेलास आईला टाकून ? तू कुठे रानात हिंडतो आहेस की रानटी लोकांनी तुला पळवून नेले आहे ? तुला वासंतिका हवी होती तर आम्ही हो म्हटलं असतं. '

तिचा असा शोक ऐकत असता कितीतरी वेळा खरे ते सांगून टाकावे असे त्याला वाटले. पण मोह आवरून चार सांत्वनपर शब्द बोलून तो बाहेर आला.

तेथून तो गुरूच्या आश्रमाकडे गेला. आपण अंगरिक्षाच्या आईशी असत्य बोललो याबद्दल त्याचं मन त्याला खात होतं. आपण दोघांना सोडून आलो यातलं योग्यायोग्य गुरू सांगतील. आणि कदाचित आपल्या मनातलं वादळ गुरू शांत करतील.

पण त्याच्या मनातलं काहीच पुरं व्हावयाचं नव्हतं. कारण गुरूच्या पर्णकुटीशी पोहीचण्यापूर्वीच त्याला कळलं की गुरूचे देहावसान झाले. दोन मास झाले. ज्या शिष्याने त्याला ही दुःखद वार्ता दिली त्यानेच त्याला गुरूची समाधी दाखवली. जाता जाता त्याने समाधीवर वहाण्यासाठी चार फुले गोळा केली.

मग समाधीससमोर हात जोडून उभा असता वात्स्यायनाच्या मनात आले, संपले ! आपणास आदराचे वाटणारे जग संपले, मार्गदर्शन संपले. सोमल गेला. गुरुजी गेले. आधीच विस्मरणात चाललेले कामशास्त्र संपूर्ण विस्मरणात जाईल. बाभ्रव्याचे कामशास्त्र कुणी शिकवणार नाही किंवा त्यावर चर्चा करणार नाही. आता कामवासना हवीतशी भागवावी असे म्हणणारे पंथ पुढे येतील. कामशास्त्र शिकवणे हास्यास्पद धरले जाईल. जे पशूंनाही सहज येते ते माणसांनी शिकावयाचे ? लोक म्हणू लागतील. अवंतीतही ' न कामांश्चरेत ' गर्जना करीत ब्रह्मदत्तासारखे तुरा लावून हिंडतील. स्त्रिया पतीला आणि मुलांना सोडून जाऊ लागतील किंवा पती दूरदेशी गेलेला पाहून आपल्या पत्नीप्रमाणे पतीच्या मित्राला जवळ करतील.

त्याला वाटले समाधीतून गुरूचे डोळे स्निग्ध दृष्टीने आपल्याकडे पहात म्हणत आहेत,

' वात्स्यायना ! शांत हो. ऐक स्त्री ही तिटकारा वाटेल अशी असली तरी तिच्याशी प्रेमाने रहावे. कारण तिच्यापासून संतती होते व मानववंश राहतो. कामसूत्रे पुन्हा लिहिण्याची वेळ आली आहे. हा बाभ्रव्याचा ग्रंथ घेऊन जा. '

रागाने समाधीकडे पाठ फिरवून दूर जात वात्स्यायन स्वतःशी म्हणाला, ' शांत हो ? शांत कसा होऊ ! महेश्वरदत्त तिथे असता मन कसे शांत राहील ? गुरूवर्य ! तुम्हाला महेश्वरदत्त ठाऊक नाही काय ? ज्याने शेकडो वेश्या आणि गणिका खेळवल्या—

*आणि पुन्हा तेच तेच संतापजनक विचार मनांत आणीत, अवंती सोडून वात्स्यायन नगरास आला. तो नगरास पोहोचला तेव्हा संध्याकाळ झाली होती.* प्रथम त्याला वाटले की दूर वृक्षाआड उभे रहावे. दिवे मालवले की जाऊन दोघांना बाहुपाशांत असता चकित करावे. अरेरे ! यावेळी खड्ग हाती असते तर !

आपल्या आत्यंतिक विचाराची त्यालाच लाज वाटली. तुझ्यावर प्रवासात ऐकलेल्या कथाचा परिणाम झाला आहे. अरे ! तू का तो सार्थवाह आहेस, खड्गाने पत्नीला ठार करायला ? सरळ पुढील दाराने आंत जा.

◻

# घरी

संध्याकाळच्या पिवळ्या लाल प्रकाशात त्याने घराचे दार वाजविले.

पत्नीच दार उघडायला आली. आपल्याला पहाताच ती चकित होऊन किंचित मागे सरली का? भास असेल. 'कुठे आहे तो महेश्वरदत्त?' ओठाशी आलेला कठोर प्रश्न त्याने गिळाला. मागोमाग आंत गेला. मग स्नान आणि भोजन करताना जे बोलणे झाले त्यात त्याने मृदु स्वर ठेवला व आपल्या मनात कसलाही किंतु नाही हे दर्शविणारे 'मुले झोपली का? पीक कसे आले? दूधदुभतं ठीक येत होतं ना? असले साधे प्रश्न विचारले. आणि भोजनोत्तर बडीशेप खात असता सूर शांत ठेवण्याची परकाष्ठा करीत त्याने झटकन म्हटले,

'महेश्वरदत्त कुठे आहे?'

पण सहजपणाचा यत्न करूनही त्याचा स्वर घोगरा आला त्याला धार आली. पत्नीच्या मुखाकडे लावलेल्या दृष्टीत कठोरता आली. ती लक्षात येऊन पत्नी काहीशी आश्चर्याने म्हणाली,

'तुम्हाला ठाऊक नाही? कसं कळणार म्हणा! तुमचे मित्र केव्हाच इथून गेले.'

'गेला–इथून गेला?'

पत्नी म्हणाली,

'हो. तीनच महिने ते इथं होते. मग पाटलीपुत्राला गेले. ती सगळी गम्मतच झाली. पाय नीट झाल्यावर ते अवंतीहून इथं आले. मुलांशी त्यांचं छान जमलं. 'काका, काका' म्हणत सारखी मागे असायची त्यांच्या. लौकरच त्यांची आनंदिकेशी ओळख झाली. ती इतकी वाढली की दिवसाचे चार चार तास ते तिच्याकडे गोष्टीसमवयात, गाण्यात, वाद्यवादनात, घालवू लागले. घरी आले की मला म्हणायचे वहिनी! ही तुमच्या गावाची गणिका विलक्षण गुणी आहे. या खर्वटांत तिचे गुण वाया जात आहेत. माझे तिने ऐकले तर पहाता पहाता मी तिला अशी कलासंपन्न करीन की ती पाटलीपुत्र जिंकील. युवराज आणि सामंत आणि धनिक पुत्र तिच्याकडे लोटांगणे घालीत येऊन तिच्या पायावर धनराशी ओततील.' पुढे पुढे बहुतेक काळ तिच्याकडेच घालवू लागले. भोजनसुद्धा तिथेच घेत. मग एकदा आले आणि म्हणाले, 'वहिनी! मी परवा आनंदिकेला घेऊन पाटलीपुत्राला निघताय. मल्लनागाला सांगा आल्यावर.' आणि खरंच तिला घेऊन गेले. सारा गाव दोघानां निरोप द्यायला लोटला होता.'

पत्नीचे बोलणे ऐकता ऐकता प्रत्येक शब्दाला लज्जेने वात्स्यायनाची मान खाली चालली होती. आपण पत्नीबद्दल आणि मित्राबद्दल घेतलेले संशय आठवून त्याला वाटले, भूमीने आपणास गिळावे विवाआपण आता पत्नीपुढे किती लोटांगणे घातली तरी अपुरीच वरदत्तपुढेही.

पत्नी खोलीतली आवराआवर करीत होती. ती संपवून खोलीबाहेर जात ती म्हणाली.

'स्वयंपाकघरांतील कामं उरकून येते. येताना फलहार आणते. आसव आणू?'

त्याने 'नाही' म्हणून मान हलवली. पत्नी खोलीबाहेर जाताच त्याने डोके दोन्ही हातात गच्च दाबले. स्वतःची निर्भर्त्सना करीत तो म्हणाला, धैर्य असेल तर दोघांविषयी ज्या ज्या विपरीत कल्पना केल्यास त्या पत्नीला सांग. तू दुसऱ्यांच्या कामसेवनाची चिकित्सा करतोस, तुझ्या स्वतःच्या कामसेवनाच्या कल्पना तरी सरळ आहेत काय? तुझ्यासारख्या जाणकाराची कामसेवनात ही अवस्था तर त्यांची काय असेल? अशा अज्ञजनाना कामशास्त्र समजावून सांगावे मग दोष लावावा असे कधी तुझ्या मनांत तरी आले का? तुझे कामशास्त्राचे ज्ञान चुलीत घाल. ना त्याचा तुला उपयोग ना दुसऱ्यांना निदान आपली अवस्था झाली तशी कुणाची होऊ नये यासाठी तरी तू कामशास्त्र सांगायला हवेस. उलट गुरूने आज्ञा केलेली असूनही, कामसूत्रे लिहिण्याचे टाळून तू स्वतःच्या कामविकृति जोंवाळत काळ दवडलास. गुरू म्हणाले, ग्रंथ केव्हा लिहावा हे तुझे तुला कळेल तीच ही वेळ. पत्नी आणि मित्र यांच्या विषयी हव्यात्या कल्पना करून तू विकृतीची परसीमा केलीस. पुढची पायरी भ्रमिष्ट होण्याची. भ्रमिष्ट व्हावयाचे की मन आवरावयाचे हे तुझे तू ठरवावयाचे आहेस–पत्नी स्वयपाक घरांतून येण्याचे आंत मन आवरावयाचे असेल तर याक्षणी पहिला धडा गिरव. डोक्यावरचे हात काढ. डोळे मिट. निश्चल पड. आणि गुरूने सांगितलेला योग कर.

त्याने डोक्यावरचे हात सोडले. डोळे मिटले. देह निश्चल केला. मग स्वतःशी म्हणाला, 'आता मी संयम साधला आहे–आता मी संयम साधला आहे. विकल्प संपवले आहेत–विकल्प संपवले आहेत. मी पूर्वीचा मल्लनाग वात्स्यायन उरलो नाही. यापुढे स्वतःचा विचार नाही. ग्रंथाचा विचार. त्याने मी शांत होवो. गुरूच्या आज्ञेप्रमाणे तो लिहून होऊन लोककल्याण साधो.

मग हळूहळू शांत होत असता त्याच्या मनात आलं, मन आवरण्यासाठी, मंत्र जपावा त्याप्रमाणे आपण केलेला निश्चय जपत आहोत. असं कांही करावे लागेल असे कधी वाटलं होतं का? पण कधी तसेही करावे लागते.

पत्नी खोलीत आली तेव्हा त्याला शांत वाटत होतं.

पत्नी आत आली. तिच्या एका हातात फलांचा करंडक व दुसऱ्या हातात दुधाचे भांडे होते. वात्स्यायनाने उठून पुढे होऊन समहस्ताने तिचे दंड धरले. मागील वेळेप्रमाणेच पति आवेगाने आलिंगन देणार असे वाटून ती म्हणाली,

'ठेऊ द्या ना हे! जरा थांबा ना.'

वात्स्यायनाने हळूच तिच्या हातांतला करंडा व दुधाचे भांडे खाली ठेवले. मग दोन्ही दंडाना धरून तिला त्याने शैय्येवर आणून बसवीत म्हटले,

"ऐक धारिणी! उद्यापासून मी कामसूत्रे लिहावयास घेणार आहे. प्रातःकाळी लौकर उठून तू ग्रंथलेखनाची सिद्धता ठेवीत जा. आसन मांड. भूर्जपत्रे, लेखणी आदि ठेव. सुवासिक पुष्पमाला भोवती टांग. धूप, चंदन जाळून सर्वत्र सुवास दरवळू दे. धारणी! तोपर्यंत मी शुचिर्भूत होईन. नंतर एकचित्ताने लेखनास आरंभ करीन. तू समोर बसून रहा."

तिने विचारले, 'मी कशाला समोर?'

वात्स्यायन म्हणाला, ' सांगतो. माझ्या ग्रंथाचे मूलसूत्र 'स्त्रीपुरुषांचे कामसुख एकच असते ' असे आहे. पाटलीपुत्रांत असताना एका गोष्टीसमवयांतील चर्चेत ते मला स्फुरले. हे सूत्र सर्व कामशास्त्राचा पाया आहे. ते कळले नाही त्याला कामशास्त्र कळणार नाही. लिहिताना त्या सूत्रापासून दूर जाऊ लागलो की मला सावध कर. '

' मी काय सावध करणार ? मला काय कळतय ?'

' असं म्हणू नकोस. ज्ञान हे अनुभवांतूनच गोळा होतं. शास्त्राच्या मागे अनुभवच असतो. '

' शास्त्राच मला ठाऊक नाही. पण पुरुष स्त्रियांचं कामसुख जाणत नाहीत हें आम्हा सर्व स्त्रियांचं दुःख आहे. दोघांचे सुख एकच असते हे तुम्ही ग्रंथात सिद्ध केलेत की कामसेवनात समजूत येईल आणि पृथ्वीवरील स्त्रियांना प्रथमच खरे कामसुख मिळू लागेल. तेव्हा, तुमचा ग्रंथ यशस्वी होवो. तुम्ही काही विचारलच तर माझ्या अल्पमतिप्रमाणे मी त्याचे उत्तर देत जाईन. '

वात्स्यायन म्हणाला,

' धारणी ! हा ग्रंथ पुरा करण्याचे सामर्थ्य गुरू मला देवो. त्याला माझे वंदन. कामेच्छा फार गहन आहे. कामाचरण हे त्याहूनही गहन आहे, कामाची नाना रूपे सांगण्यास मला यश येवो. कामेच्छेने अनावर होऊन माणूस वाटेल ते साहस करतो, मृत्यूलाही कवटाळतो. कामाचे हे बल मला कळो. ग्रंथ लिहिताना मला नाना दृष्टान्त आठवोत. कामाचरणांतले योग्यायोग्य मला सांगता येवो. शास्त्र म्हणून सांगाव्या लागणाऱ्या गोष्टीत निर्भयता येवो. शास्त्र म्हणून जे जे आहे तेच मी सांगेन. म्हणजे माझा ग्रंथ वाचताना कुणाचे कामोद्दीपन झाले तर त्याचा दोष माझ्याकडे येणार नाही. कारण कुणाचे कशाने कामोद्दीपन होते हे कोण सांगणार ? हा ग्रंथ वाचून कामाचरणांतले योग्यायोग्य कळून घेऊन लोक सुखी होवोत. गुरूची इच्छा सफल होवो.

मग दुसरे दिवशी प्रातःकाळी वात्स्यायनाने ब्रह्मचर्यव्रताने ग्रंथास आरंभ केला. त्याने लिहिले,

॥ धर्म अर्थ काम यांना नमस्कार असो ॥

॥ पूर्वाचार्यांना नमस्कार असो. का की, त्यांचा कामशास्त्राशी संबंध आहे ॥

## उपसंहार

शंकराला पार्वती म्हणाली,

' महाराज ! माझ्या शापाप्रमाणे नंदीने मल्लनाग वात्स्यायन म्हणून पृथ्वीवर जन्म घेतला व कामयातना भोगल्या. माझ्या उःशापाप्रमाणे त्याने आपला ' कामसूत्रे ' ग्रंथ संपूर्ण लिहिला. आता पृथ्वीवरचे त्याचे कार्य संपले असूनही अद्यापि तो परत आला नाही त्यामुळे मला त्याची चिंता वाटू लागली आहे. '

शंकर म्हणाले,

' हे शुभांगिनी ! आपला नंदी परत आला नाही याला मीच कारण आहे. नंदीने पृथ्वीवर जन्म घेतल्यावर अत्यंत यातना भोगल्या आहेत. असे आहे की मानवाच्या चांगल्या वाईट कर्माची फळे त्याला त्याच आयुष्यात भोगावयाची असतात. पार्वती ! नंदीने पृथ्वीवर ज्या यातना भोगल्या त्याचे तिथेच परिमार्जन होऊन काही काळ त्याला सुख मिळावे असे मला वाटले. त्याने आपल्या पत्नीबरोबर सुखोपभोग घ्यावेत आणि त्याच्या ग्रंथाच्या कीर्तीचा परिमल सर्वत्र पसरलेला पहावा. कारण की मानवातील ग्रंथकार्यास कीर्तीच्या सुखाचे फार वाटते. या हेतूनेच मी त्याचे पृथ्वीवरील आयुष्य वाढवले आहे.

' परंतु प्रिये ! चिंता करू नको. मानवाचे एक वर्ष हे आपणा देवांचे केवळ निमिष होते हे तू जाणतेसच. तेव्हा काही निमिषांतच तुझा नंदी तुझ्यापुढे येऊन बसलेला तुला दिसेल.

' पार्वती ! मी आणखीही वर त्याला दिला आहे. की पुढील युगायुगात त्याच्या ग्रंथाची कीर्ती त्रिखंडात वाढत राहील. महाकवी त्याच्या ग्रंथावरून प्रणयचित्रे रंगवतील. त्याचा ग्रंथ पाचवा वेद ठरला जाईल. '

शंकराच्या भाषणाने प्रसन्न झालेली पार्वती म्हणाली—

' देवा ! तसे होवो—तथास्तु '

**स मा प्त**


**पॅ पि लॉ न**

**पॅ पि लॉ न**

**लेखक : हेन्री शॅरीयर**

**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किमत : पंचवीस रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पुस्तके

## Indian Mafia In Action

By Capt. F. D. Colabawala
(Orient, Paperback)
Pages 147, Rs. 4·50

कॅप्टन कोलाबावाला ही कुलाब्यात राहणारी एक धिप्पाड (उंची ६ फुटांपेक्षा जास्त) व्यक्ती होय. त्यांच्यासोबत जी व्यक्ती मुंबईच्या गुंडांना दिसते त्यांना गुंड हात लावत नाहीत! ब्रिटिशांनी बहुतेक विनोद-बुद्धीनेच या प्रचंड देहाला बुटक्या गुरखा रेजिमेंटचे कॅप्टन केले होते!

थोडया वर्षांपूर्वी ते 'ब्लीट्झ'मधे कामाला होते पण तिथे रुसी करंजीयांबरोबर मतभेद निर्माण झाला व त्यांनी करंजीयांवर एक झणझणीत पुस्तिकाच लिहिली! पुढे या पुस्तिकेच्या प्रती मुंबईच्या पुस्तकांच्या दुकानांतून अचानक गायब कशा झाल्या ते एक गूढच आहे.

कॅप्टन कोलाबावाला यांनी हे पुस्तक अगदी आटोपशीर लिहिले आहे, पण प्रकाशकांनी जर तेवढयाच आटोपशीर पद्धतीने ते छापले असते, तर ते आणखीनच वाचनीय झाले असते! मुख्य म्हणजे पुस्तकातील अक्षरांमधील अंतर फार जवळजवळ आहे. पण आहे त्या किंमतीत मात्र तो अगदी चांगला सौदा आहे!

कोलाबावालांनी आपले 'होम वर्क' अगदी पद्धतशीरपणे केले आहे व आपल्या देशातील गुन्हे व गुन्हेगारांचे चित्रण अतिरंजितही केले नाही किंवा मिळमिळीतही केले नाही. गुन्ह्यांचे सर्व पैलू त्यांनी घेतलेले आहेत. त्यात स्मगलिंग, नार्कोटीक्स, वेश्याबाजार, मटका, खोटया नोटा छापणे, हातभट्टी व इतर अनेक गुन्हे आहेत.

१९७१ च्या आकडयानुसार सरासरी प्रत्येक १·८ सेकंदाला आपल्या देशात एक गुन्हा घडतो. दिवस असो, रात्र असो, सुट्टीचा दिवस असो पण जवळजवळ सेकंदाला एक गुन्हा हे प्रमाण सारखे चालूच असते. आणि आता १९७५ पर्यंतचे आकडे निघतील तेव्हा तर हे प्रमाण आणखीच वाढेल.

वैयक्तिक गुन्हेगारांना आता फार चांगले दिवस नाहीत. आता गुन्हेगारीच्या जगातसुद्धा hierarchies निर्माण झाल्या आहेत. आणि या hierarchy च्या टॉपवर असलेले अगदी पांढरी टोपी घालून मिरवतात पण जे पोटाची खळगी भरण्यासाठी भुरटया चोऱ्या करतात त्यांना मात्र चांगलेच बडवले जाते.

मिसा येण्याच्या आधी या hierarchy मधील वरच्या लोकांनी दिल्लीच्या एका five star हॉटेलमधे एक बैठक भरवली होती. या बैठकीचा मुख्य उद्देश हा असा होता. अफगाणिस्तानातील एका रहिवाशाला ३ महिन्यांच्या आत देशातून हाकलावे असा हुकूम आला होता. तेव्हा 'गुन्हेगारांच्या' बैठकीत असा ठराव पास झाला की, सदर रहिवाशाला तेवढया काळात हद्दपार करण्याचा मनाई हुकूम मिळावा! व शेवटी तसेच झाले!

मुंबईतील एका वर्तमानपत्राने बातमी दिली होती की, दर वर्षी सुमारे २००० कोटी रुपये मालाची चोरटी आयात आपल्या देशात होत होती. २००० कोटी म्हणजे जवळजवळ अडीच तीन टाटा झालेच की!

अफू ही हिंदुस्थान, नेपाळ, बर्मा व क्वचित तिबेट या देशांतील हिमालयाच्या जवळ भरपूर प्रमाणात होते. या अफूची झाडे (Poppy fields) पाहिली की, निसर्गाने रंगीबेरंगी फुलांचे प्रदर्शनच मांडले आहे की काय असे वाटते. त्या झाडावरची पांढरी, गुलाबी व निळी फुले वाऱ्याच्या झुळुकेवर दिमाखाने डोलताना पाहिली की, हीच झाडे हजारो युवक-युवतींना देशोधडीला लावतील याचा आपणास विसर पडतो. अगदी उत्कृष्ट 'गुणवत्ता' असलेली अफू हिमालयाच्या काही सहज न पोचता येणाऱ्या प्रदेशात रु. १ ते १·५० तोळा या भावात मिळते. म्हणजे साधारण १०० रु. १ किलोचे झाले. आणि हीच अफू तुम्ही अमेरिकेत नेली, तर त्याचा भाव एकदम रु. ५०,०००/– ते रु. ३,७५,०००/– पर्यंत sky-rocket होतो. म्हणजे १ किलो अफू तुम्ही अमेरिकेपर्यंत घेऊन जाऊ शकलात, तर आयुष्यभर बसून खाल. पण त्या अफूच्या नशेखाली कितीतरी जीवांची विल्हेवाट लागली असेल!

कोलाबावाला असं म्हणतात की, जेव्हा एक स्मगलर पकडला जातो तेव्हा इतर ९९ सुटतात! युसुफ पटेल याचे तर इटालिअन माफीया गँगस्टर रिकार्डो व बेंजामिनो सॅन्स यांच्याशी संबंध होते.

चोरटया निर्यातीचे मोठे सम्राट दोन होते. त्यांच्या हाताखाली २५,००० नोकर होते. त्यांतील काही नोकरांचे काम म्हणजे निव्वळ भ्रष्टाचार पसरवणे! मोटरगाडया, जीप्स, ट्रक्स वगैरे १००० वाहनांचा सरंजाम या दोघांकडे होता. चोरटी आयात जेव्हा अगदी जोरात सुरू होती त्यावेळी या सम्राटद्वयांचा निव्वळ मासिक नफा रु. १०कोटीच्या घरात होता आणि त्यांच्या काही नोकरांसाठी 'पर्कस्' बघा. दमणच्या रस्त्यावरील अलिशान बंगले भाडे दिल्याशिवाय त्यांना राहायला मिळत. या बंगल्यात छानछोकीचे फर्निचर असे. इतर अनेक सोयीही त्यांना उपलब्ध असत.

चोरटी आयात बहुतांशी दमणमधून होई. तिकडून वापीच्या मार्गे ते मुंबईला पाठवीत असत. वापी रेल्वेस्टेशनवर भल्या मोठ्या पाण्याच्या टाकीत हा माल ठेवला जात असे. आगगाडी स्टेशनला लागली की, अगदी थोडयाच वेळात हा सर्व माल डब्यात कोंबला जाई. डब्यात (बाथरूम व इतर ठिकाणाचे) प्लायवुडच्या पार्टिशनचे, सीलिंगवरचे लाकूड काढून त्यात मालाचा भरणा होत असे. परत स्क्रू वगैरे लावून बाहेर चाकूंनी फळं वगैरे खात गप्पा मारीत दादा लोक बसलेले असतात.

या मालात बऱ्याच वेळा मनगटी घडयाळे असत. आता स्वीत्झर्लंडमध्ये या घडयाळांच्या किंमती बघू- फावर लूबा त्या देशात फक्त ३० रु. (exfactory किंमत)ला मिळते व रॉलेक्स २५० रु. ला मिळते! इकडे त्याच घडयाळाच्या किंमती अनुक्रमे रु. १७५ ते रु. १८०० पर्यंत आहेत!

वॉलकॉटविषयी या पुस्तकात एक खास प्रकरण आहे. इलस्ट्रेटेड विकलीचे खुशवंतसिंग म्हणतात की, वॉलकॉटनी त्यांना सांगितलेल्या तपशीलाशी कोलाबावालांचा तपशील जुळत नाही! एकदा वेळापत्रक चुकले तेव्हा वॉलकॉट ८० लाख रु. किंमतीचे सोने व हिरे टाकून विमानात पळाला होता. आणखीन एकदा ६ लाख रुपयांचे सोने

वॉलकॉटनी नवसारीच्या दलदलीत टाकून दिले होते. सफदरजंग विमानतळावर तर वॉलकॉटने चक्क सांगितले की, त्याच्या विमानाचे इंजिनच बिघडले. त्यांनी नंतर इंजीन काढून जुन्या दिल्लीत दुरुस्तीसाठी नेले. पण इंजिनच्या आत सर्व पार्टस् सोन्याचे होते.

CBIने वॉलकॉटला पकडण्यासाठी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कोलाबावालांचे बरेच कौतुक केले आहे. या पुस्तकात जगातल्या जुन्यातल्या जुन्या व्यवसायाबद्दल (Prostitution वर) भरपूर माहिती आहे. ते वाचून मन विषण्ण होते. मुंबईचे रेडलाईट क्षेत्रफळ २½ स्क्वेअर माईलचे आहे. त्यात सुमारे ५०,००० वेश्या आहेत. त्यांतल्या ८०% मुली पळवून किंवा फूस लावून आणलेल्या असतात. कामाठीपुरा येथील वेश्येस एका वेळचे सुमारे ५/– रु. मिळतात. सरासरी १० वेळा तिने बिझनेस केला तर दिवसाकाठी तिला ५ रु. स्वतःसाठी राहतात. म्हणजे एका वेळचे तिला ५० पैसे मिळतात! तिला रोज ३ रु. पठाणाला, ५ रु. लायसेन्सड् मनी लेंडरला, ३ रु. सारीवाल्याला, १ रु. हॉटेलवाल्याला (म्हणजे काही घेतले नाही तरी), १० रु. तिला विकत घेतल्याबद्दल (!) व तिला मिळेल त्यातले निम्मे घरवाली व गुत्तेवाल्याला द्यावे लागतात. कधी कधी तिला इतकी कमाई होतही नाही व एखादी वेश्या बंड पुकारते त्यावेळेला तिच्या तोंडावर ॲसिड फेकले जाते व तिला बाहेर हाकलून दिले जाते. इतकी जरब असल्यामुळे पोलिसाकडे तक्रार करण्याचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे समाजकार्यकर्ते व राज्यकर्ते यांना वाटते की, 'तितकी काही परिस्थिती वाईट नाही!'

या वेश्याकडे येणारी बहुसंख्य मंडळी लग्न झालेली असतात व ही मंडळी नंतर स्वतःच्या कुटुंबात गुप्तरोगाचा प्रसार करतात. सरासरी दर सेकंदाला ६ लोकांना गुप्तरोग होतो!

कामाठीपुरा व खेतवाडी येथील भागापेक्षा फॉकलँड भागातील 'लाल बत्ती' जास्त माणसाळलेली आहे. तेथील वेश्येला फ्री मेडिकल व लीगल एड मिळते व चुकून मुलगी झाली तर १५०० रु. बक्षीस मिळतात. मुलगी १२–१३ वर्षांची होताच तिला 'धंद्यात' घेतात. कोलाबावाला यांनी बरेच महिने 'लाल बत्ती' भागात राहून या व्यवसायावर निरीक्षण केले. एकंदर हे प्रकरण वाचून स्त्री–जातीविषयी करुणा उत्पन्न होते.

जे. एन्. पोंडा,
फिनिक्स लायब्ररी

---


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

### मराठी

१) योगदीपिका (योगासनाबद्दल माहिती व छायाचित्रे) : बी. के. एस. अय्यंगार — रु ३०/–

२) किर्लोस्कर आणि देवल (किर्लोस्कर व देवल यांच्या नाट्यसृष्टीचे रसग्रहण) : वसंत शांताराम देसाई — रु. २०/–

३) ऑलेम्पिक (ऑलेम्पिकचा इतिहास) : हेमंत जोगदेव — रु. २०/–

४) स्वप्नांचं युद्ध (विज्ञान-नवलकथासंग्रह) : गजानन क्षीरसागर — रु. १०/–

आम्ही दिलेल्या यादीतील पुस्तके आम्ही पुरवू. (V. P. नाही)
आपली पुस्तके मजबूत व सुंदर राहण्यासाठी प्लॅस्टिक कव्हर घालून देऊ.

६) नावनिशाणी–(कथासंग्रह) श्री. ज. जोशी — रु. १५/–

७) पापातून पपाकडे–(विनोदी कथासंग्रह) वि. आ. बुवा — रु. १५/–

८) मनीप्लॅन्ट–(कथासंग्रह) सौ. स्नेहलता दसनूरकर — रु. १३/–

९) शहेनशहा– (औरंगजेबविषयी कादंबरी)– ना. सं. इनामदार — रु. ३५/–

१०) इस्टेट मॅनेजर– (कादंबरी)– बाबा कदम — रु २५/–

११) आवडलेली माणसे– (व्यक्तिचित्रे)– विद्याधर पुंडलीक — रु. १४/–

१२) साहित्य गंगेच्या काठी! – (समीक्षणात्मक व रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह)– ना. सी. फडके — रु. १५/–

१३) मी– इझाडोरा– (इझाडोरा डंकन यांच्या 'My Life' या पुस्तकाचा अनुवाद)– अनुवाद रोहिणी भाटे — रु. २६/–

१४) जगभरची भयानक हेरगिरी– (हेरगिरीवरील कथा)– द. पां. खांबेटे — रु. १८/–

१५) असामान्य बंडलबाजी– (बंडलबाजीविषयी सत्यकथा)– द. पां. खांबेटे — रु. १५/–


१६) चार्जरुम– (कथासंग्रह)– श्रीकांत सिनकर — रु. १५/–

आपणास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवितो (VP ची पद्धत नाही).

आपली पुस्तके मजबूत व सुंदर टिकावीत म्हणून आम्ही 'फिनिक्स' पद्धतीचे बाईंडिंग व प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.

नॉन–मेंबर्सकरीता डेलि बेसीसवर पुस्तके वाचण्याची सोय.

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०



# मुकेश

## मेणबत्तीप्रमाणे संथ तेवणारे गाणे

शिरीष चिंधडे

सहज म्हणून टी. व्ही. चं बटन फिरवीत आणि हळूहळू पडद्यावर एक देखणा चेहरा उजळत आकार घ्यायला लागला. पाठोपाठ शब्दही ऐकू येत होते. काही चरित्रात्मक मजकूर सांगितला जात होता. मग गाण्याचे शब्द यायला लागले...आणि डोक्यात लख्ख प्रकाश पडला की, हे सारं मुकेशविषयी चालू आहे. गाणं संपल्यावर टी. व्ही. वर बातमी सांगितली गेली... मुकेश मृत झाल्याची.

मुकेशला प्रत्यक्ष बघण्याचा योग कधी आला नाही. पण टी. व्ही. च्या पडद्यावर तो जेव्हा जेव्हा दिसला तेव्हा तेव्हा अंगावर आवश्यकतेपेक्षा जास्त चरबी आहे हे चटकन् लक्षात आलं. या गृहस्थाचे वजन कमी करायला हवं, हा सामान्यज्ञानात्मक विचार-देखील मनात डोकावला आणि आज ही बातमी ऐकून हा विचार योग्यच होता याची खात्री पटली.

मुकेशच्या मधुर आणि मुलायम आवाजाचा लळा मला शाळकरी वयातच लागला होता. चांगलं गाणं ऐकावं ही समज यायला लागल्यापासून मुकेशच्या गाण्यांनी आनंद द्यायला सुरुवात केली होती. त्याचं कोणतंही बरं-वाईट गाणं पाठ करायचं हा उत्साह संचारला होता. अगदी 'मतवाली नार ठुमक ठुमक चली जाय' सारखं उडत्या-दुडक्या चालीचं आणि म्हणूनच मुकेशच्या स्वर-धर्माला न शोभणारं गाणंदेखील त्या वेळी पाठ करण्याएवढा मी आंबट शौकीन झालो होतो. असा उत्साही 'कानसेन' होत असताना थोडासा 'तानसेन' देखील व्हायचा प्रयत्न करीत होतो. त्यामुळे कुणाही मित्राने, परिचिताने शाळेत गाणं म्हणायला सांगितलं की, मी हटकून मुकेशच्याच गाण्याची निवड करायचो. आपण मुकेशसारखं गातो हाही एक गोड स्वप्नाळू समज त्या वेळी मनात फुलायला लागला होता. थोडक्यात त्या वयात मुकेश हाच माझा फिल्मी संगीत हिरो होता.

गुणी गायकाच्या आवाजाचा उत्तम उपयोग कसा करून घ्यावा याची कल्पना सगळ्याच संगीत दिग्दर्शकांना असते असं समजण्याचं कारण नाही. बरेच वेळा गायकाची बिदागी परवडत नसेल म्हणून चांगली गाणी, चांगल्या आव्हानात्मक चाली दुय्यम दर्जाच्या गायकाच्या गळ्यात गुंतून पडतात. चांगला कवी, चांगला गायक आणि चांगला संगीतकार हा योग दुर्मिळ असतो. टिकाऊ कलाकृती या योगातूनच निर्माण होत असते. मुकेश हा निश्चितच गुणी गायक. पण असे म्हणताना तो निर्दोष गायक होता असा अर्थ अभिप्रेत नाही. मुकेशच्या आवाजाला काही चटकन ध्यानात येतील अशा मर्यादा होत्या. म्हणजे त्याचा आवाज काहीसा सदोष होता. अशा अर्थाने की, पल्ला किंवा झेप ही फार मर्यादित होती. षड्जाकडे आवाज चढू लागला की, मुकेशची दमछाक होई. एवढेच नव्हे तर, त्याच्या आवाजाने कधी मस्त, दाणेदार, भरघोस षड्ज लावल्याचं एकाही गाण्यात सहजासहजी ऐकू येत नाही. त्यामुळे त्याची बहुसंख्य गाणी मंद्र आणि मध्य सप्तकात बांधलेली असत. मुकेशची गाणी मी जसजसा वाढत्या जाणकारीने ऐकायला लागलो तसतसा त्याचा हा कमीपणा मला प्रकर्षाने जाणवायला लागला. 'झूमती चली हवा, याद आगया कोई' हे गाणे मी डझन वर्षांपूर्वी ऐकले आणि चटकन लक्षात आली ती गोष्ट ही की, स्वरयोजना मध्यसप्तकापासून पुढे धाव घेत आहे. सुरुवातीच्याच 'झूमती' या शब्दातल्या 'झू' वर जी मींड आहे तीच या वस्तुस्थितीचा पुरावा देते. शेवटी तर 'याद आगया कोई' ही ओळ इतकी उंचावर नेली आहे की, मुकेशची चक्क दमछाक झाली आहे. एवढंच नव्हे तर, 'कोई' मधील 'ई' कारावर तर त्याचा आवाज बिनधास्तपणे फुटला-फाटला आहे. पण गीत तिथंच संपतं म्हणून हा प्रकार गण्या-गंप्या श्रोत्याला सहजासहजी ध्यानात येणं शक्य नाही. अलीकडेच 'संन्यासी' तील लतावरोबरचं द्वंद्वगीत (चल संन्यासी मंदिरमें') पुन्हा हीच गोष्ट सिद्ध करते. 'मेरी माँ मुझे बचालो' या ओळीवर मुकेशचा आवाज फाटण्याच्या बेतात आल्यासारखा वाटतो. मी त्या काळी मुकेशच्या बारीकसारीक हरकती-मुरकतीवर लक्ष ठेवून असणारा श्रोता होतो. कारण तेव्हा मी 'मुकेशफॅन' होतो.

—पण या 'हरकती-मुरकती' वरून लक्षात आलं की, मुकेशच्या गायकीसंबंधी हा शब्द वापरणे पूर्णपणे चूक ठरेल. त्याच्या आवाजाची ही दुसरी मर्यादा होती. या आवाजाला फिरत नव्हतीच. अनुनासिक, मंद्र-मध्यमात घोटाळणारा आणि जाड आवाज फिरकी तान तिच्या बारकाव्यासह निर्माण करायला साहाय्यभूत होण्यापेक्षा अडथळेच आणतो. अर्थात चांगल्या खर्जाला चांगली फिरत येऊ शकत नाही असं मुळीच नव्हे. सुचवायचंय एवढंच की, आधीच न वळणारा आवाज त्यात पुन्हा फारसा रियाझ नसणे या दोन गोष्टी मुकेशच्या आवाजाविषयी चटकन लक्षात येत. हृदयनाथ मंगेशकरांनी मुकेशला 'त्या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का?' हे सुंदर गीत म्हणायला सांगितलं होतं, असं स्वतः हृदयनाथनी 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये लिहिलेल्या लेखात म्हटलंय. ते वाचल्यावर मला उगीच चिंता वाटायला लागली. ते गाणं म्हणायला मुकेशचा आवाज असमर्थच म्हटला पाहिजे. विशेषतः 'त्या फुलांच्या' यातील 'च्या' वर अशी काही विलक्षण हरकत आहे की, ती विनाप्रयास केवळ लताबाईंच्याच गळ्यातून अवतरावी. (अर्थात स्वतः हृदयनाथनी हे गाणं फार बहारीने पेश केलंय याचा उल्लेख करायलाच हवा.) पण हृदयनाथजींसारख्या जाणकाराने अशा नाजुक कलाकुसरीसाठी मुकेशचा असंस्कारित आवाज विचारात घ्यावा याचं आश्चर्य वाटलं. असो. मुद्दा इतकाच की हरकती–मुरकती हा मुकेशचा प्रांत नव्हता.

आवाजाला उंची (पल्ला) आणि फिरत नसल्याने दुडक्या चालींचा विचार मुकेशच्या बाबतीत संभवतेच नाही. 'मतवाली नार' किंवा 'डमडम डिगा डिगा' सारखी तुरळक उदाहरणे आहेत. पण ती मुकेशची बलस्थाने नव्हेत. एखाद्या कलावंताच्या कलेचे योग्य रसग्रहण करण्याचा न्याय्य मार्ग म्हणजे, त्या कलावंताकडे कोणते गुण आहेत याचा विचार करणे हा होय. त्याने काय संपादन केलंय यापेक्षा काय संपादन केलं नाही, याचा विचार म्हणजे कलावंतावर अन्यायच ठरायचा. उदाहरण घेऊनच बोलायचं झालं तर, कुमार गंधर्वांच्या गाण्यात भीमसेन जोशींची गगन-गंभीर, पल्लेदार तान नाही, या म्हणण्याने कुमारांच्या गाण्याला गुंजभरदेखील न्याय मिळत नाही. किंबहुना ते दोषैकदर्शी वृत्तीचे लक्षण ठरेल. कुमारांनी आपल्या 'दमसास' ची विशिष्ट वृत्ती ओळखून स्वतःच्या गाण्याला वेगळीच शिस्त लावलीय, किंबहुना तीच कुमारांची खासियत ठरलेली आहे. तेव्हा याच न्यायाने मुकेशच्या बलस्थानांचा विचार इथे करणं समयोचित आणि तर्कप्राप्त ठरणार आहे.

–तर मुकेशने स्वतःच्या आवाजाची प्रत, धर्म, वृत्ती यांचा योग्य तो अंदाज घेतलेला होता. जागरूक कलावंत परिपक्व होण्याच्या प्रक्रियेतही स्वतःच्या सबल तसेच शबल स्थानांची पूर्ण जाणीव समोर ठेवूनच आपली कलाकृती पेश करीत असतो. त्यादृष्टीने संगीतकार आणि स्वतः मुकेश यांनी दुडक्या-उडत्या चालीची गाणी निवडली नाहीत हे योग्यच झालं. अन्यथा आज ज्या कारणासाठी मुकेश एक श्रेष्ठ पार्श्वगायक मानला जातो तसा तो झाला नसता. वस्तुतः तो सैगलचा नकलनवीस म्हणून पुढे आला असता आणि 'ऑल्सो रॅन' मध्ये चटकन जमा झाला असता (नेमकी हीच घटना सी. एच्. आत्मा या गायकाच्या बाबतीत घडली. आत्मा हे कधीच पहिल्या रांगेतले लोकप्रिय गायक ठरू शकले नाहीत, ते त्यांचा आवाज आणि उच्चारपद्धतीवर असलेल्या सैगलसारख्या बड्या गायकाच्या दाट छायेमुळेच!) मुकेशने हा मोह आवरला म्हणून ते दुसऱ्या रांगेत ढकलेले जाण्याचा धोका टळला. मुकेशच्या सुरवातीच्या काळात हा धोका फारच होता. कोणत्याही नवख्या कलावंताच्या बाबतीत श्रेष्ठ कलावंताचे अनुकरण अटळ असते. त्यातून बाहेर पडल्यावरच स्वत्व येत असते. मुकेशने सुरुवातीला 'दिल जलता है तो जलने दे', 'तेरी दुनियामे दिल लगता नही वापस बुलाले' वगैरे गाणी सही सही सैगलप्रमाणे गायली. पण नंतर त्याने स्वतःची शैली उत्क्रांत केली. सैगलच्या आवाजाला खर्ज उत्तम होता. मुकेशलाही खर्ज चांगला होता पण सैगल आणि मुकेश यांच्यातला महत्त्वाचा फरक जो वस्तुतः सूक्ष्म आहे. तो असा की, सैगलचा आवाज सकप होता आणि शब्दोच्चारात ठाशीव ठसकेबाजपणा होता, तर मुकेशचा आवाज सरळ, संथ आहे. यामुळेच पुढे मुकेश स्वतःची शैली उत्क्रान्त करू शकला.

मुकेशच्या आवाजाचे नेमके बलस्थान सापडते ते इथे. त्याचा निरलंकृत, जवळजवळ बाळबोध आवाज हेच त्याचे खरे वैशिष्टय. (नेमक्या याच कारणाने त्याचा आवाज राजकपूरला शोभतो. राजकपूरने केलेल्या भूमिका अशाच सामान्य, सरळ, बाळबोध किंबहुना बावळट आहेत.) गीतांतील भावनेचा प्रत्यय, शब्दांचा आशय या सरळ आणि प्रामाणिक आवाजानेच मुकेश व्यक्त करू शके. अवघड, प्रायोगिक चाली, अनवट राग, ताल आणि 'हार्मनी' पद्धतीची रचना यांचा आढळ मुकेशने गायलेल्या चालीत होत नाही. सुगमता हा त्याच्या आवाजाचा आणि शैलीचा लक्षणीय विशेष होय. सोप्या चाली, जवळजवळचे स्वर, (उदा. 'एक दिन मिट जाएगा मातीके मोल' हे गाणे.) सहज समजणारा ताल (ठेका), स्पष्ट शब्दोच्चार, (हे अर्थात आवश्यकच असते.) गोडवा या गुणांमुळे मुकेश हा लोकप्रिय आणि प्रथम दर्जाचा यशस्वी पार्श्वगायक होऊ शकला ही एक कठीण अशी मिळकत आहे.

मुकेशच्या शैलीची आणखी एक खासियत इथे मला उल्लेखावीशी वाटते ती म्हणजे, त्याची अत्यंत प्रामाणिक पेशकारी. म्हणजे असं की, अनेक फिल्मी गायक (अगदी रफीदेखील) बऱ्याच वेळा भाव दर्शनासाठी कृत्रिम ढंग उचलतात. 'शराबी', 'नशीला' वगैरे शब्द म्हणताना जणू आपण स्वतः प्यायलो आहोत असं दाखविणं हा एक प्रकार. किशोरसारखा गायक तर गाण्यात स्वरांपेक्षा विदूषकीच जास्त भरतो. 'Art lies in concealing art' हे विसरता कामा नये. लताबाई, मन्ना डे यांचं गाणं यादृष्टीने अत्यंत अकृत्रिम, प्रसन्न आणि सहज आहे. मुकेशदेखील असाच एक निरावेश, नाटकीपणाविरहित अकृत्रिम शैलीने गाणारा गायक आहे. स्वरबाह्य अशा कोणत्याही युक्त्या–प्रयुक्त्या, चमत्कृती त्याने कधी करून दाखविल्या नाहीत. मला हा गुण गायनी कलेत महत्त्वाचा वाटतो.

मुकेशच्या आवाजाबरोबरच त्याला ज्या पद्धतीची गाणी गायला मिळाली त्यांच्या आशयाचाही विचार येथे संक्षेपाने झाल्यास अप्रस्तुत ठरणार नाही. किंबहुना तो आवश्यकच आहे. मुकेशच्या विशिष्ट आवाजधर्मामुळे तो दर्दभरी गाणी गाण्यात स्पेशॅलिस्ट ठरला. वैफल्य किंवा आर्तता 'हम आंस लगाये बैठे हैं' हा त्याच्या स्वराचा आत्मा आहे. मुकेश हा मूलतः खिन्न स्वरांचा गायक आहे. संथ चाली आणि संथ ठेका यामुळे मुकेशच्या आवाजाची ही खासियत खुलली. त्याची झपतालातील गाणी 'आँसू भरी हैं ये जीवन की राहे', 'दिल ढूंढता है सहारे सहारे,' 'तेरे प्यार को इस तरहसे भुलाना' इत्यादी. दादऱ्यातील गाणी मुझको इस रात की तनहाई में', 'मै तो इक ख्वाब हूँ, इस ख्वाबसे तू प्यार न कर', 'चल री सजनी– अब क्या सोचे', 'तू मेरे साथ चल ना पायेगी' इत्यादी), ठायकेरव्यातील गाणी 'लबो पे तराने अब आ ना सकेंगे के अब जिंदगीमे मुहब्बत नही है,' 'दिल जलता है तो जलने दे,' 'आ लौट के आ जा मेरे मीत' इत्यादी. या साऱ्यांचा अर्थ आणि आशय खिन्न–उदासीन आहे. त्यात वैफल्य, विरह, विकलता या भावना आहेत. ही सगळी त्याची टिकाऊ गाणी आहेत. (अर्थात त्याची काही प्रसन्न मनोवृत्तीची गाणीदेखील टिकाऊ ठरणार आहेत. उदा. 'मेरा जूता है जापानी,' 'तुम अगर मुझको न चाहो तो', मैंने तेरे लियेही सात रंग के सपने चुने', 'ओ मेहबूबा', 'बोल राधा बोल' इत्यादी) या संदर्भात शैली या कवीचे पुनःपुन्हा वापरले गेलेले शब्द सहजच सुचून जातात. 'Our sweetest songs are those that tell us of the saddest thoughts.'

सामान्यतः मृत्यू ही अभद्र घटना आहे. मुकेशसारख्या विराण्या गायकाचा बराचसा अकाली मृत्यू निश्चितच अभद्र आहे. पण 'मृत्यू न म्हणे भूपती' हेच खरे. शेवटी मुकेशचे स्वर उरणार आहेत. कारण ते प्रामाणिक आहेत. मला स्वतःला मुकेशचं गाणं संथ तेवणाऱ्या मेणबत्तीसारखं चिंतनशील तरीही प्रसन्न वाटत आलं. माझा एक आवडता गायक 'न हाथी है न घोडा है, वहाँ पैदलही जाना है' असं गात अस्तित्वाच्या पैलतीरी पोहोचला आहे.

□

हसता–हसवताना गंभीर करणारा खेळ

# आम्ही लटिके ना बोलू

पु. ल. देशपांड्यांनी लिहिलेल्या आणि माधव वाटव्यांनी विलेपार्ल्याच्या स्थानिक संस्थेच्या कलाकारांबरोबर उभ्या केलेल्या या प्रयोगाची नोंद जाहिरातीतच 'फार्स' अशी करण्यात आली आहे. फार्स या नाट्यप्रकाराच्या शास्त्रीय व्याख्या-परिघात हा प्रयोग बसेल की नाही, मला ठाऊक नाही, तथापि त्याच्याच जाहिरातीत 'या खेळास मध्यंतर नाही' वगैरे वि. सू. देताना 'खेळ' हा जो शब्द अभावितपणे-सहजपणे वापरण्यात आला-आहे, तो या नाट्यप्रकाराचं यथार्थ वर्णन करू शकेल असं वाटतं. तर हा फार्स किंवा खेळ तसा खूप साधा आहे आणि बराच वेगळाही आहे. साधा अशासाठी की, केवळ दीड तासाच्या प्रयोगात नाटकाचा आव नाही, रेखीव कथानक किंवा त्याचा योजनाबद्ध विकास नाही, प्रचंड घटना नाहीत आणि तरीही असं काही आहे, जे प्रेक्षकाला दीड तास खुर्चीला बांधून ठेवू शकतं; मनसोक्त हसवू शकतं. यातली कथाकल्पना म्हणायची तर एवढीच की, एका नाट्यगृहात नाट्यप्रयोग सुरू व्हायला बराच वेळ असताना नाटकाशी जवळून संबंध असलेली काही मंडळी येतात आणि नथोबा या जुन्याजाणत्या नाटकवेड्या स्टेजमॅनेजरबरोबर त्यांच्या गप्पा चालतात. पारंपारिक नांदीनं सुरू होणाऱ्या या प्रयोगात मग काही काल्पनिक नाटकातले भाग अभिनयातून उभे केले जातात, गाणी चालतात, स्टेजवरचा नाटकामधला सत्कारसमारंभ उरकला जातो आणि कलात्मक सत्य आणि वास्तव सत्य यांच्यावर sugarcoated pill सारखी वाटणारी रंजक चर्चाही होते. याला खेळ म्हणायचं हे एक कारणच.

अर्थात तरीही, या विनोदी हास्यस्फोटक खेळापेक्षा माझ्या दृष्टीनं महत्त्व आहे ते या त्यातल्या चर्चेलाच. नथोबा आणि देशपांडे नावाचा एक नाटककार या दोघांची गाठ पडते ती रंगमंचावरच. आणि एरवी काही वेळा बोअर झाली असती अशी ही चर्चा अगदी हलक्याफुलक्या मनःस्थितीत सुरू होते. नाटक कसं हवं, त्यात काय लिहावं अशा पायाभूत प्रश्नांवर सुरू झालेला हा विचार आपली light vein न सोडताच आणि 'कलात्मक', 'वास्तव' असे जडबोजड शब्द न वापरताही सत्याच्या शोधापर्यंतचा अथांग पल्ला गाठू पाहतो. तत्त्वज्ञान अर्थातच उघड उघड पलायनवादाचं. प्रेक्षक नक्की काय पाहायला येतात? वास्तव जीवनाचं प्रामाणिक चित्रण? नाटकाच्या धंद्यात पुरी हयात घालवलेला नथोबा नाटककाराला कळवळून सांगतो, 'गोड भूलथापा द्या. रंगमंचावरच्या वेगडी प्रकाशात आकर्षक वाटेल, खऱ्याचा आभास निर्माण करील असं काही सुंदर असत्य प्रेक्षकांसमोर उभं करा. तेच भोगायला प्रेक्षक पैसे खर्च करून आलेले असतात.' प्रश्न इथंच सुटत नाही. इतर दोन–तीन नाटककार, नटनटी येतात. निष्ठावंत प्रेक्षकवर्गाचं प्रतिनिधित्व करणारे एक अश्राप न्यायाधीश आणि त्यांची बायको हजर होतात. त्यांच्यासमोर काही काल्पनिक नाट्यप्रवेश, खास जुनाट अभिनयाच्या साच्यात बसणारे, करून दाखविले जातात. अर्थात या सगळ्यांचा रोख नथोबा एकाच दिशेनं वळवत राहतो. कलात्मक आणि वास्तव सत्य. नाटककारांमध्येच मतभेद होतात आणि न्यायाधीशांकडे निवाड्याची कामगिरी सोपवली जाते. त्यांचा कौल अर्थातच कलात्मक मूल्यांच्या बाजूनं पडतो. आणि नथोबाही जिंकतो. 'प्रेक्षकांना जे हवंय ते द्यायला हवं,' असं काहीतरी अंधुक, ढोबळ conclusion अखेरीस निघतं. इथं हाताळलाय त्यापेक्षा सत्यदर्शनाचा हा प्रश्न खूपच अधिक सखोल आहे यात शंका नाही. किंबहुना प्रेक्षकांना romantic escape पुरविणे हाच नाटकाचा उद्देश हे मान्य करायला realism आणि surrealism च्या काळात थोडं त्रासाचंच पडतं. तरीही दाद द्यायला हवी ती पु. लं. च्या रचना–मांडणी कौशल्याची आणि दिग्दर्शन व प्रमुख भूमिका गाजवणाऱ्या माधव वाटव्यांच्या presentation artची. नथोबाच्या मध्यवर्ती भूमिकेत श्री. वाटवे यांनी भली रंगत आणली. मोजके हातवारे–हावभाव, सहज वावरणं, स्वच्छ सहज संवादफेक; हवी तेवढीच नाटकी आणि एक पुरा पिकलेला बॅकस्टेजमॅनेजर पर्फेक्ट बेअरिंगसह उभा! पु. लं. चा हुकमी जिवंत विनोद साथीला घेऊन बाकीच्या हौशी नटमंडळींनीही वाटव्यांना मोलाची साथ दिली आणि अशा खेळाला जरूर ते टीमवर्क निर्माण केलं. त्यामुळेच तर एकच तत्त्व उराशी घेऊन दीड तासपर्यंत ताणलेला हा खेळ चुकूनसुद्धा कंटाळवाणा झाला नाही. 'मुक्त नाट्य' याचं अर्थ-स्वरूप इ. नाटकाच्या शास्त्रीय परिभाषेत काय असू शकेल याची मला कल्पना नाही, पण या खेळाला मुक्त नाट्य संबोधावं असं मला अगदी मनापासून वाटलं.

अर्थात खेळ शब्दही काही कमी अचूक नव्हे. खूप मोठ्या विशाल अर्थानं तो घ्यायला हवा. कारण ज्या सत्याच्या शोधासंबंधी यात चर्चा होते, त्या सत्याशी लपंडाव म्हणजेच आयुष्याचा खेळ नाही का?

—शिरीष सहस्रबुद्धे

आंधळ्या त्यागाच्या

सातमजली उतरंडी

# माझा मुलगा

संपूर्ण चित्रपटाचा विचार करता योग्य वाटणारं पण एरवी कानाला भलतं बेसूर लागणारं गद्यप्रकृतीचं नाव घेऊन आलेला हा नवा मराठी चित्रपट म्हणजे अस्सल भारतीय संस्कृतीत चिंब भिजलेल्या त्यागाचा कौटुंबिक ओव्हरडोस. भारतीय संस्कृती आपल्याला त्याग वगैरे शिकविते असं मी ऐकलं आहे, पण 'माझा मुलगा'मधल्या त्यागावर त्याग, त्यागावार त्याग या प्रकरणापुढं हात टेकायची वेळ आली. त्यागाची म्हणूनही एखादी नशा असते की काय मला ठाऊक नाही, कदाचित असावी, कारण 'माझा मुलगा'मध्ये रचलेल्या त्यागाच्या उतरंडी विवेकबुद्धीचा तोल ढळल्याशिवाय शक्यकोटीतल्या वाटत नाहीत. नारायणराव (डॉ. श्रीराम लागू) हे शाळामास्तर, त्याची पत्नी लक्ष्मी (जयश्री गडकर) आणि मुलगी बेबी या कुटुंबानं, लक्ष्मीचा धाकटा भाऊ श्रीधर (विक्रम गोखले) या नादान आणि नाकर्त्या इसमासाठी काय काय म्हणून करावं? स्वत: कर्ज काढून त्याचं कर्ज फेडणं आणि स्वत:च्या कर्जाला तारण म्हणून नारायणरावांच्या विवाहित बहिणीचे दागिने त्यांच्या नकळत गहाण ठेवण्याचा अव्यापारेषु व्यापार आहेच, पण त्यागाची कमालमर्यादा म्हणजे, श्रीधरचं मूल मृत जन्मल्यानंतर त्याच्या बायकोला धक्का बसू नये यासाठी, लक्ष्मीदेवी त्याचवेळी प्रसूत होऊन आपला मुलगा श्रीधरच्या हवाली करतात, तोही नारायणरावांच्या नकळत, त्यांना आपलाच मुलगा गेल्याची थाप मारून, कुणाही सुबुद्ध प्रेक्षकाची सत्यशीलता इथे संपावी, निदान माझी संपली, आणि दिगंबरावस्थेत हिंडणाऱ्या दुसऱ्या वेड्याला रागावून आपल्या कंबरेची लंगोटी त्याला सोडून देणाऱ्या एका वेड्याच्या विनोदाची आठवण काढून मी तो दमट चिकट बिनडोक त्याग साजरा करून घेतला. या त्यागप्रकरणाला मग भोग प्रकारच्या उपकथानकाचं शेपूट जोडलंय्, म्हणजे घरजावई होणारा श्रीधर, त्याची लाडावलेली श्रीमंत बायको श्री (सरला येवलेकर) आणि तिचा कंसछाप पालक मामा (धुमाळ)+ त्याचा बेरकी दिवाणजी (नारायण भावे) वगैरे. 'श्री' ही एक औरच भानगड आहे. सरला येवलेकरनं उभी केलेली ही श्री श्रीमंताची लाडावलेली लेक वाटण्यापेक्षा वेडावलेली लेक जास्त वाटते. विशेषत: पूर्वार्धातल्या तिच्या हसण्यावागण्या बोलण्यावरून तर तिची मानसिक वाढच झालेली नसल्याचा निष्कर्ष कुणीही काढील. (आणि अर्थात तो उत्तरार्धातही फार बदलावा लागणार नाही!) उत्तरार्धात कथेनं घेतलेली वळणंवाकणं तर कुठल्याही शहाण्या माणसाला वेडा बनवतील अशाच धर्तीची आहेत. नारायणराव आंधळे होणं आणि दुसऱ्या एका अपघातात ऐन वेळी त्याची दृष्टी परत येणं, मामासाहेबांचे बदलते पवित्रे, श्रीधरपंतांचा नामी बुळेपणा, श्रीनं लक्ष्मीचा अपमान करणं, लक्ष्मीनारायणाच्या जोड्यानं घर सोडून निघणं वगैरे खास कौटुंबिक अश्रुपात स्पेशल ओला मसाला यथायोग्य प्रमाणात आहे. 'विनोद नाही'. अशी मधनंमधनं जाणीव झाल्यामुळे भलत्याभलत्या ठिकाणी दिवाणजी आणि घरातली मोलकरीण (गुलाब कोरगावकर) यांचे तथाकथित इनोदी प्रेमप्रसंगसुद्धा आहेत. इतका हिडीस आणि किळसवाणा विनोद 'क' दर्जाच्या हिंदी धंदेवाईक सिनेमातसुद्धा क्वचितच पहायला मिळतो. मुळात गुलाब कोरगावकरबाईंनाच पडद्यावर पाहणं सहन करायला फत्तराच्या काळजाचाच माणूस हवा. येरागबाळ्याचं ते कामच नव्हे. बाईंनीही आपण काय करतोय् असं समजून हे काम केलंय् कुणास ठाऊक! काहीच समजलेलं नसण्याची शक्यताही बऱ्यापैकी.

अत्यंत उथळ, ठोकळ, अविश्वासार्ह, अमानवी आणि बुद्दू रडकथा लाभलेला हा चित्रपट थोडाफार सावरलाय तो कलाकारांनीच. त्यातही प्रामुख्यानं जयश्री गडकर, डॉ. लागू आणि धुमाळ यांची नावं घ्यावी लागतील. आपल्या आणि भावाच्या संसारसुखाच्या कात्रीत सापडून सर्वस्वत्यागाला तयार होणाऱ्या लक्ष्मीची भूमिका एकसुरी-एकसाची न व्हावी यासाठी जयश्रीबाईंनी डोळसपणे परिश्रम केल्याचं जरूर जाणवतं. डॉ. लागू नेहमीच्याच सफाईनं, विशेषत: सफाईदार संवादफेकीनं परिणाम साधून आणि छाप पाडून जातात. अर्थात तसा त्यांना या चित्रपटातच वाव कमी आहे. तथापि त्यांच्या संवादफेकीतला त्यांचा विशिष्ट एकचएक tone खटकल्याशिवाय राहत नाही. आपल्या नशिबाला पूर्णपणे शरण जाणारी ही व्यक्तिरेखा, काही प्रसंगांचा अपवाद वगळता (एक उदाहरण : पोलिस स्टेशनमधून सुटका झाल्यानंतरचा प्रसंग), त्यांनी थोडी-फार casually घेतल्यासारखं वाटतं. विक्रम गोखलेचं बेअरिंग सर्वसाधारणपणे ठीक, तथापि बऱ्याचवेळा, खासकरून भावनेच्या उच्च ताणामध्ये त्यांच्या अभिनयात एखादं ऐतिहासिक पात्र डोकावत असल्याचं जाणवतं. सरला येवलेकर उत्तरार्धात सुसह्य. तीच गोष्ट नारायण भावे यांची. अर्थात श्री. भावे यांनी कुठेही आपलं बेअरिंग सुटू दिलेलं नाही, हे अभिनंदनीय. खलपात्राच्या भूमिकेत धुमाळ यांनी जीव आणला आहे, खलनायकाचा साचेबंदपणा कुठेच शिरू दिलेला नाही.

या चित्रपटाचं संगीत ही एक बऱ्यापैकी जमेची बाजू. गीतलेखन व संगीत यशवंत देव यांचं आहे एक-दोन चाली त्यांनी सरळ आणि सुरेलही दिल्या आहेत. 'दिवाळी येईल' हे लहान मुलांचं समूहनृत्यगीत हे एक उदाहरण. 'लागेना रे थांग तुझ्या हृदयाचा' हे गाणं मात्र खरोखरच सुरेख, मनात घोळत रहावं असं आहे. दोन्ही गीतांचं 'टेकिंग' मात्र अत्यंत दरिद्री आणि हास्यास्पद आहे. 'लागेना रे हा तर संकलनातल्या 'पंचवर्क' चा उत्तम नमुना. तिसऱ्या अंगाई गीतात जाणवणाऱ्या आर्ततेपलिकडे नवल विशेष काही नाही.

एकीकडे, रंगीत आणि तंत्रदृष्ट्या परिपूर्ण मराठी चित्रांचा जमाना आल्याचं सांगितलं जात असतांना हे चित्र जुन्या मराठी चित्रपटाची सर्व तांत्रिक दोषांची बाळलेणी लेवून आलं आहे. अर्थात अंधुक दिसणं किंवा शब्द ऐकू न येणं या मुख्य दोषांचं प्रमाण कमी आहे. छायाचित्रणात एकंदरीतच प्रकाशापेक्षा छायेचंच प्रेम जास्त झालं आहे. तांत्रिक दोष एकवेळ यंत्रसामग्रीमुळे अपरिहार्य ठरले तरी,

'टायटल्स' काळजीपूर्वक द्यायला काय हरकत होती? चित्रपटाची सुरुवातच 'शिव प्रॉडक्शन' ऐवजी 'शिव पॉडक्शन' अशी होते, तो काही मोठा सुखद प्रारंभ प्रकार नव्हे. शिवा, प्रमूख अशा सामान्य शुद्धलेखनातल्या घोडचुका टायटल्समध्ये तरी टाळता येऊ नयेत? 'घर गंगेच्या काठी'च्या टायटल्समध्येही अशा चुका होत्याच.

जाता जाता: इतकं सगळं लिहायलाच हवं होतं का? मला वाटतं, 'भारतीय संस्कृती आपल्याला त्याग शिकविते,' हे वाक्यच पाचपन्नासदा छापलं असतं, तरी परीक्षणाचं काम भागलं असतं! ¤

# जानेमन

## बिचारा देव फसला!

जानेमन हा देवआनंदचा 'नवा' चित्रपट असं म्हणायला थोडं जडच जातं, कारण एक तर, देवच्याच जुन्या 'टॅक्सी ड्रायव्हर'चा तो 'रीमेक' आहे हे तसं सगळ्यांनाच ठाऊक आहे, आणि दुसरं म्हणजे तसे देवचे चित्रपट कधी नवे असतात? ह्या बाबतीत तर त्यानं राजकपूरलाही मागे टाकले आहे. अर्थात तरीही एकोणीसशे शहात्तरमध्ये प्रदर्शित झालेला असल्यानं मन घट्ट करून 'जानेमन' हा नवाच चित्रपट म्हटला पाहिजे.

या नव्या चित्राची नवी कथा सांगण्यात काहीच मतलब नाही. दोघी जुळ्या बहिणी- एक सज्जन, दुसरी वामनमार्गाला लागलेली, अर्थातच 'हालात' च्या मजबूरीमुळे—आणि त्यांच्यामध्ये लटकलेला एक रंगीला टॅक्सी ड्रायव्हर (रॉनी—देवआनंद) यांच्याभोवती फिरणारी ही कहाणी ठरल्याप्रमाणे रॉनी आणि संतो (हेमामालिनी) यांच्या मीलनानं संपते—अर्थात डान्सर कम स्मगलर बंतो उर्फ रामकली अत्यंत योग्य वेळी समजूतदारपणे गोळीला बळी पडल्यामुळेच.

देवआनंदच्या 'नवकेतन'च्या प्रारंभी त्याच्याबरोबर असणारे आणि मध्यंतरी दीर्घकाळ दुरावलेले दिग्दर्शक चेतन आनंद यांनी पुनश्च नवकेतनशी हातमिळवणी करून 'जानेमन' चं दिग्दर्शन स्वीकारल्यामुळेच तो रीमेक असल्याचं कळूनही आशा निर्माण झाली होती. चेतनसाहेबांनी आपल्या सरधोपट दिग्दर्शनानं तीही फोल ठरवली आहे. खुद्द देवआनंदनही यापेक्षा फार वाईट दिग्दर्शन केलं असतं असं वाटत नाही. चित्राच्या स्थळकाळाचा आणि वातावरणाचा मेळ चेतनना बिलकूल घालता आलेला नाही, त्यामुळे अनेक विसंगती निर्माण झाल्या आहेत. उदाहरणार्थ ही सगळी कथा नक्की कुठे घडते? आणि जिथे ती घडते त्या ठिकाणी भारतातल्या नाना शहर गावांचे specimens कसं जमा झालेले असतात? देवआनंदकडून त्याच्या पारंपारिक साच्याबाहेरचं काम करून घेता आलं नाही, याबद्दल चेतनना दोष देण्यात अर्थ नाही, कारण खुद्द देव दिग्दर्शक होता तेव्हा त्यालाही ते जमलेलं नव्हतं. हेमामालिनीच्या डबलरोलपैकी एक 'सीता' छाप आणि दुसरा 'गीता' टाइप आहे. त्यातला दुसरा ग्लॅमरस असायला भरपूर वाव होता; तथापि ती संधी सोडण्यात आली आहे. तेव्हा हेमाला एरवीइतकी आकर्षक न दिसल्याबद्दल चेतनसाबना दोष द्यावा की अनाठायी sex exploitation चा मोह टाळल्याबद्दल दुवा द्यावा हा प्रश्नच आहे. तथापि तिला दिलेली वेशभूषा—केशभूषा खटकते जरूर, काहीशी जुनाट, कालबाह्य वाटते प्रेमनाथला वेशभूषा करण्याचा फारसा प्रसंगच आलेला नाही, त्यामुळे हालांमध्ये भरच पडते.

नवकेतनच्या या चित्राला लक्ष्मी—प्यारेचे संगीत आहे, ते त्यांच्या परंपरेप्रमाणेच दिखाऊ, कामचलाऊ आणि हिणकस आहे. एकंदरीतच हा चित्रपट तसा कामचलाऊ थाटाचाच आहे. अर्थात प्रेक्षक तो कितपत चालवून घेतील, याबद्दल शंकाच आहे. बिचारा देव या बाबतीत मात्र फसला. आजपर्यंतचे नवकेतनचे सर्व चित्रपट देवचे वन मॅन शो असायचे. जानेमनमध्ये मात्र, अभिनयातच नव्हे, तर अगदी फुटेजमध्येसुद्धा डबलरोलमधल्या हेमानं देवला खणखणीत पिछाडी दिलेली आहे. अर्थात हे अभावितपणे घडलंय की बॉक्स ऑफिसवर नजर ठेवूनच घडवलंय देव जाणे! ¤

# मेहबूबा

## डबल बॅरल, डबल बोअर प्रेमकहाणी

सर्वसाधारण हिंदी चित्रपटात एक प्रेमकथा दाखवून निर्माते दिग्दर्शकमंडळींचं समाधान होतं, फार तर त्यातल्या त्रिकोणचौकोनादि भूमितीमध्ये थोडाफार—म्हणजे थोडाच फेरबदल केला की भागतं. पण गुलशन नंदा यांच्या टाकसाळीतून बाहेर पडलेल्या कथेवर पाडलेला 'मेहबूबा' हा चित्रपट काही औरच. एकपदरी प्रेमकथा प्रेक्षकांना पुरेशी बोअर करणार नाही की काय अशा भीतीनं पछाडलेल्या मुशीर—रियाझ (निर्माते) आणि शक्ती सामंतांनी (दिग्दर्शक) ही डबल बोअर दुपदरी प्रेमकहाणी दुनळी बंदुकीसारखी बापड्या प्रेक्षकांच्या माथी मारली आहे—खरं म्हणजे रोखली आहे. त्याचं असं झालंय की प्रकाश आणि रत्ना (राजेशहेमा) या राजनायक—राजनर्तकीचं प्रेम अफसल झाल्याने पुढील जन्मी पुनर्मीलनाची (appointment घेऊन—देऊन ते परस्परांचा आणि जगाचाही निरोप घेतात. पुढील जन्मात लेखकानं योजलेल्या कृत्रिम योगायोगाप्रमाणे दोघे भेटतातही, पण या जन्मीची भ्रमरी (रत्ना—हेमा) प्रकाशला ओळखत नाही. मग घाईला, रंजीला आणि हट्टाला आलेले प्रकाशजी जुन्या राजवाड्याच्या साहाय्यानं आणि दिग्दर्शकाच्या सूचनेनुसार चक्क सक्तीनंच तिच्या पूर्वस्मृती जागृत करतात आणि यथायोग्य अडचणी येऊन निवारल्या गेल्यानंतर ही दोन जन्म ताणलेली प्रेमकथा आटपते. एकाऐवजी दोन जन्मातलं म्हणजे दुप्पट प्रेमचप्रेम दाखवायची संधी मिळाल्यामुळं दिग्दर्शकानं राजेश—हेमाचा भरपूर उपयोग करून घेतलाय हे खरंच, पण तरीही अनावश्यक उदात्तीकरणापलिकडे (glorification) त्यांना एकाही जन्मातलं प्रेम establish करता आलेलं नाही. प्रेमिकांनी परस्परांबद्दल एका क्षणात गैरसमज करून घेणं, एकमेकांच्या जीवनातून दूर होण्यासाठी प्रेमिकेनं प्रियकराच्या मनात स्वत:विषयी अकारणच खोटआकस-तिरस्कार निर्माण करणं, असले बट-

बटीत, सांकेतिक, ठिसूळ, पारंपरिक प्रसंगही सडा घातल्यासारखे शिपडले आहेत. या सगळ्या भानगडीत प्रेमाशिवाय बाकीचा मालमसाला पेरायचा राहूनच गेल्याची आठवण मध्येमध्येच अचानक झाल्यानं चित्राच्या उत्तरार्धात प्रेम चोप्राजींचं प्रस्थ वाढलं आहे. चित्रपटाचा शेवटचा काही भाग तसवीर का सबूत इ. इ.–तर अडाण्यानाही विश्वासार्ह आणि शक्यकोटीतला वाटणार नाही. डाकबंगल्यात प्रकाशला झुमरीच्या वेषात रत्ना भेटते या हास्यस्फोटक प्रकारामुळे लेखकांना आत्मा–भूत इ. वर विश्वास ठेवायचा आणि ठेवायला लावायचा आहे की नाही याचा पत्ता लागत नाही. बरं, पुन्हा चित्रपटाला सामाजिक संदर्भ वगैरे शून्य. सगळा wonderland fair'y tale चा मामला. म्हणजे दोन जन्मातली दोन प्रेम प्रकरणं दाखवताना, मध्ये एका पिढीचं अंतर लोटून गेलंय याची दादफिर्यादही नाही. राजेश–हेमा यांनीही अशा काही फरकाचं भान अभिनयात ठेवलेलं नाही. नुसती मिशी ठेवून किंवा नेशभूषा बदलून राजगायकाचा पॉपसिंगर किंवा राजनर्तकीची आदिवासी तरुणी व्हायला, ही काय जादूची शाळा आहे का जत्रेतला तमाशा? दिग्दर्शन–निदान शक्ती सामंत असताना–इथं दिसावं अशी अपेक्षा होती, ते सोडून भव्य सेट्स् आणि नयनरम्य पार्श्वभूमी, लोकेशन्स निवडण्यातच त्यांची अक्कलहुशारी पणाला लागलेली दिसते.

राहुलदेवचं बऱ्यापैकी ऐकणीय भारतीय संगीत आणि हेमामालिनीची नृत्यं, ही संपूर्ण चित्रपटातली एकमेव जमेची बाजू. 'मेरे नैना सावन भादो' (याच मुखड्याचं एक सुरेल गाणं लतानं 'विद्यापती' चित्रपटात गायलं होतं. तोच उचलण्याचं कारण समजलं नाही.) हे सध्याचं एक लोकप्रिय गाणं लता–किशोर दोघांनीही वेगवेगळं म्हटलंय्. किशोरच्या गाण्यातला अतिकृत्रिम बनावटी दर्द ऐकवत नाही. चित्रपट राजेश–हेमाभोवतीच इतका गरगरलाय् की इतर कुणाबद्दलच काही लिहिण्याजोगं नाही. गेस्ट अॅपियरन्समध्ये चमकलेल्या योगिताबालिचाच तेवढा सन्मान्य अपवाद!

◻

# चितचोर

## रवीन्द्र जैन वगळता सगळे नुसतेच चोर

'चितचोर ही एक साधीसरळ प्रेमकहाणी आहे.' या वाक्यानं खरं तर झक्क सुरुवात करता आली असती, पण हे आणि *अशी वाक्यं 'रजनीगंधा' आणि 'छोटी सी* बात'च्या संदर्भात वापरून झाली आहेत, आणि बासू चतर्जी वेगळं काही म्हणायची लिहायची संधीच देत नाहीत, तेव्हा सुरुवातीशिवायच सुरुवात करावी लागणार! 'रंजनीगंधा' वर अफाट प्रेम केलेल्या रसिकांनी 'छोटीसी बात'ला पसंतीची पावती देतानासुद्धा बासू चतर्जी एखादी पायरी (पायरी अर्थातच यशोमंदिर वगैरेची!) खाली उतरल्याची शंका व्यक्त केली होती. हे खरं मानलं तर 'चितचोर' *या त्यांच्या* नव्या सप्तरंगी सिनेमास्कोप चित्रपटात बासू चतर्जी दहापाच पायऱ्या सहज गडगडले आहेत असं म्हणायला हवं. एक तर, चित्रपटाची रंजक कथाकल्पना आणि संवादाची बाजू जमेला धरली की, बासूची नक्की contribution शोधायलाच लागते. नावीन्याचा अभाव हे बासूच्या मांडणीचं पहिलं वैशिष्ट्य. characters निर्माण किंवा सादर करण्याचं त्याचं तंत्र, ती develop करण्याची हातोटी, लहानसहान sequences मधून कथा आणि पात्र दोघांनाही पुढे घेऊन जाण्याची हाताळणी यामध्ये रंजनीगंधा' नंतर 'छोटीसी बात'मध्ये जो महत्त्वाचा फरक, त्या चित्रपटाच्या प्रवृत्तीला सुसंगत असाच पण बासूचं इतरांपासूनचं वेगळेपण कायम ठेवणारा, झालेला दिसला, त्यांचा लवलेशही चितचोरमध्ये नाही. विशेषत: *या तीन* चित्रपटातल्या त्याच्या गाण्यांच्या 'टेकिंग'ची तुलना केली तर माझा मुद्दा स्पष्ट होईल. रंजनीगंधा किंवा छोटीसी बात ही खास बासू प्रॉडक्टस् म्हणता येतील. 'चितचोर' मात्र तीच चाकोरी पकडण्याचा प्रयत्न करीत असूनही त्यांच्यापासून फार दूर आहे, आणि याचं कारणही हात्र चाकोरी पाडण्याचा आणि पकडण्याचा प्रयास आहे. चितचोरमध्ये बासूची कामगिरी अन्य कोणीही प्रतिभावंत दिग्दर्शक निभावू शकला असता, आणि दिग्दर्शनदृष्टया असा सामान्य असलेला चित्रपट असामान्य दिग्दर्शन लाभलेल्या चित्रपटाची चाकोरी धरू पाहील तर अपयश अपरिहार्यच! नेत्रसुखद छायाचित्रणाच्या जोडीला फक्त नीटस दिग्दर्शन लाभलेलं हे चित्र उचलण्यासाठी कलाकारांनीही काहीं फार *खास कामगिरी बजावल्याचं दिसत* नाही. अमोल पालेकरनं आपली भूमिका ठाकठीक सजविली आहे एवढंच. एरवी 'रंजनीगंधा'च्या फार पुढे पाऊल नाही. त्यानं (पडद्यावर) गाणी मात्र छान म्हटली आहेत. झरीना वहाबवर जया भादुरीची नक्कल केल्याचा आरोप केला गेलेला आहेच, तो खरा वाटावा *अशी* उदाहरणंही शोधू म्हणता यात सापडतील, तथापि ती नक्कल करीत नसल्याचं सिद्ध झालं तरी नजरेतला दोष आणि बेडौल बांधा यावर मात करून ती फार काही कमवू शकेलसं वाटत नाही. नवा नट विजयेंद्र, ए. के. हनगल वगैरे साहाय्यक कलाकार समाधानकारक.

चितचोरच्या कथेचा तोंडवळा फारसा नवा नसला तरी साधा आणि रंजक आहे. मधुपूर गावात येणाऱ्या ओव्हरसिअरचं (अमोल) त्याला इंजिनिअर समजून गावच्या हेडमास्तरांकडून भलतंच आदरातिथ्य होतं. आपली कन्यका उजवण्याचा छुपा हेतू अर्थातच त्यामागे असतो. हे लग्न जवळजवळ ठरल्यानंतर खरे इंजिनिअरसाहेब येऊन थडकतात आणि मग उडालेल्या भावनिक घोळघोटाळ्यानंतर अर्थातच खरे प्रेमी विजयी ठरतात, तेही पुन्हा कुणाला न दुखवता. अशा या कथेत खराखुरा जीव, रस, सूर कुणी ओतला असेल तर तो संगीतकार रवीन्द्र जैननं. थोड्या अवधीत उत्तम सेट् झालेल्या *या गुणी संगीतकारानं रागदारीतल्या कुलवंत* देखण्या चिजांचा नुसता दरबार इथं भरवला आहे. 'गोरी तेरा गाँव बड़ा प्यारा' आधीच लोकप्रिय झालंय्, पण 'जब दीप जले आना' आणि 'तू जो मेरे सुर में' सुद्धा एकाहून एक चढत्या रंगतीसंगतीची सूरलेणी आहेत. विशेषत: 'तू जो मेरे' हे गाणं आणि त्याचं चित्रण, *दोन्ही लाजवाब.* इतका सुरेल चित्रपट याआधी किती काळापूर्वी पाहिला असेल आणि यानतर किती काळानं पहायला मिळेल, कुणास ठाऊक!

*कदाचित–रवीन्द्र जैनलाच ठाऊक!!*

–शिरीष सहस्रबुद्धे

# माओच्या नवचीनमध्ये (१९७३) : पृष्ठ ५ वरून

ळले. पूर्वी कृषिकर शेतीउत्पादनाच्या स्वरूपात सरकारला द्यावा लागे. हे प्रमाण सरकारने अनेक वर्षांपूर्वी गोठवून टाकले आहे. पूर्वी कम्युनमधील उत्पादनाचा जवळजवळ बारा टक्के भाग कररूपाने सरकारला द्यावा लागत असे. सतत होत असलेल्या उत्पादनवाढीमुळे हे प्रमाण आता सहा टक्क्यावर आले आहे. सरकार शेतीउत्पादन खरेदी करताना शेतकऱ्यांना पूर्वी जो भाव देई तो सरकारने वाढवला आहे–मात्र ग्राहकांना तो विकताना आकारावयाची किमत सरकारने पूर्वीचीच ठेवली आहे. या दोन्ही किमतीतला फरक सरकार सब्सिडी देऊन भरून काढते.

कृषीकराव्यतिरिक्त सरकार मालाच्या खरेदी-विक्रीवर कर आकारते. हा कर एका दृष्टीने विक्रीकरच होय. चीनमध्ये संपत्तीची वाटणी समान असल्याने विक्रीकराचे ओझे गरिबावर अधिक व श्रीमंतावर कमी असा प्रकार होत नाही. चैनीच्या वस्तूंवर कितीतरी पटीने जादा कर बसवण्यात आला आहे. आयात केलेल्या घड्याळांवर चारशे टक्के विक्रीकर आकारण्यात येतो.

चीनने मनुष्यशक्तीचा वापर मोठ्या हुशारीने केलेला आहे. उत्पादनासाठी तिचा उपयोग होतोच पण, समाजातील विषमता कमी व्हावी असाही उद्देश त्यामागे दिसतो. बहुतेक तरुण–तरुणींना हिरवा लष्करी गणवेष चढवून देशाच्या संरक्षणासाठी लष्करी शिक्षण घ्यावे लागते. ग्रामीण भागांतील ८० टक्के लोक लष्करी शिक्षणासाठी भरती होतात. मी माझ्या हॉटेलच्या खिडकीतून रोज एक दृश्य पाहत होतो : लष्करी गणवेषातील तरुण–तरुणी परेड करीत आणि त्यानंतर गवत कापणे, वाळवणे यासारख्या बिनलष्करी कामात गुंतून जात. अनेक सैनिक रेल्वेमार्ग दुरुस्तीचे काम करताना मी पाहिले.

शहर आणि खेडी अधिकाधिक जवळ यावीत म्हणून विशेष प्रयत्न चाललेले माझ्या दृष्टोत्पत्तीस आले. शहरी तरुणांची दूरदूरच्या शेती पिकविणाऱ्या प्रदेशांत रवानगी करण्यात येते. मुले–मुली सतरा–अठरा वर्षांची झाली की त्यांना कम्युनमध्ये दोनतीन वर्षे काम करावे लागते. शारीरिक कष्टाची कामे करण्याची सवय त्यांना लागावी म्हणून शाळेतच प्रयत्न केले जातात. अशी कष्टाची कामे हा अभ्यासक्रमाचा एक भाग मानला जातो. सहा दिवसांतील एक किंवा दीड दिवस एखाद्या दुकानात किंवा अन्य उत्पादक कार्यात मुलांनी घालवावा अशी तरतूद करण्यात येते. सायकलदुरुस्तीची कामे करणारी, इलेक्ट्रिक ट्रान्स्फॉर्मरचे सुटे भाग जोडणारी अनेक शाळकरू मुले मी पाहिली. खाण्याचे डबे बाकावर ठेवून सार्वजनिक बागेतील हिरवळ कापण्यात वा झाडे कापण्यात मग्न झालेली मुले सर्रास आढळून येतात. कॉलेजात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थीसुद्धा अभ्यासक्रमाबरोबर अशा प्रकारची उत्पादक, अंगमोडीची कामे करीत असताना दिसतात. विविध संस्थांतील व्यवस्थापकीय विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वर्षातून काही दिवस कारखान्यात वा शेतावर शारीरिक कष्टाची कामे करावी लागतात. चीनमध्ये सामाजिक सेवा भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे त्यामुळे मुलेबाळे असलेल्या आयांनासुद्धा काम करणे सोपे झाले आहे. प्रत्येक कारखान्याला जोडून नर्सरी स्कूल, के. जी. व प्राथमिक शाळा असते. लहान मुलांना तेथे ठेवून आया कारखान्यात नोकरी करू शकतात. कामावर असताना मधून-मधून मुलांकडे जाऊन येण्याची त्यांना मुभा असते. वेळप्रसंगी मुलांना आठवडाभर या संस्थांतून ठेवण्याची तेथे सोय असते.

माझ्याबरोबर राहून दुभाषाचे काम करणारी तरुण व तरुणी पेकिंगच्या 'इन्स्टिटयूट ऑफ वेस्टर्न लँग्वेजीस'मध्ये शिकत होती. दोघे विवाहित होती. तरुणाची पत्नी प्राथमिक शाळेत शिक्षिकेचे काम करीत होती. तरुणीचा पती विमाने तयार करण्याच्या कारखान्यात तंत्रज्ञ होता. दोघांचे जोडीदार विद्यापीठापासून दूर काम करीत होते. सहा दिवस काम करून सुट्टीच्या दिवशी ही जोडपी एकत्र येत. एकत्र सहवासासाठी त्यांनी गावात छोटे घर भाड्याने घेऊन ठेवले होते. आठवड्यातून एक दिवस भेट. पुन्हा आपापल्या कामाच्या जागेवर परत !

चीनमध्ये कामाचे दिवस सरसकट आठवड्यातून सहा दिवस. वर्षाला फक्त पाच राष्ट्रीय सुट्टीचे दिवस असतात. जवळचे नातेवाईक दूर राहत असतील तर त्यांना भेटण्यासाठी वर्षातून चौदा दिवस पगारी रजा मिळते. नोकरवर्गास प्रवासाचा खर्च दिला जातो. सेवानिवृत्तीचे वय पुरुषांसाठी साठ व स्त्रियांसाठी पंचावन्न. या वयात सेवानिवृत्त झालेच पाहिजे असे नाही. चीनमध्ये उत्पादक कार्यासाठी पारंपरिक पद्धतीचा अवलंब करण्यात येत असल्याने कामगारांच्या शरीरावर खूप ताण पडतो. त्यामुळे सेवानिवृत्तीचे वय एका दृष्टीने कमी ठेवले असावे. औद्योगिक कामगारांना त्यांच्या कमाल वेतनाच्या ७० टक्के निवृत्तिवेतन मिळते. कम्युनमध्ये काम करणारे निवृत्त झाल्यावर त्यांची जबाबदारी मुलांवर पडते. मुले नसली तर वृद्ध माणसांची काळजी कम्युनला घ्यावी लागते. हे वृद्ध लोक आपल्या घरात राहतात पण जेवणखाण आळीपाळीने शेजाऱ्यांकडे घेतात. पिकल्या केसांना इथे मान दिला जातो. त्यांच्याकडे मानवतेच्या दृष्टिकोणातून पाहिले जाते. मृत्यूनंतर अशा वृद्ध माणसाची योग्य प्रकारे उत्तरक्रिया करण्याचे दायित्व कम्युनवर असते. मोठमोठ्या कुटुंबसंस्था आता भूतकाळात जमा झाल्या आहेत. सामाजिक जीवन आता छोट्या कुटुंबाच्या पायावर उभे राहिले आहे.

ऐंशी कोटी लोकसंख्या कोणत्याही देशाच्या मानाने फार झाली हे चीनने अर्थातच जाणले आहे. लोकसंख्यावाढ आटोक्यात ठेवण्यासाठी सर्व तऱ्हेच्या उपाययोजना करण्यात येतात. लग्नाचे वय स्त्रियांसाठी २६–२७ व पुरुषांसाठी २८–२९. कुटुंबनियोजनाच्या सर्व पद्धती विवाहितांना शिकवल्या जातात. गर्भपातासाठी एक डॉलर फी आकारली जाते. शहरांत जननसंख्येचे प्रमाण खूप खाली आले आहे. ग्रामीण भागात जननप्रमाण तीन टक्के व मृत्युप्रमाण दीड टक्का आहे.

जगातील अनेक विकसनशील देशांत उद्योगधंद्यांच्या विकासास अग्रक्रम दिला जातो. चीनमध्ये नेमके उलटे आहे. शेतीस प्रथम स्थान, मग हलक्या उद्योगधंद्यांना व शेवटी अवजड उद्योगधंद्यांवर भर–असा हा क्रम आहे. पुढील पिढ्यांचे जीवनमान सुधारावे या उद्देशाने मोठ्या उद्योगधंद्यांत प्रचंड गुंतवणूक करण्याऐवजी चालू पिढीच्या किमान गरजा भागाव्यात, त्यांना एक विवक्षित जीवनमान सांभाळणे शक्य व्हावे यावर चीनने अधिक भर दिला आहे. याचा अर्थ असा नाही की, चीनमध्ये आर्थिक प्रगती मंदगतीने होत आहे. उलटपक्षी चीनच्या आर्थिक प्रगतीचा वेग दरवर्षी सहा ते सात टक्के आहे. औद्योगिक संस्था व कम्युन यांच्याकडे असलेल्या शिलकीचा गुंतव-

णुकीसाठी उपयोग केला जातो. त्याचप्रमाणे व्यक्तिगत बचतीचाही. सर्व कामगार मिळकतीच्या दहा टक्के बचत करतात. कामगारांना खाजगी रीत्या जमीन पिकवून, डुकरे व अन्य प्राणी सरकारला विकून जादा प्राप्ती मिळवता येते.

शिक्षण सोडल्यास अन्य कोणतीही सार्वजनिक सेवा मोफत नाही. 'फॉरबिडन सिटी ऑफ पेकिंग' या म्युझियमला भेट देण्यासाठी पाच सेंट, डॉक्टरांची फी दहा सेंट, हॉस्पिटलमधील भाडे प्रतिदिनी पन्नास सेंट व शिवाय वैद्यकीय उपचारासाठी पस्तीस सेंट. अर्थात वैद्यकीय खर्च कारखान्याकडून, कम्युनकडून मिळतो.

आर्थिक व्यवहारांसाठी चीनने रशियाचा आदर्श पुढे ठेवला आहे. तथापि चीनमध्ये उपयोगात आणण्यात येणारे तंत्रज्ञान जुने आहे, पारंपरिक पद्धतीचे आहे. साहजिकच रशियाचा आदर्श पुढे ठेवताना आवश्यक ते बदल चीनने स्वीकारले आहेत. निर्यात करण्यासाठी चीनकडे कोणत्या वस्तू आहेत याची चौकशी करता मला हस्तव्यवसाय, उत्पादनांची व खनिजांची यादी देण्यात आली !

मजुरांची उत्पादकता वाढावी म्हणून उत्पादनाची नवनवी तंत्रे चीन आत्मसात करू लागला आहे. रासायनिक खते, स्वयंचलित पंप, ट्रॅक्टर यांचा अधिकाधिक उपयोग होत आहे. पूर्वी चीनमध्ये अनेकदा भयंकर दुष्काळ पडत असे. अलीकडे दुष्काळ पडलेला नाही. पाच वर्षांपैकी दोन वर्षांत उत्तम पिके, दोन वर्षांत वाईट पिके व एका वर्षी दुष्काळ असे तेथील सर्वसाधारण गणित आहे. त्यादृष्टीने तयारी केली जाते. अन्नधान्याचा साठा 'बफर स्टॉक' म्हणून ठेवण्यात येतो व दुष्काळी परिस्थितीवर मात केली जाते. पूर्वी अशी पद्धतशीर योजना अंमलात येत असे खरी, पण ती श्रीमंतांसाठीच राबवली जाई. आता प्रत्येकाला पुरेसे अन्नधान्य देण्याचा पत्कर सरकारने घेतलेला आहे.

जगातील पुढारलेल्या देशात इतकेच नव्हे तर अनेक अविकसित देशांत दरडोई उत्पन्न व प्रगतीचा वेग चीनच्या तुलनेने कितीतरी आहे ही गोष्ट खरी, पण दरडोई उत्पन्नाचे आकडे फसवे असतात. सुखवस्तू व दरिद्री लोक यांच्यात जी मोठी दरी असते ती निव्वळ दरडोई उत्पन्नाचे आकडे ध्यानी घेतल्यास दिसेनाशी होते. सर्वांच्या एकूण मिळकतीच्या आकड्यास लोकसंख्येने भागून दरडोई उत्पन्नाचा आकडा काढण्यात येतो. लोकसंख्येत अंतर्भूत असलेल्या खालच्या ५ ते १०० टक्के अत्यंत दरिद्री लोकांचे दरडोई उत्पन्न जमेस धरले तर चीन जगातील अनेक देशांत बरचा क्रमांक पटकावील. चीनचे वैशिष्ट्य हेच की दरडोई उत्पन्न कमी असूनही त्या देशाने आत्यंतिक दारिद्र्य मोठ्या जिद्दीने हटवले आहे. सर्वांना तिथे काम आहे. कोणी बेकार नाही. हाती घेतलेले काम हसतमुखाने पार पाडणे ह्यातच प्रत्येक कामगार इतिकर्तव्यता मानतो.

चीनमधील नियोजक यशस्वी झालेले का दिसते ? अन्य अनेक देश प्रगतीच्या मार्गावर अडखळत पावले का टाकीत आहेत ? वास्तविक सामुदायिक कृती यशस्वी करून दाखविणे अधिक जबाबदारीचे म्हणून अधिक अवघड. खाजगी मालकीच्या बाबतीत अनेक व्यक्ती आपापल्या कुवतीनुसार प्रयत्न करीत असतात, आपल्या प्रयत्नांची फळे चाखीत असतात. एखादा अयशस्वी झाला तर तो पुन्हा प्रयत्न करतो, पण त्याच वेळी अनेक यशस्वी संयोजकांच्या योजना फलद्रूप होत असतात. सामुदायिक जबाबदारीच्या बाबतीत काही चूकभूल झाली तर त्याचे टेपर आणखी कुणावर ठेवता येत नाही. अपयशाचे विपरीत परिणाम सर्वांना सामुदायिकरीत्या भोगावे लागतात. कधी नेतृत्व अपयशी ठरते, कधी नियोजनकार अपयशाचे धनी होतात. अनेकदा अपेक्षा उंचावलेल्या असतात पण त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न अपुरे पडतात. परिणामी निराशा, परस्पराविषयी संशय यांमुळे वातावरण गढूळ होते. चीनमध्ये हे घडलेले नाही. तेथील योजना तयार करणाऱ्यांनी जे आश्वासन दिले ते त्यांनी पाळले आहे, ज्या अपेक्षा निर्माण केल्या त्या फळाला याव्यात म्हणून यशस्वी प्रयत्न केले आहेत.

अर्थकारणाने तेथे जो समतोल सांभाळला आहे त्यात बिघाड होत नाही असे नाही. एखादा वेगळा सूर निघतोही कधीकधी. म्हणूनच सार्वजनिक सुबत्तेसाठी सामुदायिक प्रयत्न कसे आवश्यक आहेत हे प्रत्येकाच्या मनावर ठसावे म्हणून एकसारखा प्रचार चालू असतो.

अनेक वर्षे उपभोग्य वस्तूंच्या किमती कायम ठेवण्याने मागणी व पुरवठा यांतील अंतर कमी करण्याचे 'किंमतपद्धती' चे जे महत्त्वाचे कार्य ते चीनमध्ये नीटपणे पार पाडले जात नाही ही गोष्ट चीनमधील अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केली. पण किमतीत चढउतार झाले तर ग्राहक दुखावतो. त्यामुळे तो धोका पत्करावयास अर्थतज्ज्ञ तयार नाहीत.

सांस्कृतिक क्रांतीच्या वेळी चीनच्या सामाजिक जीवनात उलथापालथ झाली. त्यानंतर नियोजनकारांनी एकच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवले. सर्व लोकांच्या किमान गरजा भागवायच्या. याहून अधिक आश्वासने ते देत नाहीत. नियोजनकारांनी दिलेली वचने पाळल्याचे पाहून तेथील लक्षावधी कामगार सहकार्याचा हात पुढे करीत आहेत, सरकारी योजना पार पाडण्यासाठी झटत आहेत. अर्थात हेही खरे की कडक शिस्तीचा बोजा असह्य झाल्याने अनेक लोक हाँगकाँगची सरहद्द ओलांडताना दिसतात.

आज चीनची अर्थव्यवस्था कृषिप्रधान, पारंपरिक पद्धतीवर आधारलेली आहे. गुंतवणुकीचे प्रमाण वाढले, तांत्रिक विकास घडून आला आणि लोकसंख्यावाढीची गती कमी झाली की लोकांना किमान गरजांहून काहीतरी अधिक मिळेल. हे घडवून आणणे अधिक गुंतागुंतीचे आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. अर्थव्यवस्थेचे विविध विभाग परस्परावलंबी झाले, देशातील वेगवेगळ्या प्रदेशांचे हितसंबंध एकमेकांत गुंतून राहू लागले की विकेंद्रीकरण आणि स्वावलंबन पूर्वी इतके परिणामकारक होत नाही. अमेरिका हा धडा कधीच शिकली आहे ! त्याचबरोबर किमान गरजांहून अधिक काही मिळाले म्हणजे समतेवर अधिष्ठित समाज निवडीचे स्वातंत्र्य मागतो. आज समाजवादी चीनमध्ये आचारविचाराचे, विचारांच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नाही. ही चैन आपल्याला परवाडणारी नाही असा दावा येथील नेते करतील. आर्थिक सुबत्ता व सामाजिक न्याय एका बाजूला व बौद्धिक स्वातंत्र्य दुसऱ्या बाजूला. अशा वेळी सर्वसामान्य माणूस पहिल्याची निवड करील हे सांगायला नको. परंतु विविध विचारांचा संघर्ष हाच मानवाला प्रगतिपथावर नेतो. निरोगी मानसिक वाढीसाठी विचारस्वातंत्र्य ही एक अपरिहार्य गरज आहे. असा आहार दीर्घकाळात मिळाला नाही तर त्याबद्दलची भूकच नष्ट होण्याची शक्यता आहे. तसे झाले तर अर्थरचनेची अनेक उपांगे हळूहळू क्षीण होतील आणि साऱ्या अर्थरचनेची नैसर्गिक वाढ खुंटेल. रशियात आणि अन्य अनेक समाजवादी देशांत या प्रक्रियेचा पडताळा मिळाला आहे. अशा परिस्थितीत सांस्कृतिक क्रांतीसारखी आकस्मिक घटना अर्थव्यवस्थेचे दौर्बल्य घालवू शकेल. पण काय नेम—! □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

१८।९।७६ ते २४।९।७६

**मेष : प्रगतीचा काळ**

गुरू दुसरा, रवी व मंगळ सहावे व शनी चौथा असे एकंदरीत ग्रहमान आहे. मनः-स्वास्थ्याला अधूनमधून अडथळे येत असले तरी, ग्रहमान अनुकूल आहे. जमीन, फ्लॅट, प्लॉट वगैरेंच्या कामाला अनुकूल चालना मिळेल. आरोग्यात सुधारणा होऊन मनाचा उत्साह जागा होईल. वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाचे तटेबखेडे निर्णयाप्रत येतील व त्यामुळे अपेक्षित समाधान मिळेल. नोकरीत तुमच्या विरुद्धच्या गुप्त कारवाया थंडावतील. पगारवाढ, प्रमोशन वगैरे समस्या सुटण्याच्या मार्गाला लागतील. ज्यांना काम बदलून हवे असेल किंवा अडचणीच्या ठिकाणाहून बदली करून घ्यायचे प्रयत्न करायचे असतील, तर बरीच अनुकूलता आहे.शुभ दिनांक १८–२०.

**महिलांना :** खूपच समाधान देणारा हा काळ आहे. अपेक्षा सफल होण्याची चिन्हे दिसू लागतील.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात हेतुपूर्वक प्रयत्न करा.

**वृषभ : सारेच ठीक**

अनेक प्रकारच्या कटकटींतून थोडीफार उसंत देणारा हा सप्ताह आहे. शारीरिक, मानसिक व सार्वजनिक असे जे अनेक प्रश्न तुमचे डोके उठवीत आहेत त्यांतून समाधान-कारकपणे सुटण्याची चिन्हे दिसू लागतील. व्यवसायातील–प्रामुख्याने आर्थिक–अडचणी कमी होण्यासारखा आशादायक काळ आता सुरू झाला आहे. तिसरा शनी कर्तृत्वाचे क्षेत्र वाढवणार आहे, तर पाचवा रवि-मंगळ साहाय्याच्या अनेक योजना दृष्टिपथात आणणार आहे. उद्योगातील मंदीचा काळ सपून काही जुन्या योजना यशस्वी ठरतील. नोकरी नसेल त्यांना ती मिळेल व ज्यांच्या नोकरीत त्रास, अडचणी असतील त्या दूर होऊन सुसह्यतेची दिशा दिसू लागेल. शुभ दिनांक १९–२०.

**महिलांना :** कौटुंबिक सौख्य मिळेल. आरोग्यात सुधारणा होईल.

**विद्यार्थ्यांना :** स्वावलंबनाचे स्वप्न साकार होईल.

**मिथुन : उपासना करा**

दुसरा शनी, बारावा गुरू आणि रवि-मंगळ चौथे हे ग्रहमान मिथुन राशीच्या व्यक्तींना फारसे अनुकूल आहे असे म्हणता येणार नाही. पण नियती अनुकूल व प्रति-कूल अशा दोन्ही प्रकारच्या वाटांनी माणसाला नेत असते. त्याला इलाज नसतो. फक्त कुलदेवतेची मनोभावे प्रार्थना हाच त्यावर रामबाण उपाय असतो. तुम्ही सध्या तेच केले पाहिजे, म्हणजे मन शांत राहून परिस्थितीला तोंड देण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. नोकरीत पैशाच्या बाबतीत अतिशय काळजी घ्या. आडमार्गाने तो मिळवण्याचा प्रयत्न करू नका. वरिष्ठांबरोबर संबंध ताणू नका. आर्थिक बाजू जेमतेम गरज भागवील. शुभ दिनांक २०–२१.

**महिलांना :** लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. आपल्या कामाशी प्रामाणिक राहावे.

**विद्यार्थ्यांना :** तात्पुरता फायदा होईल. मुलाखत मात्र पुढे ढकलावी.

**कर्क : संधी येत आहे**

हा आठवडा तुमच्या अनुकूलतेत भर घालणारा आहे. रवि-मंगळ तिसरे तर गुरू अकरावा. ही ग्रहांची परिस्थिती अनुकूल आहे. आशा-आकांक्षा पालवतील. अनेक दिवसांची इच्छा अनपेक्षितपणे पुरी होईल. एखाद्या जुन्या मित्राकडून महत्त्वाचे काम पार पडेल. तुमच्या मनात परदेशी जायचे असेल, तर यावेळी प्रयत्न करा. यश येईल. अनेक क्षेत्रांत प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टि-पथात येतील. नोकरी नसेल तर ती मिळेल. ज्यांना नोकरी असेल त्यांच्या नोकरीतील अडचणी दूर होतील. लेखनाची स्फूर्ती मिळेल. गायनाची मैफल गाजून लोकप्रियता मिळेल. धंद्यात पुढे पाऊल पडेल. शुभ दिनांक १८–२१.

**महिलांना :** फार छान आठवडा आहे. आशा-आकांक्षा सफल होतील.

**विद्यार्थ्यांना :** नव्या क्षेत्रात पदार्पण करता येईल.

**सिंह : समस्येची उकल**

एकटा शनी बारावा आहे. तो साडेसाती निर्माण करीत असला तरी, त्याला यश येणार नाही. मध्यंतरीचा कोंडमारा आता बराच कमी होत आहे. अनुकुल ग्रहमान तुमच्यावर दया दाखवीत आहे. तुमच्यावद्दलच्या सहा-भूतीत आणि मदतीत वाढ होत आहे. अस्थिरपणा दूर होईल. कोणती ना कोणती मनांत आलेली भीती आता इतिहासजमा होईल. नोकरीधंदा, समाजसेवा, राजकारण यांत अडचणीवर मात करून तुम्ही समर्थपणे पुन्हा उभे राहणार आहात. विरोधकांच्या कारवाया थंडावतील व ते हाताशपणे तुमच्या यशाकडे पाहत बसतील. शुभ दिनांक २१-२३

**महिलांना :** मान चालत येणार आहे चिंता नको.

**विद्यार्थ्यांना :** यश व कीर्ती मिळणार आहे.

**कन्या : महत्त्व वाढेल**

रवी-मंगळासारखे महत्त्वाचे ग्रह सध्या तुमच्या राशीत तळ ठोकून बसले आहेत. हे ग्रह तुमचा आत्मविश्वास वाढवून तुमच्या हातून अनेक महत्त्वाची कामे पार पाडणार आहेत. मन शंकीत ठेवू नका. जे काही तुम्हाला ठरवायचे असेल ते ठरवून टाका. लेखनातील अडथळे दूर होतील. नव्या दमाने कामाला सुरवात होईल. कौटुंबिक बेबनाव होणार नाही. गैरसमज दूर होऊन तुमचे समाजातील व कुटुंबातील स्थान अधिक बळकट होईल. आर्थिक परिस्थिती अजून म्हणण्यासारखी सुधारणे जरा अवघड आहे. नोकरीत थोडे समाधान मिळेल. प्रतिष्ठा व मान वाढेल. प्रकृती उत्साहवर्धक राहील. शुभ दिनांक २३–२४

**महिलांना :** स्वतःच्या तब्येतीची उत्तम काळजी घेणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांना :** विशेष प्रावीण्य मिळवू शकाल.

## तूळ : पैशाची अडचण

मित्रहो; तूळ रास सध्या तरी थोडीफार मरगळल्यासारखी झाली आहे, कारण रवी-मंगळ बारावे आहेत. कितीही पैसा मिळाला तरी, तो हाती टिकू देत नाहीत. तरीपण काळजीपूर्वक खर्च केल्यास अडचणीची पाळी येणार नाही. रेस व लॉटरीत स्वतःला अडकून घेऊ नका. मात्र राहणीमान सुधारेल. उच्च राहणी होईल. फॅशनवर पैसा खर्च होईल. नोकरीत वरिष्ठांवर इम्प्रेशन मारून जाल. नव्या उद्योगाची सुरुवात थोडी लांबणीवर टाका. गाठीभेटी होतील पण काम अर्धवट राहील. स्थानांतराची शक्यता आहे. बदली होऊ शकेल. प्रवास सुखकारक होईल. शुभ दिनांक २१-२२

**महिलांना :** अवांतर गोष्टीत लक्ष घालू नका. नोकरीत वक्तशीर राहा.

**विद्यार्थ्यांना :** महत्त्वपूर्ण घटनांनी आठवडा जाईल.

## वृश्चिक : आर्थिक लाभ

वृश्चिक राशीच्या व्यक्ती खूपच भाग्यवान ठरणार आहेत. सध्या अनेक बलवान ग्रहांची तुमच्यावर फार मर्जी आहे. त्यामुळे जे कराल ते यश घेऊन निघेल. जमीन खरेदी करा व शेतीची सुरुवात करा. स्टेशनरी, नर्सरी, भांडी व सोने या व्यापाराशी जे संबंधीत असतील ते बराच पैसा मिळवणार आहेत. कापडधंदा यशस्वी होईल. नोकरदारांनी दुय्यम व्यवसाय सुरू करावा. नोकरीत आपल्या मागण्या वरिष्ठांकडून पुऱ्या करून घेण्यात ते मोठे यशस्वी ठरतील. खाजगी नोकरीत नोकरास अनेकांचे हुद्दे वाढतील. बेकारांना काम व धंद्यासाठी भांडवल मिळेल. प्रतिष्ठा उंचावेल. आशा-आकांक्षा सफल होतील. शुभ दिनांक १९-२१

**महिलांना :** नव्या घरगुती कामाचा शुभारंभ करता येईल.

**विद्यार्थ्यांना :** आशाआकांक्षा सफल होतील.

## धनु : नोकरीत मान उंचावेल

तुमच्या दशमात कन्या रास असून रवि-मंगळ समर्थपणे तुमच्या मदतीसाठी तेथे उभे आहेत. त्यामुळे अनेक क्षेत्रात कर्तबगारी गाजवण्याची संधी मिळणार आहे. नोकरीत प्रामुख्याने बरेच मोठे स्थान प्राप्त होणार आहे. वरिष्ठांबरोबर विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. अडथळे निर्माण करणाऱ्या व्यक्ती दूर होतील. तुम्ही जी एखादी योजना मांडाल ती त्यांना मान्य होऊन तुम्हाला ती राबवण्याची संधी मिळेल. घसरगुंडीला लागलेली आर्थिक बाजू पुन्हा सावरून कणखरपणे उभे राहाण्यात यशस्वी व्हाल. लेखन व्यवसाय उत्तम चालेल. लेखनात नाव व कीर्ती मिळेल. लोकांत व मित्रपरिवारात नेतृत्व मिळेल. शुभ दिनांक २०-२४

**महिलांना :** नोकरीत तुम्ही समर्थपणे तुमचा वचक निर्माण करू शकाल.

**विद्यार्थ्यांना :** आर्थिक दृष्टया समाधान देणारा काळ आहे.

## मकर : नशीब उजळेल

नामवंत व्यक्तीत तुमची गणना होते. तुम्ही जे प्रश्न निर्माण कराल त्याने तुमचे नांव मुत्सद्दी म्हणून गाजेल. सध्या रवी हा राजकारणी ग्रह व मंगळ हा सत्तेचा कारक ग्रह भाग्यस्थानी एकत्र आले आहेत. ही तुमच्या बाबतीत एक महान पर्वणीच समजायला पाहिजे. नोकरीत वरिष्ठश्रेणीत नेमणूक होऊन गुणांचा प्रभाव पाडण्याची संधी उपलब्ध होईल. मात्र जे हाती घ्याल ते पुरे करा. प्रकृतीची काळजी नको. राशीसमोर असलेला शनी थोडाफार आळस निर्माण करणार आहे, तरीपण यश व अपेक्षा सफल होईल. रेसमध्ये नशीब उजाळून निघू शकेल. लॉटरीत भाग घ्या. जमीन खरेदी-विक्रीचा व्यवहार लाभदायक होईल. शुभ दिनांक १८-२१

**महिलांना :** कौटुंबिक स्वास्थ्य निर्माण होईल. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** मोठेपणा चालत येईल. परीक्षा उत्तीर्ण व्हाल.

## कुंभ : विदेश यात्रा

राशिस्वामी शनी शत्रुस्थानी बसला आहे तर रवि-मंगळ अष्टमस्थानी तळ देऊन बसले आहेत. तुमच्याकडे विरोधकांची डोळे वर करून बघण्याची हिंमत होणार नाही. त्यांच्या कारवाया थंडावतील. अष्टमस्थान हे तसे वाईट नाही. तुम्ही परदेशी जाण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असाल, तर ते तुमचे प्रयत्न यावेळी अनपेक्षित सफल होतील. एक प्रकारचा अननुभूत असा आनंद तुम्हाला मिळेल. आर्थिक बाजू चांगलीच सुधारणार आहे. रेस, लॉटरी असल्या मार्गाने चार पैसे एकदम हाती येतील. स्थानांतराचा प्रश्न सुटेल. नोकरीत मात्र दक्ष राहाणे आवश्यक आहे. आजचे काम उद्यावर टाकू नका. शुभ दिनांक १९-२२

**महिलांना :** माहेरच्या सुखद आठवणीने मन आनंदी राहाणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** स्वतःचे वाहन मिळाल्याचा आनंद होईल.

## मीन : अनुकूल बदल

सध्या राशीस्वामी गुरु तिसरा आहे व त्याच्याच हाती तुमच्या कल्याणांची सारी सूत्रे आहेत. त्याचा फायदा करून घेतलात तर, यश तुमच्या हाती येईल. तुम्ही लेखक असाल तर तुम्हाला फारच छान काळ आहे. जे लेखन कराल ते गाजेल व तुमच्या लेखनाला मागणी येईल. पत्रकारांना चांगले दिवस आहेत. प्रकाशकांना मोठी ऑर्डर मिळणार आहे. नोकरीत स्वतःचे कर्तृत्व दाखवण्याची संधी मिळणार आहे. वरिष्ठांची मर्जी राहून मागण्या मान्य करून घेण्यात मोठे यश पदरी पडणार आहे. कौटुंबिक स्वास्थ्य मात्र थोडे फार हरवल्यासारखे होणार आहे. परंतु पती-पत्नीनी मतभेद न वाढवता एकमेकाला समजून घेतले पाहिजे. शुभ दिनांक २१-२३


**महिलांना :** स्त्री लेखिकांना त्यांचे कर्तृत्व उजाळण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक क्षेत्रांत आकांक्षा उंचावतील.

□

MANOOS (Weekly) 60 Paise Regd. No. PNC-86

## 'माणूस'मधून गाजलेली लेखमाला लवकरच पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे.



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
## १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०